दैनिक
राष्ट्रसह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI NO.MAHMAR/2019/82605 । वर्ष ८ वे । पाने ८ । मुल्य रु. ५.००। अंक ३८
। मंगळवार, दि. १७ नोव्हेंबर २०२६ । पोस्टल परवाना : G-2/Rashtra Sahyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com

‘गुलाबी थंडी’ची सुखद चाहूल

पुण्यात राज्यातील सर्वात कमी तापमानाची नोंद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



पुणे : संपूर्ण राज्यात सध्या हवामानाचा लपंडाव सुरू आहे. एकीकडे ’गोड गुलाबी थंडी’ची सुखद चाहूल लागलीअसताना उत्तरेकडून थंड वारे खाली महाराष्ट्राच्या दिशेनं सरकत आहेत. तर दुसरीकडे पश्चिम बंगालच्या खाडीत कमी दाबाचा पट्टा तयार झाला आहे. सोबतच बंगालच्या उपसागरात तयार होत असलेल्या ’अकबन’ चक्रीवादळा चापरिणाम आता राज्यातील हवामानातही जाणवतोआहे. एकीकडे महाराष्ट्रतील बहुतांश जिल्ह्याच्या किमान तापमानात घट होतअसतानाचेचित्रअसताना, हवामान विभागाने १९ नोव्हेंबरच्या आसपास विदर्भात पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

अहिल्यानगर । जळगाव । धुळे । नंदुरबार । छत्रपती संभाजीनगर । जालना । बीड । धाराशिव । लातूर । नांदेड । परभणी । हिंगोली । अमरावती । अकोला । यवतमाळ । बुलढाणा । वाशिम । नागपूर । वर्धा । भंडारा । गोंदिया । चंद्रपूर । गडचिरोली । मुंबई । ठाणे । पालघर । रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग । पुणे । सातारा । सांगली । कोल्हापूर । सोलापूर । नाशिक

महत्वाचे...

महावितरणमध्ये २३ हजार पदांच्या भरतीची जाहिरात फसवी

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

मुंबई : महावितरणमध्ये तब्बल २३ हजारांहून अधिक पदांसाठी कोणतीही परीक्षा किंवा मुलाखत न घेता थेट भरती सुरू असल्याच्या दिशाभूल करणाऱ्या जाहिराती सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत.

केवळ दहावी उत्तीर्ण उमेदवारांसाठी हजारो रुपयांच्या वेतनाचे आमिष दाखवणारी ही माहिती पूर्णपणे खोटी असून, तिचा महावितरणशी कोणताही संबंध नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. उमेदवारांनी अशा बनावट जाहिरातींना बळी पडू नये. महावितरणच्या सर्व पदांची भरती प्रक्रिया, अधिकृत जाहिराती आणि ऑनलाइन अर्जाची लिंक केवळ www.mahadiscom.in या अधिकृत संकेतस्थळावरच प्रसिद्ध केली जाते. त्यामुळे फसवणूक टाळण्यासाठी सोशल मीडियावरील संशयास्पद लिंकवर क्लिक करू नये आणि या खोट्या माहितीवर विश्वास ठेवू नये. भरतीसंदर्भातील कोणत्याही माहितीची खात्री अधिकृत संकेतस्थळावरच करावी, असे आवाहन महावितरणकडून उमेदवारांना व नागरिकांना करण्यात आले आहे.

मुख्यमंत्री फडणवीस हेच ते ‘मफलरमॅन’

‘व्ही.एस.आर.’ कंपनीच्या मालकाचे आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी, ड्रग्ज व सोने तस्करीशी संबंध



आ. रोहित पवार यांचा पत्रकार परिषदेत दावा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

मुंबई : दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताला साडेनऊ महिने उलटूनही या प्रकरणाचा सखोल तपास का होत नाही, असा सवाल उपस्थित करत राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार पक्ष)चे आमदार रोहित पवार यांनी आज मुंबईतील वाय. बी. चव्हाण सेंटर येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत खळबळजनक दावे केले आहेत. ज्या ’व्ही.एस.आर.’ कंपनीच्या विमानातून प्रवास करताना अजित पवारांचे अपघाती निधन झाले, त्या कंपनीचे मालक व्ही. के. सिंह आणि त्यांच्या दोन मुलांचे आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी, ड्रग्ज व सोने तस्करीशी संबंध असल्याचा गंभीर आरोप रोहित पवार यांनी केला आहे. तसेच, या कंपनीला वाचवणारा ’मफलरमॅन’ कोण हे सांगताना त्यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा मफलर घातलेला फोटो प्रसारमाध्यमांसमोर दाखवल्याने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

पत्रकार परिषदेत सादरीकरण करताना रोहित पवार यांनी व्ही. एस.आर. कंपनीच्या मालकांच्या परदेशातील संपत्तीवर बोट ठेवले. व्ही. के. सिंह यांचा मुलगा राहुल सिंह याच्याकडे दुबईचा ’गोल्डन विझा’ असून, अमेरिकेत कोट्यवधी रुपयांच्या आलिशान गाड्या आहेत. अजित पवार यांच्या निधनानंतर अवघ्या दोनच दिवसांनी त्यांनी अमेरिकेतील फ्लोरिडा येथे १८ कोटी रुपयांचा बंगला ’कोडॅक ब्लॅक’ नावाच्या व्यक्तीकडून खरेदी केला. कोडॅक ब्लॅक आणि त्यांचा व्यावसायिक भागीदार ’रोनेल लुईमा’ हे दोघेही अमेरिकन तपास यंत्रणांच्या रडारवर असलेले ड्रग्ज तस्कर असल्याचा दावा रोहित पवार यांनी केला. याशिवाय, कंपनीच्या ’एन२९१व्हीके’ या विमानाचा वापर हजारो कोटी रुपयांच्या सोन्याच्या (पान ४ वर)

विवाह सोहळा, डिलीट केलेला डेटा आणि ’मफलरमॅन’चा संदर्भ

विधानसभेच्या निवडणुकीच्या काळात (२१ ते २३ नोव्हेंबर २०२४) पार पडलेल्या रोहित सिंह याच्या लग्नाला अनेक बडे नेते आणि सेलिब्रिटी उपस्थित होते. या लग्नातील सर्व फोटो आणि व्हिडीओ हरियाणातील एका कंपनीच्या माध्यमातून सॉफ्टवेअर वापरून डिलीट करण्यात आल्याचा दावा आ. रोहित पवार यांनी केला. त्याच काळात मुंबईतून एक विशेष विमान जयपूरला गेले होते, असे सांगत त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा मफलर घातलेला फोटो दाखवला. दिल्ली विमानतळावरही व्ही. के. सिंह यांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन त्यांना एक फाईल दिली होती, असा दावा करत सत्तेतील बड्या नेत्यांच्या आशीर्वादामुळेच या प्रकरणात एफआयआर किंवा सीबीआय चौकशी होत नसल्याचा आरोप त्यांनी केला.

भाजपकडून आरोपांचे खंडन

व्ही.एस.आर. कंपनी आणि तिचे मालक (रोहित सिंग व व्ही. के. सिंह) हे २०१३ पासून देशातील विविध राजकीय पक्षांना आणि राज्य सरकारांना विमान सेवा पुरवत आले आहेत. केवळ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच नव्हे, तर अनेक राजकीय नेत्यांनी व विविध पक्षांच्या नेत्यांनी यापूर्वी त्यांच्या विमानाने प्रवास केला आहे. तसेच व्यावसायिक संबंध किंवा विमान सेवा पुरवणाऱ्या कंपनीच्या मालकाच्या विवाह सोहळ्याला किंवा कार्यक्रमाला उपस्थित राहणे ही कोणतीही संशयास्पद बाब नसून एक सामान्य गोष्ट आहे.

- नवनाथ बन, भाजप प्रवक्ते

मराठा आरक्षणासाठी तुळजापूर ते कायगाव टोका ‘जनजागृती यात्रा’

डिसेंबरमध्ये आयोजन : मंथन परिषदेत महत्त्वाचा निर्णय



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

संभाजीनगर : राज्य सरकारकडून हैदराबाद गॅझेटिअर, एसईबीसी आरक्षण आणि विविध शासन निर्णय जाहीर करूनही मराठा समाज खऱ्या अर्थाने आरक्षणाच्या लाभापासून वंचितच राहिल्याने मराठा क्रांती मोर्चाने पुन्हा आक्रमक पवित्रा घेतला आहे. आरक्षणाबाबत जनजागृती करण्यासाठी आणि सरकारने केलेली फसवणूक जनतेसमोर मांडण्यासाठी येत्या डिसेंबर महिन्यापासून तुळजापूर ते कायगाव टोका (ता. गंगापूर) अशी मराठवाडाव्यापी ’मराठा आरक्षण जनजागृती यात्रा’ काढण्यात येणार आहे. सोमवारी (दि. १६) देवळाई परिसरात आयोजित राज्यस्तरीय ’मराठा आरक्षण मंथन परिषदे’नंतर समन्वयक रमेश केरे पाटील आणि नानासाहेब जावळे यांनी पत्रकार परिषदेत ही घोषणा केली.

या वेळी रमेश केरे पाटील यांनी सरकारच्या भूमिकेवर तीव्र ताशेरे ओढले. ते म्हणाले की, मुख्यमंत्री आणि आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी मराठा आरक्षणात मोठी फसवणूक केली आहे. विखे पाटील यांनी मराठवाड्यातील अभ्यासक व समन्वयकांची बैठक बोलावण्याचे आश्वासन दिले होते, मात्र ती बैठक अद्याप झालेली नाही. तसेच, सरकारने शोधलेल्या ५८ लाख कुणबी नोंदी नेमक्या मराठवाड्याच्या आहेत की राज्यभरातील, आणि त्या १९६७ नंतरच्या आहेत का, याचा खुलासा सरकारने करावा, अशी मागणीही त्यांनी केली.

दरम्यान, मनोज जरांगे पाटील आणि आमच्यात कोणतेही मतभेद नसून ते या यात्रेत सहभागी झाल्यास आम्हाला समाधानच वाटेल, असेही केरे पाटील यांनी स्पष्ट केले. या परिषदेस राजेंद्र दाते, किशोर चव्हाण, डॉ. शिवानंद भानुसे, राहुल पाटील, गणेश कदम यांच्यासह अनेक समन्वयक उपस्थित होते.

लसीकरणाच्या नावाखाली सायबर भामट्यांचा नवा डाव!



- आशा सेविकांना कॉन्फरन्स कॉलवर घेत पालकांचा विश्वास संपादन
- नऊ हजारांच्या आमिषाने शेतकऱ्याचे खाते केले रिकामे
- जेऊर आरोग्य केंद्रांतर्गत खोसपुरीतील धक्कादायक प्रकार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नगर तालुका : सायबर चोरट्यांकडून नागरिकांची फसवणूक करण्यासाठी आता नवनवीन शक्कल लढवली जात आहे. कधी बँकेच्या नावाखाली तर कधी सरकारी योजनांचे आमिष दाखवून नागरिकांच्या खात्यांवर डल्ला मारला जात असताना आता चक्क बालकांच्या लसीकरणाचा आधार घेत फसवणुकीचा नवा प्रकार समोर आला आहे. लसीकरण पूर्ण झाल्यानंतर शासनाकडून नऊ हजार रुपये मिळणार असल्याचे अमिष दाखवत खोसपुरी येथील एका शेतकऱ्याच्या बँक खात्यातून सुमारे आठ हजार रुपये गायब केल्याची घटना दोन दिवसांपूर्वी घडली. या प्रकारामुळे जेऊर प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत येणाऱ्या गावांमध्ये खळबळ उडाली आहे.

फसवणुकीतील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे सायबर भामटे थेट आशा सेविकांनाच कॉन्फरन्स कॉलवर घेत आहेत. संबंधित बालकांच्या लसीकरणाची माहिती सांगत पालकांशी संवाद साधला जात असल्याने नागरिकांचा या फोनवर विश्वास बसतो. त्यानंतर शासनाकडून नऊ हजार रुपये मिळणार असल्याचे सांगून फोन-पे सुरू करण्यास सांगितले जाते तसेच अकाउंट ची माहिती विचारली जाते. मात्र या प्रक्रियेत आर्थिक फसवणूक होऊन खात्यातील रक्कम गायब होत असल्याचे समोर आले आहे.

संबंधित भामटे आशा सेविकांना आपण मुंबई कार्यालयातून बोलत असल्याचे सांगतात. तुम्ही संबंधित बालकांच्या घरी जाऊन लसीकरणाची पाहणी करता की नाही तसेच तुमच्या कामाची माहिती घेत असल्याचे सांगून त्यांना विश्वासात घेतले जाते. त्यानंतर आशा सेविकांना कॉन्फरन्स कॉलवर घेऊन पालकांशी लसीकरणाबाबत विचारणा केली जाते. परिचित आशा सेविका फोनवर असल्याने पालकही निर्धास्त होतात आणि याच विश्वासाचा गैरफायदा घेत त्यांच्या खात्याची माहिती मिळवली जाते.

या प्रकारात फोन कॉलकडे दुर्लक्ष करणाऱ्या काही नागरिकांना शिवीगाळ केल्याचीही माहिती समोर आली आहे. त्यामुळे या टोळीचे धाडस आणि नियोजन पाहता नागरिकांच्या वैयक्तिक माहितीचा गैरवापर होत असल्याची गंभीर शक्यता निर्माण झाली आहे. जेऊर प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. योगेश कर्डिले यांनी आशा सेविकांशी संवाद साधून अशा फोन कॉलला बळी (पान ४ वर)

‘लसीकरणाच्या नावाखाली शासनाकडून नऊ हजार रुपये मिळणार असल्याचा दावा पूर्णपणे खोटा आहे. बालकाचे नियमित लसीकरण पूर्ण झाल्यानंतर शासनाकडून अशा प्रकारे कोणतीही रक्कम दिली जात नाही. नागरिकांनी अनोळखी फोन कॉलवर विश्वास ठेवू नये, फोन-पे किंवा अन्य आर्थिक प प उघडण्यास सांगितल्यास सावध राहावे आणि बँक खाते, ओटीपी अथवा गोपनीय माहिती कोणालाही देऊ नये. आशा सेविकांनीही अशा संशयास्पद कॉलची खातरजमा केल्याशिवाय कोणतीही माहिती देऊ नये.’

-डॉ. विनोद काकडे (तालुका आरोग्य अधिकारी)

अजित पवार यांच्या पुतळ्याचे अमित शाह यांच्या हस्ते अनावरण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पुणे : राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पुण्यात पुणे जिल्हा परिषदेच्या प्रवेशद्वाराजवळ उभारण्यात आलेल्या अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण सोमवारी (दि. १६) केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते अत्यंत भारतरंगी व भावूक वातावरणात संपन्न झाले. या सोहळ्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्र्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार, खासदार सुप्रिया सुळे यांच्यासह महायुतीचे व विविध पक्षांचे प्रमुख नेते उपस्थित होते. यावेळी बोलताना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी अजित दादांच्या आठवणींना उजाळा देत अनेक किस्से सांगितले. जे पटलं ते होय आणि जे नाही पटलं ते थेट नाही, असे परखडपणे बोलणारे अजित पवार होते. महायुतीच्या जागावाटपावेळी ते आपले मत स्पष्ट मांडायचे. त्यांच्या या स्पष्टवक्तेपणाचा गुण मला खूप आवडायचा, असे शाह म्हणाले. तसेच, राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांसाठी व नेत्यांसाठी अजितदादांनी आपल्यासह मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांसोबत अनेकदा वाद घातल्याचे सांगत, कार्यकर्त्यांसाठी लढणारा असा नेता दुर्मिळ असल्याचे ते म्हणाले. कोरोना काळात महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांशी संपर्क होत नसतानाही अजितदादांचा नेहमी सकाळी ७ वाजता कार्यालयातून फोन यायचा, अशी आठवण सांगत त्यांच्या कामाच्या झटक्याची त्यांनी प्रशंसा केली. अजितदादांच्या अकाली निधनाने राज्याचेच नव्हे, तर माझे व्यक्तिगत नुकसान झाल्याचे सांगताना शाह भावूक झाले होते. या सोहळ्यात उपस्थितांनी अजित पवारांच्या ग्रामीण महाराष्ट्राशी जोडलेल्या नाळेला व सहकार क्षेत्रातील अभ्यासाला आदरांजली वाहिल्या.



कुंभमेळा च्या पार्श्वभूमीवर वाहतूक कोंडी फोडण्यासाठी रस्त्यांच्या कामांचा शुभारंभ

निमगाव कोऱ्हाळेत ८ कोटी ९१ लाखांचा निधी



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

शिर्डी : आगामी कुंभमेळा २०२७ च्या पार्श्वभूमीवर शिर्डी येथे येणाऱ्या लाखो भाविकांची वाहतूक अधिक सुरळीत, सुरक्षित व नियोजनबद्ध व्हावी, या उद्देशाने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. संस्थानच्या मालकीच्या मौजे निमगाव कोऱ्हाळे येथील जमिनीमध्ये दोन महत्त्वपूर्ण रस्त्यांच्या विकासकामांचा शुभारंभ दिनांक १५ नोव्हेंबर २०२६ रोजी संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांच्या हस्ते करण्यात आला. नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या काळात शिर्डी येथेही भाविकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता आहे.

साईबाबांच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसोबतच कुंभमेळ्याकडे जाणाऱ्या वाहनांचाही ताण शिर्डी परिसरातील रस्त्यांवर पडणार आहे. ही बाब लक्षात घेऊन संस्थानने नियोजित तात्पुरत्या वाहनतळांना जोडणारे रस्ते आत्तापासूनच विकसित करण्याचे नियोजन केले आहे. त्याचाच एक भाग म्हणून या दोन्ही रस्त्यांच्या कामांना सुरुवात झाली आहे. पहिल्या कामांतर्गत नगर-मनमाड रस्त्यावरील हॉटेल सनराज जवळील नाला क्रमांक ३२ लगतच्या रस्त्यापासून शिर्डी बायपास रस्त्यापर्यंत, संस्थानच्या मौजे निमगाव कोऱ्हाळे येथील गट क्रमांक २४५ मधील नवीन तलावापर्यंत सुमारे २ किलोमीटर लांबीचा व ७ मीटर रुंदीचा रस्ता विकसित करण्यात येणार आहे. (पान ४ वर)

राज्यातील ३४ हजार न्यायालयीन कर्मचारी आज पासून नोव्हेंबरपासून बेमुदत संपावर

उच्च न्यायालयाप्रमाणे सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याची मागणी; २१ महिन्यांपासून वेतनवाढीचा प्रस्ताव शासनदरबारी प्रलंबित

अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व न्यायालयीन कर्मचारी संपात सहभागी होणार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : समान काम, समान वेतन या तत्त्वानुसार उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणेच दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांनाही सुधारित वेतनश्रेणी लागू करावी, या प्रमुख मागणीसाठी महाराष्ट्रातील सुमारे ३४ हजार न्यायालयीन कर्मचारी १७ नोव्हेंबरपासून बेमुदत संपावर जाणार आहेत. महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या या आंदोलनात अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व न्यायालयीन कर्मचारीही सहभागी होणार आहेत.

न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या सुधारित वेतनश्रेणीचा प्रस्ताव उच्च न्यायालयाच्या




समितीने मंजूर करून महाराष्ट्र शासनाकडे पाठविला आहे. मात्र, या प्रस्तावाला २१ महिने उलटूनही शासनाकडून अद्याप अंतिम निर्णय घेण्यात आलेला नाही. ३१ जानेवारी २०२५ पासून या मागणीसाठी सातत्याने पाठपुरावा सुरू असूनही शासनाने या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेतली नसल्याचा आरोप कर्मचारी महासंघाने केला आहे.

उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांना लागू असलेल्या वेतनश्रेणीप्रमाणेच दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांनाही सुधारित वेतनश्रेणी लागू करून वेतन मिळावे, अशी न्यायालयीन कर्मचाऱ्यांची प्रमुख मागणी आहे. यासंदर्भातील प्रस्ताव उच्च न्यायालयाच्या समितीने मान्य करून शासनाकडे पाठविल्यानंतरही त्यावर निर्णय होत नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी वाढत आहे. समान कामाच्या तत्त्वानुसार वेतनश्रेणीतील तफावत दूर करून न्याय मिळावा, यासाठी महासंघाने आता बेमुदत संपाचे हत्यार उपसले आहे. दुय्यम न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या सुधारित वेतनश्रेणीसंदर्भात महाराष्ट्र शासनाने अधिकृत शासन निर्णय काढल्याशिवाय बेमुदत संप मागे घेतला जाणार नाही, अशी ठाम भूमिका महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाने घेतली आहे. मागणी मान्य होऊन शासन निर्णय जारी होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्धार कर्मचाऱ्यांनी व्यक्त केला आहे. या संपामुळे राज्यातील न्यायालयीन कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता आहे.

याबाबतची माहिती अहमदनगर जिल्हा न्यायालयीन कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष अंकुश सांगळे, कार्याध्यक्ष शिरीष ढाळे, सचिव रवींद्र सूर्यपुजारी, उपाध्यक्ष अतुल खरपुडे, राम बेलेकर, प्रशांत साठे आणि अविनाश लिपाने यांनी दिली.

तुम्ही या पदावर बसण्यास पात्र नाही...

सर्वोच्च न्यायालयात वकिलाची हुज्जत सुनावणीदरम्यान न्यायालयात गोंधळ कामकाजाचे प्रक्षेपण केले ’म्युट’



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नवी दिल्ली : सर्वोच्च न्यायालयाच्या नियमित कामकाजादरम्यान आज एक अभूतपूर्व आणि खळबळजनक प्रकार घडला. एका वकिलाने सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या खंडपीठासमोर उभे राहून थेट त्यांच्या पात्रतेवर आणि प्रामाणिकपणावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. तुम्ही या खुर्चीवर बसण्यास पात्र नाही आहात, असे गंभीर आरोप या वकिलाने केल्याने न्यायालयात काही काळ तणावाचे आणि गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित वकिलाने आपल्या एका तातडीच्या खटल्याचा उल्लेख (मेन्शन) करत २ नोव्हेंबर रोजी सरन्यायाधीशांच्या कार्यालयात अर्ज देऊनही १५ दिवसांपासून उत्तर न मिळाल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. यावर न्यायमूर्ती व्ही. मोहना यांनी खटला मांडण्याच्या पद्धतीवर आक्षेप घेत समजावण्याचा प्रयत्न केला, तर स्वतः सरन्यायाधीशांनीही सभ्य भाषेत ’मी तुमचा खटला नक्की पाहीन’ असे आश्वासन दिले. मात्र, तरीही संबंधित वकिलाने न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची व न्यायमूर्ती मोहना यांचा सन्मान असल्याचे सांगत सरन्यायाधीशांवर आरोपांची सरबत्ती सुरूच ठेवली. परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे पाहून सर्वोच्च न्यायालय प्रशासनाने तातडीने थेट प्रक्षेपणाचा ऑडियो आणि व्हिडीओ ’म्युट’ केला आणि सुरक्षा रक्षकांच्या मदतीने संबंधित वकिलाला न्यायालयाबाहेर नेण्यात आले.

खा. भाऊसाहेब वाकचौरे अंबाबाई महालक्ष्मी चरणी नतमस्तक

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

कोल्हापूर: शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी आज महाराष्ट्राचे श्रद्धास्थान असलेल्या कोल्हापूर येथील प्रसिद्ध श्री अंबाबाई महालक्ष्मी मंदिरात सहकुटुंब भेट देऊन मातेचे मनोभावे दर्शन घेतले. यावेळी त्यांच्या समवेत त्यांच्या पत्नी सौ. सरस्वती वाकचौरे, पुत्र रोहित वाकचौरे आणि सुनबाई उपस्थित होत्या. या प्रसंगी वाकचौरे



कुटुंबियांनी देवीच्या चरणी नतमस्तक होऊन सर्वांच्या सुख-समृद्धीसाठी विशेष प्रार्थना केली.करवीर निवासिनी श्री महालक्ष्मी मातेच्या दर्शनाने मनाला वेगळीच प्रसन्नता आणि एक नवी ऊर्जा लाभल्याची भावना खा . वाकचौरे यांनी या वेळी व्यक्त केली. देवीचे दर्शन हे नेहमीच सकारात्मकता आणि नवी प्रेरणा देणारे ठरत असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच शिर्डी लोकसभा मतदारसंघातील प्रत्येक कुटुंब सुखी, समाधानी आणि समृद्ध व्हावे, अशी आर्त हाक आई अंबाबाईच्या चरणी घातली. तसेच बळीराजाच्या जीवनातील सर्व संकटे दूर व्हावीत, शेतशिवारात भरभराट नांदावी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या आयुष्यात सुख, शांती व उत्तम आरोग्य लाभावे, अशी मनोभावे प्रार्थना केली.

सत्याचा शोध की राजकीय धुमश्चक्री?

अजित पवार यांच्या विमान अपघाताचे सावट आणि यंत्रणांची पारदर्शकता...

महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर अभूतपूर्व आणि अत्यंत सुन्न करणारी घटना म्हणून दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताकडे पाहिले जाते. या दुर्दैवी घटनेला साडेनऊ महिन्यांचा कालावधी लोटला असला, तरी या अपघातामागचे गूढ अद्यापही पूर्णपणे उकललेले नाही. या प्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार पक्ष)चे आमदार रोहित पवार यांनी मुंबईत घेतलेली पत्रकार परिषद आणि त्यात केलेले स्फोटक दावे यामुळे राज्यभरात पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे. एका लोकप्रिय नेत्याचा असा अचानक आणि संशयास्पद अंत होणे, हे केवळ एका कुटुंबाचे दुःख नसून संपूर्ण राज्याच्या लोकशाही व्यवस्थेला आणि सुरक्षेला पडलेले मोठे प्रश्नचिन्ह आहे.

रोहित पवारांनी या पत्रकार परिषदेत ज्या 'व्ही.एस.आर.' कंपनीच्या विमानाचा अपघात झाला, त्या कंपनीच्या मालकांवर व त्यांच्या आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी संबंधांवर अत्यंत गंभीर आरोप केले आहेत. व्ही. के. सिंह आणि त्यांच्या पुत्रांचे ड्रग्ज तस्करांशी असणारे संबंध, परदेशात झालेली बेकायदा संपत्तीची खरेदी आणि सोन्याच्या तस्करीचा संशय हे मुद्दे अतिशय गंभीर आहेत. जर या आरोपांमध्ये आणि परदेशी यंत्रणांकडून मिळालेल्या माहितीत काही तथ्य असेल, तर ही बाब देशाच्या आणि राज्याच्या अंतर्गत सुरक्षेला थेट आव्हान देणारी ठरते. अशा कुख्यात प्रवृत्तीच्या कंपन्यांना किंवा व्यक्तींना जर राजकीय वरदहस्त मिळत असेल, तर ती लोकशाहीसाठी अत्यंत घातक बाब म्हणावी लागेल.

तथापि, या प्रकरणात सर्वात मोठा वाद निर्माण झाला तो राजकीय हस्तक्षेपाच्या मुद्द्यावरून. रोहित पवारांनी थेट महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा फोटो 'मफलरमॅन' म्हणून दाखवत, व्ही.एस.आर. कंपनीच्या मालकांना आणि संबंधितांना सत्ताधारी पक्षाकडून पाठीशी घातले जात असल्याचा सनसनाटी आरोप केला. विधानसभेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर व्ही. के. सिंह यांच्या कुटुंबातील विवाह सोहळ्यात



व्हीआयपी वर्गाची झालेली उपस्थिती आणि त्यानंतर संबंधित डिजिटल पुरावे व डेटा पद्धतशीरपणे डिलीट केल्याचा दावा केला गेल्याने संशयाचे काळे ढग आणखी दाट झाले आहेत. दुसरीकडे, राजकीय वर्तुळातून या आरोपांवर तीव्र पडसाद उमटले असून, ही केवळ राजकीय सुडाची राजकारण किंवा विरोधकांकडून होत असलेली नाहक बमदनामी असल्याची बाजू मांडली जात आहे. मात्र, या आरोप-प्रत्यारोपांच्या धुमश्चित्रीत मूळ सत्य कुठेतरी हरवत चालले आहे, हीच महाराष्ट्राच्या जनतेची खरी खंत आहे.

दुसऱ्या बाजूला, या संपूर्ण प्रकरणातील तपास यंत्रणांची भूमिका संशयास्पद आणि अत्यंत सुस्त राहिली आहे. राज्याच्या सीआयडी विभागाकडून किंवा इतर तांत्रिक यंत्रणांकडून या प्रकरणाचा तपास ज्या गतीने आणि पारदर्शकतेने व्हायला हवा होता, तो झालेला नाही. घटनेला साडेनऊ महिने उलटून गेल्यानंतरही जर जनतेच्या मनात आणि मृत नेत्याच्या कुटुंबीयांच्या मनात प्रश्न कायम राहत असतील, तर तपास यंत्रणांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होणे स्वाभाविक आहे. विरोधी पक्ष सातत्याने या प्रकरणाचा तपास सीबीआयकडे देण्याची मागणी करत आहे, तरीही शासन स्तरावर योग्य तो पाठपुरावा किंवा पारदर्शकता दिसत नसल्याचे चित्र आहे.

अजित पवार यांच्यासारखा तडफदार आणि लोकप्रिय नेता महाराष्ट्राने गमावला आहे. त्यांच्या मृत्यूमागील सत्य समोर आणणे ही केवळ राजकीय गरज नसून ती राज्याची नैतिक जबाबदारी आहे. जर आरोप खोटे असतील, तर ते पुराव्यानिशी खोडून काढले पाहिजेत आणि जर त्यात तथ्य असेल, तर कितीही मोठा व्यक्ती असो, त्याला कायद्याच्या चौकटीत उभे केलेच पाहिजे. केवळ राजकीय आरोप-प्रत्यारोप करून या संवेदनशील प्रकरणाचे गांभीर्य कागदावरच मोजले जाणे दुर्दैवी आहे. आता आवश्यकता आहे ती निष्पक्ष, निर्भीड आणि वेगाने होणाऱ्या उच्चस्तरीय तपासाची, जेणेकरून महाराष्ट्राच्या जनतेला या अपघाताचे नेमके सत्य कळू शकेल आणि दिवंगत नेत्याला खऱ्या अर्थाने न्याय मिळू शकेल.

हभप अंकुश महाराज जगताप यांच्या संगीत प्रवचन सोहळ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

नेवासा : येथील व्यावसायिक व सामाजिक कार्यकर्ते रोहिदास मोहन शेंडे यांच्या स्मृती दिनाचे औचित्य साधून येथील श्री मोहिनीराज मंगल कार्यालयात संत तुकाराम महाराज संस्थानचे विश्वस्त हभप अंकुश महाराज जगताप यांच्या आयोजित संगीत प्रवचन सोहळ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



या प्रसंगी प्रवचन सोहळा संयोजक राजेंद्र शेंडे, बबनराव शेंडे यांच्या हस्ते भागवताचार्य हभप अंकुश महाराज जगताप यांचे संतपूजन व स्वर्गीय रोहिदास शेंडे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.यावेळी नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले,उपनगराध्यक्ष अँड. संजय सुखदान, भाजपचे शहराध्यक्ष मनोजभाऊ पारखे,क्रीडा शिक्षक कानडे सर यांच्यासह उपस्थित मान्यवर व विविध संघटनेच्या वतीने स्वर्गीय रोहिदास शेंडे यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

यावेळी झालेल्या संगीत प्रवचन सोहळ्यात बोलतांना भागवताचार्य हभप अंकुश महाराज जगताप म्हणाले की भगवंताजवळ जायचे असेल तर प्रथम त्याला आपला सखा बनवा मगच त्याची भक्ती करा,परमार्थ करतांना संतांची संगत करा,आईवडील हेच खरे तीर्थक्षेत्र असल्याने आईवडीलांची शेवटच्या श्वासापर्यंत सेवा करा आवाहन करून त्यांनी स्वर्गीय रोहिदास शेंडे यांनी केलेले सामाजिक कार्य धर्म कार्यात दिलेले योगदान समाज नेहमी लक्षात ठेवेल आपण ही त्यांच्या कार्याचा आदर्श घेऊन समाजात वाटचाल करा असे आवाहन त्यांनी यावेळी बोलतांना केले.

यावेळी झालेल्या संगीत प्रवचन प्रसंगी सोपान महाराज दारकुंडे(सिंथेसायझर),गायनाचार्य गणेश महाराज गोंडे,मृदुंगाचार्य ज्ञानेश्वर इंगळे यांनी उत्कृष्ट संगीत साथ दिली.संगीत प्रवचन सोहळ्याला इंजिनियर सुनीलराव वाघ,नगरसेवक महेश लोखंडे, जालिंदर गवळी,दिनेश व्यवहारे, अँड. अभिषेक पाटील,नानासाहेब शेंडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.उपस्थित

नैसर्गिक आपत्ती केंद्राकडून १७ हजार कोटींहून अधिक निधीची प्रतीक्षा

राज्य सरकारच्या अग्रीम मदतीपासून ५० लाख शेतकरी वंचित

शफीक बागवान | राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : राज्यात २०१४ ते २०२४ या काळात दुष्काळ, अतिवृष्टी, चक्रीवादळ आणि कीड-गोगलगायींच्या प्रादुर्भावामुळे शेतीचे मोठे नुकसान झाले. या नैसर्गिक आपत्तींमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी राज्य सरकारने केंद्राकडे एकूण २८ हजार २५१ कोटी रुपयांची मागणी केली होती. मात्र, केंद्र सरकारकडून प्रत्यक्षात केवळ ११ हजार ५१ कोटी रुपये मिळाले. म्हणजेच मागणीच्या फक्त ३९.१२ टक्के निधी मंजूर झाला आहे. २०१४-१५ मध्ये दुष्काळ निवारणासाठी राज्याने ६ हजार १३ कोटी २८ लाख रुपयांची मागणी केली होती. त्यापैकी १ हजार ९६२ कोटी ९९ लाख रुपये मिळाले. तर २०१५-१६ मधील खरीप आणि रब्बी हंगामातील दुष्काळासाठी ८ हजार २७२ कोटी २० लाख रुपयांची मागणी करण्यात आली होती. त्यापैकी ४ हजार ३१८ कोटी ३७ लाख रुपयांचा निधी मिळाला.

२०१७-१८ मध्ये कीड, गोगलगायींचा प्रादुर्भाव आणि ओखी चक्रीवादळामुळे झालेल्या नुकसानीपोटी ३ हजार ३७३ कोटी ३१ लाख रुपयांची मागणी करण्यात आली होती. मात्र, प्रत्यक्षात केवळ ६० कोटी ७६ लाख रुपये मिळाले. २०१८-१९ मधील खरीप हंगामातील दुष्काळासाठी ७ हजार ९०२ कोटी ७७ लाख रुपयांची मागणी केली होती. त्यापैकी ४ हजार ७१४ कोटी २८ लाख रुपयांचा निधी मिळाला. २०२३-२४ मधील खरीप हंगामातील दुष्काळी परिस्थितीच्या निवारणासाठी २ हजार ६९० कोटी ३२ लाख रुपयांची मागणी करण्यात आली होती. मात्र, राज्य आपत्ती प्रतिसाद निधीकडे पुरेसा निधी उपलब्ध असल्याचे कारण देत केंद्र सरकारने मदत देण्यास नकार दिला.



दरम्यान, गतवर्षी अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीपोटी राज्याने २९ हजार ७८१ कोटी ६६ लाख रुपयांची मागणी केली होती. डिसेंबर २०२५ मध्ये हा प्रस्ताव केंद्राकडे पाठविण्यात आला. मात्र, एक वर्ष होत आले तरी अद्याप एक रुपयाही मदत मिळालेली नाही. गेल्या दहा वर्षांत नैसर्गिक आपत्तीग्रस्तांना केंद्र सरकारकडून अत्यल्प निधी मिळाला असून, शेतकऱ्यांच्या हक्काची १७ हजार कोटींहून अधिक मदत नाकारण्यात आली आहे.राज्य सरकारने जाहीर केलेली ५ हजार रुपयांची अग्रीम मदत अद्याप ५० लाख शेतकऱ्यांना मिळालेली नाही.

बिरसा मुंडा यांचा जल, जंगल, जमिनीच्या हक्कांसाठीचा लढा प्रेरणादायी : प्रा. खरात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

संगमनेर : आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी, जल, जंगल आणि जमिनीच्या संरक्षणासाठी तसेच देशाच्या स्वातंत्र्यासाठी भगवान बिरसा मुंडा यांनी दिलेला लढा आणि ब्रिटिशांविरोधात केलेले बंड इतिहासात अजरामर आहे. शेतसारा माफ करण्यासह आदिवासी समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी त्यांनी दिलेले योगदान सदैव स्मरणात राहील, असे प्रतिपादन आदिवासी सेवक प्रा. बाबा खरात यांनी केले. यशोधन कार्यालयाच्या वतीने भगवान बिरसा मुंडा यांची १५१ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. संपूर्ण देशात हा दिवस जनजाती गौरव दिन म्हणून साजरा केला जातो. यानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रा. खरात बोलत होते. यावेळी भास्करराव खेमनर, विजय हिंगे, तुषार गवांदे, प्रशांत गडाख, मोहन दिघे, डॉ. विजय पवार, सुनील गुंजाळ, शंकर गवारी, विठ्ठल मेंगाळ, दिलीप कांबळे, विठ्ठल जाधव, बाळकृष्ण गांडाळ, संगीता मोरे, लक्ष्मण गोरडे आदी मान्यवर उपस्थित होते. प्रा. बाबा खरात पुढे म्हणाले की, जगातील इतर संस्कृतींच्या उदयापूर्वीपासून माणसाला माणूसपणाची जाणीव करून देणारी आणि निसर्गाचे श्रेष्ठत्व जपणारी संस्कृती म्हणजे आदिवासी संस्कृती होय. आदिवासी संस्कृती ही जगाच्या उत्थानाची गंगोत्री मानली जाते. भारतीय संस्कृतीची खरी ओळख जगाला करून देण्यात आदिवासी संस्कृतीचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. समाजवाद, स्त्री-पुरुष समानता आणि परस्पर सन्मान या मूल्यांच्या जपणुकीत आदिवासी समाजाचा मोलाचा वाटा आहे. स्त्री-पुरुष समानतेच्या विचारांचा मूळ स्रोतही आदिवासी संस्कृतीत आढळतो. गुलामगिरी आणि अन्यायाविरोधात आदिवासी समाजाने सातत्याने संघर्ष केला आहे. पर्यावरण संवर्धनाचा विचार प्रत्यक्ष आचरणात आणणारा समाज म्हणून आदिवासी समाजाची ओळख आहे. सामाजिक, राजकीय आणि आर्थिक परिवर्तनासाठी केलेल्या आदिवासींच्या उठावाला 'उलगुलान' असे म्हटले जाते. भगवान बिरसा मुंडा यांचे विचार आणि संदेश आत्मसात करून शिक्षणाच्या माध्यमातून विकासाच्या मुख्य प्रवाहात सहभागी होऊया, असे आवाहनही प्रा. खरात यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बाळकृष्ण गांडाळ यांनी केले, तर उपस्थितांचे आभार दिलीप बांबळे यांनी मानले.

ऊसाला ४ हजार रुपयांचा भाव मिळण्यासाठी २३ तारखेला जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

राहुरी : अहिल्यानगर जिल्ह्यातील जवळजवळ सर्वच साखर कारखान्यांनी उसाचे दर जाहीर न करताच साखर कारखाने सुरू केल्याने जिल्ह्यातील शेतकरी संतप्त झालेले आहेत. शेतकऱ्यांच्या ऊसाला चार हजार रुपयांचा भाव मिळण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत दोन वेळेस बैठक झाली परंतु त्या बैठकीत मात्र कोणताही तोडगा निघाला नाही. त्यामुळे अहिल्यानगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांकडून येत्या २३ तारखेला स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे. शेतकऱ्यांच्या उसाला किमान ४ हजार रुपयांचा भाव मिळावा अशी मागणी अहिल्यानगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांची आहे. सदरील मोर्चा संबंधी माहिती देण्यासाठी शेतकऱ्यांकडून पत्रकार परिषद घेण्यात आली. दरम्यान अहिल्यानगरच्या शासकीय विश्रामगृह येथे पत्रकार परिषद घेण्यासाठी हॉल उपलब्ध करून न दिल्याने संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी जमिनीवर बसून पत्रकार परिषद घेतली आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचा निषेध नोंदवला आहे.

शेतकऱ्यांचे नेते माजी खासदार राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखालील जिल्हाधिकारी कार्यालयावरील या मोर्चासाठी अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन शिवसेना शेतकरी सेनेचे प्रदेश उपाध्यक्ष रवींद्र मोरे यांनी केले आहे.

सोनई-वांबोरीमार्गे अहिल्यानगर एसटी बस सुरू करा, मागणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

सोनई : सोनई येथून वांबोरीमार्गे अहिल्यानगरला जाण्यासाठी एसटी महामंडळाची नियमित बससेवा सुरू करावी, अशी मागणी धनगरवाडी, मोरया चिंचोरे, कात्रडसह परिसरातील ग्रामस्थ व प्रवाशांकडून होत आहे. या मार्गावर थेट बससेवा उपलब्ध नसल्याने विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि सर्वसामान्य प्रवाशांना अनेक वर्षांपासून गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. सोनई हे परिसरातील प्रमुख बाजारपेठ आणि शैक्षणिक केंद्र असल्याने धनगरवाडी, मोरया चिंचोरे, कात्रड आदी गावांतील विद्यार्थी शिक्षणासाठी दररोज सोनई येथे येतात. मात्र, सोनईहून वांबोरीकडे जाण्यासाठी थेट एसटी बस नसल्याने प्रवाशांना खासगी वाहनांचा आधार घ्यावा लागतो. काहींना ब्राह्मणी येथे जाऊन तेथून वांबोरी गाठावे लागते, तर काही प्रवासी घोडेगाव-पांढरीपूल मार्गे प्रवास करतात. त्यामुळे वेळ आणि पैशांचा अतिरिक्त भुर्दंड सहन करावा लागत आहे.

यापूर्वी श्री क्षेत्र शनिशिंगणापूर येथे मुक्कामी बससेवा उपलब्ध होती. मात्र, प्रवाशांची संख्या कमी असल्याचे कारण देत ही सेवा बंद करण्यात आली. त्यानंतर सोनई-वांबोरी रस्त्याची दुरवस्था असल्याने या मार्गावरील बससेवेचा प्रश्न प्रलंबित राहिला होता. आता या रस्त्याचे काम पूर्ण होऊन मार्ग वाहतुकीसाठी सुस्थितीत झाला आहे. त्यामुळे एसटी बससेवा सुरू करण्यातील अडचण दूर झाली असतानाही महामंडळाकडून निर्णय घेतला जात नसल्याने प्रवाशांमध्ये नाराजी आहे.

विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दररोज शिक्षणासाठी सोनई येथे ये-जा करावी लागते. बससेवा नसल्याने खासगी वाहनांवर अवलंबून राहावे लागत असून आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांतील विद्यार्थ्यांना प्रवासाचा खर्च परवडत नाही. शेतकरी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांनाही याचा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे अहिल्यानगर-वांबोरी-सोनई अशी नियमित बससेवा सुरू करावी. सुरुवातीला निश्चित वेळापत्रकानुसार बस सुरू करून प्रवाशांचा प्रतिसाद पाहावा आणि त्यानुसार फेऱ्यांमध्ये वाढ करावी, अशी मागणी सरपंच सुनील वीरकर यांनी केली आहे. ग्रामीण भागातील प्रवाशांची गरज लक्षात घेऊन एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

बस उपलब्ध असूनही अधिकाऱ्यांची टाळाटाळ!

सोनईहून वांबोरीला जाण्यासाठी परिवहन महामंडळाची एकही बस उपलब्ध नसल्याने प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. बससेवा सुरू करण्याची सुविधा उपलब्ध असतानाही महामंडळाचे अधिकारी टाळाटाळ करीत आहेत. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रश्नात लक्ष घालून सोनई-वांबोरी बससेवा तातडीने सुरू करावी.
- एस. के. सय्यद, उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य पेन्शनर्स संघटना.

ईपीएफओच्या धरसोडीच्या धोरणांविरोधात नाशिकमध्ये पेन्शनधारकांचे धरणे आंदोलन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

शिरसगाव : ईपीएफओच्या धरसोडीच्या धोरणांचा निषेध करत ईपीएस-९५ राष्ट्रीय संघर्ष समितीच्या वतीने सोमवारी (ता. १६) नाशिक येथील भविष्य निर्वाह निधी प्रादेशिक कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. धुळे, नंदुरबार, नाशिक, जळगाव आणि अहिल्यानगर जिल्ह्यांतील ५०० हून अधिक महिला व पुरुष पेन्शनधारक या आंदोलनात सहभागी झाले होते.



राष्ट्रीय संघर्ष समितीचे अध्यक्ष कमांडर अशोक राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली १६ ते १९ नोव्हेंबर या कालावधीत देशभरातील ईपीएफओ कार्यालयांसमोर निदर्शने, निषेध मोर्चे आणि धरणे आंदोलने आयोजित करण्यात आली आहेत. त्याचाच एक भाग म्हणून नाशिकमध्ये हे आंदोलन करण्यात आले.

यावेळी केंद्रीय भविष्य निर्वाह निधी कार्यालय, नवी दिल्ली यांच्या नावे विविध मागण्यांचे निवेदन प्रादेशिक भविष्य निर्वाह निधी आयुक्तांना देण्यात आले. ईपीएस-९५ पेन्शनधारकांना किमान ७ हजार ५०० रुपये मासिक पेन्शन आणि महागाई भत्ता मंजूर करावा, अशी प्रमुख मागणी करण्यात आली. तसेच १९ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या केंद्रीय विश्वस्त मंडळाच्या बैठकीत पेन्शनचा प्रश्न मार्गी लागण्यासाठी नाशिक कार्यालयाने शिफारशींसह निवेदन दिल्लीला पाठवावे, अशी विनंती शिष्टमंडळाने केली.

यावेळी उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष सुभाषराव पोखरकर, देविसिंग जाधव, अरुण शेजवळ, कैलास आहेर, पुंडलिक भामरे, विठ्ठल सोनवणे, भगवंतराव वाळके, महिला आघाडीच्या राज्य उपाध्यक्षा आशाताई शिंदे यांच्यासह विविध जिल्ह्यांतील पदाधिकारी व पेन्शनधारक उपस्थित होते. प्रारंभी विठ्ठलराव सोनवणे यांनी स्वागत केले, तर अरुण शेजवळ यांनी आभार मानले.

हॉकीच्या मैदानात गौतमचा डंका;

राज्यविजेतेपदासह पाच खेळाडूंची राष्ट्रीय भरारी!

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

कोळपेवाडी :- बुलढाणा येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय शालेय हॉकी स्पर्धेत गौतम पब्लिक स्कूलच्या १४ वर्षांखालील मुलांच्या संघाने अंतिम सामन्यात कोल्हापूरच्या संघाचा पेनल्टी शूटआऊटमध्ये ४-३ असा पराभव करीत राज्यविजेतेपद पटकावले. या यशाला राष्ट्रीय निवडीची जोड मिळाली असून १४ वर्षांखालील गटातील चार खेळाडूंची मध्य प्रदेश येथे, तर १७ वर्षांखालील गटातील कृष्णा सातपुते याची झारखंड येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. याशिवाय मानव महाले याची राखीव खेळाडू म्हणून निवड झाली असल्याची माहिती प्राचार्य नूर शेख यांनी दिली आहे. राज्यविजेतेपदासह राष्ट्रीय स्तरावर पाच खेळाडूंना मिळालेली संधी ही गौतम पब्लिक स्कूलच्या क्रीडा क्षेत्रातील अलौकिक कामगिरीची साक्ष ठरली आहे.

राज्यातील आठ विभागांतील संघांचा सहभाग असलेल्या या स्पर्धेत गौतमच्या खेळाडूंनी सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ, अचूक नियोजन आणि सांघिक कौशल्याच्या जोरावर प्रतिस्पर्ध्यांवर वर्चस्व राखले. उपांत्य फेरीत मुंबई विभागाच्या संघाला पराभूत करीत अंतिम फेरी गाठली. अंतिम सामन्यात कोल्हापूरच्या बलाढ्य संघाविरुद्ध दोन्ही संघांनी शेवटपर्यंत चुरशीचा खेळ केला. अखेर पेनल्टी शूटआऊटमध्ये गौतमच्या खेळाडूंनी ४-३ अशी बाजी मारत विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले. राज्यस्तरीय स्पर्धेतील कामगिरीच्या आधारे १४ वर्षांखालील गटातील अभिषेक चौधरी, ओंकार डोंगरी, शहाजी घुमरे आणि रणवीर सिंग नागलोट यांची ८ ते १२ डिसेंबर २०२६ दरम्यान मध्य प्रदेश राज्यातील मंदसौर येथे होणाऱ्या राष्ट्रीय शालेय हॉकी स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. मानव महाले याची राखीव खेळाडू म्हणून निवड करण्यात आली आहे. तसेच १७ वर्षांखालील गटातून कृष्णा गणेश सातपुते याची २८ ते ३१ जानेवारी २०२७ दरम्यान रांची (झारखंड) येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या क्रीडा गुणवत्तेला योग्य व्यासपीठ मिळावे, त्यांना दर्जेदार सुविधा आणि सातत्यपूर्ण मार्गदर्शन मिळावे, यासाठी कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटीच्या सचिव सौ. चैतालीताई काळे सातत्याने प्रयत्नशील आहेत. खेळाडूंच्या सरावापासून ते स्पर्धांमधील सहभागापर्यंत आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याची त्यांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरत आहे. त्यांच्या मार्गदर्शनातून आणि संस्थेच्या पाठबळातून गौतम पब्लिक स्कूलचे विद्यार्थी विविध क्रीडा प्रकारांत जिल्हा, विभाग, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर आपली गुणवत्ता सिद्ध करीत आहेत. बुलढाणा येथील हॉकी स्पर्धेतील राज्यविजेतेपद आणि राष्ट्रीय स्तरावरील निवडी हे त्याचेच फलित आहे.

या यशामागे शाळेचे शारीरिक शिक्षक तथा हॉकी प्रशिक्षक रमेश पटारे यांचे सातत्यपूर्ण प्रशिक्षण आणि मार्गदर्शन महत्त्वपूर्ण ठरले. त्यांना इसाक सय्यद, राजेंद्र आढाव आणि महेश गोंडे यांचे सहकार्य लाभले.या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार अशोकरावजी काळे, विश्वस्त आमदार आशुतोष काळे, सचिव सौ.चैतालीताई काळे, सर्व गव्हर्निंग कौन्सिल सदस्य,संस्था इन्स्पेक्टर नारायण बारे, संस्थेचे पदाधिकारी व सदस्य, प्राचार्य नूर शेख यांनी खेळाडू आणि प्रशिक्षकांचे अभिनंदन केले.



राज्यविजेतेपदासह राष्ट्रीय स्तरावर पाच खेळाडूंना मिळालेली संधी ही गौतम पब्लिक स्कूलच्या क्रीडा क्षेत्रातील अलौकिक कामगिरीची साक्ष ठरली आहे.- सौ.चैतालीताई काळे.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26)

द•ख•ल

दीपावली निमित्त गरजूंना किराणा वाटप



माळवाडगांव : दीपावली निमित्ताने राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व जिल्हा बँकेचे चेअरमन डॉ.सुजय विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मुठेवाडगावमध्ये भाजप तालुका सरचिटणीस डॉ. शंकरराव मुठे यांच्या सहकार्याने किराणा सामान, साडी व कपडे वाटप करण्यात आले. यावेळी सोसायटीचे संचालक सेवानिवृत्त प्रा.रंगनाथ कोळसे ज्येष्ठ मार्गदर्शक अशोक मुठे शिवसेनेचे रमेश नाईक शालेय समिती अध्यक्ष संजय मुठे, बाळासाहेब मुठे, योगेश घोडेचोर, बळीराम मुठे, भाऊसाहेब मुठे, विश्वास क्षिरसागर धनंजय मुठे, भाऊसाहेब मुठे, सुमित मुठे, शंकर मुठे, भाऊ गोसावी, गणपतराव मुठे, योगेश मुठे, मारुती रूपटक्के, सचिन रूपटक्के आदी उपस्थित होते.

माळवाडगाव प्राथ. आरोग्य केंद्राचे आरोग्य निरीक्षकांकडुन कौतुक



माळवाडगांव : श्रीरामपुर तालुक्यातील माळवाडगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामधे राबविल्या जाणाऱ्या विविध शासकीय आरोग्य योजना व अभियानाअंतर्गत नागरीकांच्या व रुग्णांवर करण्यात येणाऱ्या उपचार सेवांबद्दल जिल्हा परीषदेचे आरोग्य निरीक्षक सचिन बनकर यांनी आरोग्य केंद्राचे कौतुक करत समाधान व्यक्त केले. अहील्यानगर जिल्हयातील विविध प्राथमिक आरोग्य केंद्रात कार्यालयीन कामकाजासाठी जिल्हा परीषद आरोग्य विभागातील पदाधिकारी भेट देत आहे.या दरम्यान आरोग्य निरीक्षक सचिन बनकर यांनी माळवाडगाव प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट दिल्यानंतर माझे गाव आरोग्य संपन्न गाव,बालकांचे लसीकरण, गरोदर माता तपासणी,बाह्यरुग्ण तपासणी यामधे आरोग्य केंद्राने केलेल्या उत्कृष्ट कामकाजाबद्दल बनकर यांनी माळवाडगांव आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ उन्मेश लोंढे,वआरोग्य सेवकांसह संपुर्ण स्टाफचे कौतुक केले. प्रत्येक आरोग्य योजना व अभियान उत्तमपणे राबविणाऱ्या जिल्ह्यातील ठराविक आरोग्य केंद्रांपैकी माळवाडगाव प्राथमिक आरोग्य केंद्र असल्याचे ते म्हणाले.

दाढ खुर्दला जोडणाऱ्या रस्त्यांची चाळण ; ग्रामस्थ संतप्त



आश्वी : शिर्डी विधानसभा मतदारसंघातील दाढ खुर्द (ता. संगमनेर) गावाला जोडणाऱ्या प्रमुख रस्त्यांची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे. रस्त्यांवरील जीवघेण्या खड्ड्यांमुळे वाहनचालकांसह ग्रामस्थांना मोठा त्रास सहन करावा लागत असून, अपघातांचा धोकाही वाढला आहे. दाढ बुद्रुक ते दाढ खुर्द, खळी ते दाढ खुर्द, झरेकाठी ते दाढ खुर्द आणि सोनगाव ते दाढ खुर्द या रस्त्यांची अक्षरशः चाळण झाली आहे. तसेच गावातील स्मशानभूमीकडे जाणारा रस्ताही खराब झाला आहे. त्यामुळे शालेय विद्यार्थी, रुग्ण, कामगार आणि अंत्यविधीसाठी येणाऱ्या नागरिकांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. प्रवरा नदीच्या पलीकडील गावांमधील रस्ते सुस्थितीत असताना नदीच्या अलीकडील दाढ खुर्द परिसरातील रस्त्यांकडे दुर्लक्ष का, असा संतप्त सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे. दाढ-चणेगाव-सोनगाव या प्रमुख रस्त्याचे तातडीने डांबरीकरण करावे, तसेच दाढ खुर्दला जोडणाऱ्या सर्व अंतर्गत व जोडरस्त्यांची दुरुस्ती करून डांबरीकरण करावे, अशी मागणी पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केली आहे.

माणसांची जिरवाजिरवी नव्हे, जमिनीत पाणी जिरविण्याला प्राधान्य

आमदार अमोल खताळ यांचा विरोधकांना अप्रत्यक्ष टोला । देवकौठेत १ कोटी ६ लाखांच्या विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

संगमनेर : मागील काळात तालुक्यात केवळ माणसांची जिरवाजिरवी करण्याचे राजकारण झाले. मात्र, आपण माणसांची जिरवाजिरवी करण्याऐवजी जमिनीत पाणी जिरविण्याला प्राधान्य देत आहोत. त्यासाठी लवकरच तालुक्यात जलसंधारणाची कामे हाती घेऊन गावोगावी बंधाऱ्यांची दुरुस्ती व खोलीकरणातून पाणीसाठा वाढविण्यावर भर दिला जाणार आहे, असे प्रतिपादन आमदार अमोल खताळ यांनी केले.

संगमनेर तालुक्यातील देवकौठे येथे शिवसेना शाखेचा शुभारंभ तसेच जगदंबामाता मंदिर सभामंडपासह सुमारे १ कोटी ६ लाख रुपयांच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन व



लोकार्पण आमदार खताळ आणि ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. आमदार खताळ म्हणाले, विकासकामे आणि केंद्र व राज्य सरकारच्या योजनांचा लाभ जनतेपर्यंत किती प्रभावीपणे पोहोचतो, हे महत्त्वाचे आहे. जनतेने परिवर्तनाचा घेतलेला निर्णय योग्य असल्याचे विकासकामांतून सिद्ध करण्याची जबाबदारी आपली आहे. विधानसभा निवडणुकीपासून जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांपर्यंत पाण्याचा प्रश्न केंद्रस्थानी राहिला आहे. त्यामुळे जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य दिले जाणार आहे.

गेल्या दोन वर्षांत तालुक्यातील प्रत्येक गावाशी जिव्हाळ्याचे नाते निर्माण झाले आहे. प्रत्येक कार्यकर्ता आणि नागरिक आपल्या परिवाराचा भाग आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि सर्वसामान्य जनता आपल्या पाठीशी असल्याने कोणाचीही भीती नाही. विरोधकांकडून अडचणी निर्माण करण्याचे प्रयत्न होत असले, तरी विकासकामांतूनच त्यांना उत्तर दिले जाईल, असा अप्रत्यक्ष टोला त्यांनी लगावला. निळवंडे धरणाच्या पाण्यामुळे देवकौठे परिसरातील टंचाई कमी होण्यास मदत झाली असून, कालव्यातून पाणी सोडल्याने बंधारे भरण्यास मदत होईल. त्यामुळे शेती आणि जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटण्यास हातभार लागेल, असेही त्यांनी सांगितले.

आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांनी मतभेद बाजूला ठेवून एकजुटीने काम करावे, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी ज्येष्ठ शिवसैनिक छबुराव सांगळे, जिल्हाप्रमुख विठ्ठल घोरपडे, तालुकाप्रमुख राजेंद्र सोनवणे, उद्योजक एकनाथ मुंगसे यांच्यासह पदाधिकारी, शिवसैनिक व ग्रामस्थ उपस्थित होते. प्रास्ताविक सुनील मुंगसे यांनी केले. सूत्रसंचालन गणेश कहांडळ यांनी केले, तर अभिमन्यू मुंगसे यांनी आभार मानले.

मक्तापुरच्या छत्रपती शिवाजी महाराज चौकाची गुरुवर्य भास्करगिरी बाबांकडून पहाणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नेवासा : तालुक्यातील मक्तापूर येथे अखंड हरिनाम सप्ताहाच्या भेटी प्रसंगी राष्ट्रसंत गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज यांनी छत्रपती शिवाजी महाराज चौकाची पाहणी करून चौकाच्या सुशोभीकरणासाठी आणि चांगले सामाजिक कार्य केल्याबद्दल ग्रामस्थांसह तरुणांचे विशेष कौतुक केले. गावागावांत व्यसनमुक्ती अभियान राबवून आदर्श गाव निर्माण करण्यासाठी तरुणांनी पुढाकार घ्यावा असे आवाहन गुरुवर्य श्री भास्करगिरीजी बाबांनी यावेळी बोलतांना केले.



यावेळी बोलताना भास्करगिरीजी महाराज म्हणाले की छत्रपती शिवाजी महाराज यांनी अल्पवयात स्वराज्याची स्थापना करून अन्याय आणि अत्याचाराच्या विरुद्ध लढा दिला. रयतेला न्याय देणारे जाणते राजे म्हणून त्यांचे कार्य आजही प्रेरणादायी आहे. छत्रपती संभाजी महाराज यांनी धर्मरक्षणासाठी दिलेले बलिदानही प्रत्येकाने स्मरणात ठेवले पाहिजे. त्यांच्या विचारांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून प्रत्येक मावळ्यांनी समाज आणि धर्माच्या रक्षणासाठी कार्य करावे. त्याचबरोबर गावागावांत व्यसनमुक्तीचे अभियान राबवून आदर्श गाव निर्माण करण्यासाठी तरुणांनी पुढाकार घ्यावा असे आवाहन त्यांनी केले.

मक्तापूर येथील मराठा सुकाणू समितीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष गणेश झगरे या तरुणाने जिजाऊ जयंती, शिवजयंती यांसह विविध महापुरुषांच्या जयंतीचे कार्यक्रम आयोजित करून गावात सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांची परंपरा निर्माण केली आहे. अशा तरुणांच्या कार्याचे अनुकरण इतरांनीही करावे. मक्तापूर गावात अशा कार्यकर्त्यांची चळवळ उभी राहणे गरजेचे आहे, असे गौरवोदगार ही भास्करगिरी बाबांनी काढले.

यावेळी मक्तापूर ग्रामस्थ व शिवभक्तांच्या वतीने भास्करगिरी महाराज यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी मराठा सुकाणू समितीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष गणेश झगरे, ज्ञानेश्वर महाराज हजारे, लक्ष्मीनारायण महाराज जोंधळे,माजी सरपंच रामकृष्ण कांगुणे,पंचायत समितीचे माजी सभापती रावसाहेब कांगणे, तुकाराम बर्डे, अविनाश जामदार, योगेश जामदार, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष दत्ताभाऊ कांगणे, शिवाजी दादासाहेब बर्डे, पत्रकार बाळासाहेब देवखळे, सागर कोळेकर, विकी कडवे, पोलीस पाटील अनिल लहारे, मनोज झगरे, लक्ष्मण बर्डे, अरुण कांगणे, संभाजी पोपटराव बर्डे, ह.भ.प. दिलीप महाराज बर्डे, मच्छिंद्र जामदार, गोरक्षनाथ बर्डे, सुरेश कोळेकर, संदीप विठ्ठल बर्डे, गंगाराम लहारे, आजिनाथ नानासाहेब जामदार, अक्षय भागवत, दीपक शिंदे, योगेश कांगणे, शुभम लहारे, अशोक भानुदास कांगणे, बाळासाहेब देवराव बर्डे यांच्यासह मक्तापूर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कोल्हारमध्ये खासदार वाकचौरे यांच्या हस्ते आनंदाच्या शिध्याचे वाटप



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून दिवाळीनिमित्त कोल्हार येथे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्या हस्ते गरीब व गरजू नागरिकांना आनंदाच्या शिध्याचे वाटप करण्यात आले. (छाया : गणेश कुंभकर्ण)

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

कोल्हार : उपमुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून दिवाळीनिमित्त गरीब, गरजू आणि सर्वसामान्य नागरिकांना आनंदाचा शिधा वाटप करण्यात आला. शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्या हस्ते कोल्हार येथील भगवती माता मंदिरात या उपक्रमाचा प्रारंभ करण्यात आला.

महाराष्ट्रावर दुष्काळाचे सावट निर्माण झाले असताना शेतकरी, शेतमजूर आणि गोरगरीब जनतेच्या मदतीला धावून जाण्याचे आवाहन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले आहे. 'भगवा खांद्यावर आणि शिवसैनिक बांधावर' या भूमिकेतून शिवसैनिकांनी आनंदाचा शिधा अधिकाधिक गरजूंपर्यंत पोहोचविण्यासाठी पुढाकार घेतला आहे. या उपक्रमातून कोल्हार-भगवतीपूर परिसरातील नागरिकांना दिवाळीच्या शुभेच्छाही देण्यात आल्या.

यावेळी शिवसेना जिल्हा संघटक विजुभाऊ काळे, उपजिल्हाप्रमुख शाम गोसावी, मुकुंद सिनगर, हाजी बब्बाभाई शेख, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष सुनीता शेळके, तालुकाप्रमुख अर्चना निबे, पूजा सोमवंशी, विद्यार्थी सेनेचे कामेश बोरुडे, उपतालुकाप्रमुख हर्षल बर्डे, शहरप्रमुख तुषार कनगरे, उपशहरप्रमुख शुभम पोपटे, भरत जाधव, शिवसेना गटप्रमुख अभिजित डांगे यांच्यासह शिवसैनिक उपस्थित होते. यावेळी जय भवानी, जय शिवाजी, आवाज कोणाचा शिवसेनेचा, अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

पाट पाण्याचे सात नंबरचे फॉर्म भरण्यासाठी शेतकऱ्यांची गर्दी



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पुणतांबा : गोदावरी उजव्या कालव्याला येत्या २० नोव्हेंबर रोजी शेतीसाठी पाणी सोडण्यात येणार आहे पाटपाणी मिळविण्यासाठी पाटबंधारे खात्याच्या चितळी शाखेच्या कार्यालयात ७ नंबरचे फॉर्म भरण्यासाठी शेतकरी वर्गाने काल मोठ्या गर्दी केली चितळी शाखेच्या अंतर्गत पुणतांबा, गोंडेगाव, जळगाव, एकरुखे, वाकडी , संभाजी नगर रामपूरवाडी सह ७ गावांचा समावेश असून अंदाजे २५०० लाभार्थी शेतकरी आहे चालू वर्षी दुष्काळी परिस्थिती असल्यामुळे रब्बी हंगामासाठी शेतकरी वर्गाने ७ नंबर फॉर्मच्या माध्यमातून पाटपाण्यासाठी मागणी नोंदविली आहे. चितळी शाखेच्या अंतर्गत शेतकरी वर्गाकडून पाणीपट्टी पोटी अंदाजे ९० लाख रुपये येणे बाकी आहे ७ नंबरचे फॉर्म स्वीकारतां ना अधिकारी व कर्मवारी वर्गाने थकित बाकी भरण्याची सक्ती केली नाही तरी सुद्धा अनेक शेतकरी वर्गाने स्वइच्छेने काही प्रमाणात थकित पाणी पट्टी ची रक्कम भरली शेतकरी वर्गाकडून सात नंबरचे फार्म स्वीकारण्यासाठी शाखा अभियंता ए. व्ही जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली अप्पा राहिंज व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी अचूक नियोजन करून शेतकरी वर्गाला सर्वतोपरि सहकार्य करून फॉर्म लवकर भरून घेण्यासाठी तत्पर सेवा दिल्यामुळे शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण होते. २० नोव्हेंबराला आर्वतन आल्यावर ७ नंबर फॉर्मवर प्रत्येक लाभार्थी शेतकऱ्याला प्रत्येक चारीवर मागणी प्रमाणे पाटपाण्याच्या अचूक वितरणाचे आव्हान चितळी शाखेच्या अधिकारी व कर्मचारी वर्गा कडे राहणार असून त्याचे नियोजन कसे राहणार याकडे परिसरातील शेतकरी वर्गाचे लक्ष लागून आहे.

खडका फाटा ते नेवासा रस्ता ठरतोय राजकीय अनास्थेचा बळी । ४ वर्षांपासून काम प्रलंबित

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नेवासा : विश्ववंद्य श्री संत ज्ञानेश्वर महाराजांनी ज्या पावन भूमीत ग्रंथराज 'ज्ञानेश्वरी'ची निर्मिती केली, त्या तीर्थक्षेत्र नेवासा आणि प्रसिद्ध मोहिनीराज मंदिराकडे जाणारा अत्यंत महत्त्वाचा खडका फाटा ते नेवासा मार्ग गेल्या ४ वर्षांपासून प्रलंबित अन् बिकट अवस्थेत पडून आहे. राजकीय अनास्था आणि प्रशासकीय दुर्लक्षामुळे अवघ्या ५ किलोमीटरच्या या रस्त्याचे काम रखडले असून, दररोज प्रवास करणारे ग्रामस्थ आणि भाविकांचे अतोनात हाल होत आहेत.

रस्त्याची तातडीची आवश्यकता का? असा सवाल युवा नेते अनिल पा. ताके यांनी केला आहे.तीर्थक्षेत्रांची जोडणी: घृष्णेश्वर, भद्रा मारुती (खुलताबाद) आणि श्रीक्षेत्र देवगड येथून येणारे हजारो भाविक नेवासा येथे दर्शनासाठी याच मार्गाचा वापर करतात.दिंड्या व वारकऱ्यांची वर्दळ: दर पंधरा दिवसांच्या एकादशीला येणाऱ्या शेकडो दिंड्या आणि आषाढी वारीच्या काळात लाखोंच्या संख्येने वारकरी याच रस्त्यावरून पायी प्रवास करतात. खड्डे आणि धुळीमुळे वारकऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.



भविष्यकालीन चौपदरीकरणाची गरज: वाढती वाहतूक आणि भाविकांची संख्या लक्षात घेता हा रस्ता चारपदरी (त्रींशी-डरपश) होणे अत्यंत गरजेचे आहे. मात्र, प्रत्यक्षात नेवासा बाजूकडील रस्ता ७ मीटर रुंद, तर खडका फाट्याकडील रस्ता अवघा ५.५ मीटर रुंद ठेवल्याने रुंदीत मोठी विसंगती निर्माण झाली आहे.

५ किमीच्या रस्त्यासाठी २ ठेकेदार; ३ किमीची दुरवस्था कायम!

गेल्या १० वर्षांपासून हा रस्ता जीर्णावस्थेत होता. निधी मंजूर झाल्यानंतर ५ किमी रस्त्यासाठी दोन वेगवेगळ्या ठेकेदारांची नेमणूक करण्यात आली. नेवासा बाजूकडील २ किमीचे काम वर्षभरापूर्वीच पूर्ण झाले असले, तरी खडका फाट्याकडील ३ किलोमीटरचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे आणि रखडलेले आहे. संबंधित ठेकेदाराने केलेले काम 'करून न केल्यासारखे' असून, रस्ता पूर्णपणे खड्ड्यांत गेला आहे.

मुदतवाढ, भाववाढ अन् अधिकारी-ठेकेदार साटेलोटे?शासकीय नियमांनुसार काम पूर्ण करण्याची मुदत कधीच संपली आहे. तरीही संबंधित ठेकेदाराला वारंवार मुदतवाढ आणि 'भाववाढ' दिली जात असल्याचा गंभीर आरोपही अनिल पा. ताके यांनी केला आहे. यामध्ये अधिकारी व ठेकेदार यांचे आर्थिक हितसंबंध असल्याचा संशय व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे, आमदारांचे गावही याच रस्त्याने जोडले जाते; तरीही वारंवार अधिकारी, आमदार आणि सरकारे बदलूनही या रस्त्याचे दुर्दैव बदललेले नाही. त्यामुळे या कामात नेमकं पाणी कुठे मुरतंय? असा संतप्त सवालही श्री ताके पा. यांनी केला आहे.

याप्रकरणी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता, नेवासा उपविभागीय अभियंता, संबंधित शाखा अभियंता यांनी तातडीने पूर्ततः खडका फाटा ते नेवासा रस्त्याचे रखडलेले काम प्राधान्य क्रमाने व दर्जेदार पद्धतीने तात्काळ संबंधित ठेकेदाराकडून पूर्ण करून घ्यावे व गुणवत्ता तपासणी: झालेल्या निकृष्ट कामाचे मूल्यमापन 'दक्षता व गुण नियंत्रण विभागा'मार्फत करून दोषी ठेकेदार व अधिकाऱ्यांवर कारवाई करावी.अशी मागणी आपण स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचे कडे करणार आहे.

CHANGE OF NAME

I Have Change My Old Name
Mobina Aijaj Shaikh
(In Passport No.A6789239)
(Before Name)
To New Name As
Mubina Aijaz Shaikh
(Aadhaar No.-6668-0649-0259)
From Vide Affidavit Before Notary Public Shrirampur
Place : Shrirampur
Date : 16/11/2026

ओव्हरलोड रोहित्रांचा प्रश्न सुटणार । जिल्हा नियोजन मधून १.५२ कोटी निधीस प्रशासकीय मान्यता

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

कोळपेवाडी : कोपरगाव मतदारसंघातील ग्रामीण भागातील वीजपुरवठ्याची समस्या दूर करून शेतकरी आणि नागरिकांना सुरळीत वीज उपलब्ध व्हावी, यासाठी आमदार आशुतोष काळे यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले आहे. सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना २०२६-२७ अंतर्गत मतदारसंघातील विविध गावांमध्ये नवीन वीज रोहित्र बसविणे, ओव्हरलोड वीज रोहित्रांची क्षमता वाढविणे, रोहित्रांचे स्थलांतर करणे तसेच आवश्यक ठिकाणी पोल उभारण्याच्या कामांसाठी १ कोटी ५२ लाख रुपयांच्या निधीस जिल्हा नियोजन समितीकडून प्रशासकीय देण्यात आली असल्याची माहिती आ.आशुतोष काळे यांनी दिली आहे.

मतदारसंघातील अनेक गावांमध्ये वीज रोहित्रांवर वाढता विद्युतभार असल्यामुळे शेतकरी आणि ग्रामस्थांना कमी दाबाने वीजपुरवठा, वारंवार वीज खंडित होणे अशा समस्यांना सामोरे जावे लागत होते. याबाबत शेतकऱ्यांकडून सातत्याने नवीन रोहित्र बसविण्याची तसेच सध्याच्या रोहित्रांची क्षमता वाढविण्याची मागणी होत होती. या मागण्यांची दखल घेत आ. आशुतोष काळे यांनी शासनस्तरावर पाठपुरावा केला होता. त्यापाठपुराव्याची शासनाने दखल घेवून या कामांना निधी उपलब्ध करून दिला आहे.



या निधीतून सुरेगाव येथील कदम वस्ती डी.पी.व काटवन डी.पी.या ठिकाणी दोन वीज रोहित्र, कोपरगाव शहरातील खडकी येथील गवारे वस्ती डी.पी., अंजनापूर गावठाण डी. पी., कासली येथील गायकवाड वस्ती डी. पी., नाटेगाव येथील बरड डी.पी., खोपडी येथील बाळासाहेब वारकर डी.पी., भोजडे येथील गाढवलोळी डी.पी., कोकमठाण येथील गोरख लोहकणे डी.पी., शहाजापूर येथील धायगुडे डी.पी., डाऊच बु. येथील दहे डी.पी., वाकडी येथील झोटिंग बाबा डी.पी., पुणतांबा येथील चव्हाण वस्ती डी.पी.,सडे येथील पाणीपुरवठा योजना नवीन डी.पी.आणि हिंगणी येथे बढे डी.पी. या ठिकाणच्या ओव्हरलोड रोहित्रांची क्षमता वाढवून अधिक क्षमतेचे रोहित्र बसविण्यात येणार आहेत.

तसेच पोहेगाव येथे पिंपळादेवी मंदिर ते वत्सल मॉडेल स्कूल या ठिकाणी नवीन गावठाण डीपी बसविण्यात येवून केबल आणि स्ट्रीट लाईट पोलसह बसविण्यात येणार आहे. ओव्हरलोड वीज रोहित्रामुळे वीज पुरवठ्यात येणाऱ्या अडचणी दूर होणार असल्यामुळे तसेच वीज रोहीत्रासह केबल आणि स्ट्रीट लाईट पोलसह बसविण्याची मागणी पूर्ण होणार असल्यामुळे सुरेगाव, कोपरगाव खडकी, अंजनापूर, कासली, नाटेगाव, खोपडी, भोजडे, कोकमठाण, शहाजापूर, डाऊच बु.वाकडी, पुणतांबा, सडे, हिंगणी आदी गावातील नागरीकांनी आमदार आशुतोष काळे यांचे आभार मानले आहे.

जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून मंजूर झालेल्या या निधीमुळे ग्रामीण भागातील वीज वितरण व्यवस्था अधिक सक्षम होण्यास मदत होणार आहे. रोहित्रांची क्षमता वाढल्यामुळे वाढत्या विद्युतभाराचा प्रश्न कमी होऊन शेतकऱ्यांना शेतीपंपांसाठी, तर ग्रामस्थांना घरगुती वापरासाठी अधिक सुरळीत आणि दर्जेदार वीजपुरवठा उपलब्ध होणार आहे. वीज समस्यांमुळे होणारी गैरसोय दूर होण्यास या कामांचा फायदा होणार आहे.

शेतकरी आणि ग्रामस्थांच्या मागण्यांना प्राधान्य देऊन या कामांसाठी निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल आ.आशुतोष काळे यांनी राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस,उपमुख्यमंत्री श्रीमती ना.सुनेत्राताई पवार,उपमुख्यमंत्री ना.एकनाथजी शिंदे व पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांचे आभार मानले आहे.

जाहिर प्रगटन

क्रमांकः कावि/फौजदारी/ ३७२/२०२६
तहसिल कार्यालय नेवासा
तालुका नेवासा जि. अहिल्यानगर
दिनांकः १४/१०/२०२६

अर्जदार उत्तम बाबुराव तागड रा. वडुले जि. अहिल्यानगर यांनी त्यांचा मुलगा कै. संतोष उत्तम तागड दिनांक २०/०२/२०२६ रोजी मयत झालेले आहे. मयत व्यक्ती हे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी (महावितरण नेवासा बु. ता. नेवासा येथे वरीष्ठ तांत्रीक या पदावर सेवेत होते. शासकीय सेवेतील त्यांच्या जमा कुटुंब निवृत्ती वेतन । जी.पि.एफ रक्कम / पेन्शन रक्कम / भविष्य निर्वाह रक्कम या कामासाठी Heirship Certificate मिळण्यासाठी या कार्यालयास अर्ज सादर केलेला आहे. सदरच्या अर्जात त्यांना खालील प्रमाणे वारस असल्याचे नमुद केलेले आहे.

अ.क्र.	वारसांची नावे	वय आधार कार्ड नुसार	मयताशी नाते
१.	रेणुका संतोष तागड	१६	मुलगी
२.	सार्थक संतोष तागड	१०	मुलगा

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील Heirship Certificate बाबतचे कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटनाच्या तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदारास Heirship Certificate निर्गमित करण्यात येईल.

तहलिसदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी नेवासा

जाहीर नोटीस

आमचे अशिल कल्पवृक्ष डेव्हलपर्स चे भागीदार यांनी दिलेल्या माहितीवरुन, सांगितलेवरुन व दाखविलेल्या कागदपत्रावरुन तमाम लोकांना या नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, आमचे अशील कल्पवृक्ष डेव्हलपर्स चे भागीदार यांचे मालकीहक्काच्या व कब्जेवहिवाटीत असलेल्या मौजे मुकिंदपूर ता. नेवासा, जि. अ.नगर येथील गट नं ६९/२/१ क्षेत्र ११०००.०० चौ.मी. त्यासी आकार ९६० रु०० पै या मिळकतीत बांधलेल्या फ्लॅट मिळकती संदर्भात आमचे अशील यांनी जनरल मुखत्यारपत्र दस्त क्र.५९३/२०१४ दि.१२/०२/२०१४ अन्वये निवृत्ती अण्णा मोटे, दस्त क्र. १३४/२०१७ दि.१३/०१/२०१७ अन्वये दिपक रामनाथ घाडगे, दस्त क्र.५१४/२०१८ दि.०६/०२/२०१८ अन्वये शशिकांत शिवाजीराव देशमुख व दस्त क्र. १३५६/२०२१ दि.०१/०३/२०२१ अन्वये चंद्रकला निवृत्ती मोटे यांना लिहून दिले होते. सदर दस्ता अन्वये वर नमूद मिळकतीचे मालक यांनी जनरल मुखत्यारपत्र लिहून घेणार यांना सदर मिळकतीबाबत खरेदी, विक्री, विसार स्वीकारणे, तसेच मालक म्हणून खरेदी खत, विसार पावतीवर सह्या करण्याचे अधिकार दिले होते. सदर वर नमुद दस्ता अन्वये जनरल मुखत्यारपत्र लिहून घेणार यांना सदर मिळकतीचे मालक यांनी दिलेले सर्व अधिकार आजरोजी या जाहीर नोटीसीद्वारे काढून स्वतःकडे घेत आहेत व वर नमुद जनरल मुखत्यारपत्र रद्द केलेले आहेत याची सर्व जनतेने नोंद घ्यावी. तसेच वर नमुद व्यक्ती जनरल मुखत्यारपत्र लिहून घेणार यांचेशी वर नमूद मिळकतीत असलेल्या फ्लॅट संदर्भात कोणत्याही प्रकारचा व्यवहार करू नये. अगर तसे केल्यास त्यास कल्पवृक्ष डेव्हलपर्स व त्यांचे भागीदार यांचेवर बंधनकारक राहणार नाही. मग त्याचे होणारे परिणामाचे जबाबदारी आमचे अशीलावर राहणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

ही जाहीर नोटीस प्रसिद्ध केले असे.
नेवासा
दिनांक ०६/११/२०२६
नोटीस देणार तर्फे

ॲड. कल्याण गणपत पिसाळ
एम. कॉम., एलएल. बी.
ॲडव्होकेट ऑन पॅनल
स्टेट बँक ऑफ इंडिया
९८६०७२९००८/८४५९०१६२४६

पान १ वरुन

मुख्यमंत्री फडणवीस हेच ते 'मफलरमॅन'

म्हणाले. दरम्यान, या आरोपांवर भारतीय जनता पक्षाकडून तीव्र प्रतिक्रिया उमटली असून, रोहित पवार यांचे हे कृत्य निषेधार्ह असल्याचे भाजपने म्हटले आहे. तसेच, या प्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) आणि ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी आपली भूमिका तातडीने स्पष्ट करावी, अमशी मागणी भाजपच्या वतीने करण्यात आली आहे. तस्करीसाठी केला जात असल्याचा गंभीर संशयही त्यांनी व्यक्त केला.

व्ही. के. सिंह यांच्या २७ कंपन्यांमधून सुमारे ८६८ कोटी रुपयांचे संशयास्पद आर्थिक व्यवहार झाले असून, याबाबत आयकर विभाग आणि ईडीला माहिती देऊनही अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही, असेही ते

लसीकरणाच्या नावाखाली सायबर भामट्यांचा नवा डाव!

पडू नये अशा सूचना दिल्या आहेत. अंगणवाडी सेविकांनाही सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सोशल मीडियावर व्हिडिओ प्रसारित करून नागरिकांमध्ये जनजागृती करण्याचा प्रयत्नही करण्यात आला आहे.कुंभमेळा च्या पार्श्वभूमीवर वाहतूक कोंडी फोडण्यासाठी रस्त्यांच्या कामांचा शुभारंभ या कामासाठी अंदाजे ३ कोटी १४ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. दुसऱ्या कामांतर्गत सदर नाला क्रमांक ३२ लगतच्या रस्त्यापासून कनकुरी रस्त्यापर्यंत, संस्थानच्या नवीन शैक्षणिक संकुल व वृद्धाश्रमासमोरून जाणारा सुमारे २ किलोमीटर लांबीचा व ७ मीटर रुंदीचा रस्ता विकसित करण्यात येणार आहे. या कामासाठी अंदाजे ५ कोटी ७७ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे.या दोन्ही रस्त्यांचे रुंदीकरण, खडीकरण व डांबरीकरण करण्यात येणार आहे. त्यामुळे केवळ कुंभमेळ्याच्या काळातच नव्हे, तर वर्षभर शिर्डीला येणाऱ्या भाविकांच्या वाहनांची वाहतूक सुलभ होणार असून, परिसरातील नियोजित वाहनतळांपर्यंत पोहोचणेही सोपे होणार आहे. विशेषतः नगर-मनमाड रस्ता, शिर्डी बायपास आणि कनकुरी रस्ता या तीन महत्त्वाच्या मार्गांना हे नवे रस्ते जोडले जाणार असल्याने वाहतुकीचा ताण विभागला जाणार आहे. या शुभारंभ कार्यक्रमास मौजे निमगाव कोऱ्हाळे ग्रामपंचायतीचे सरपंच कैलास कातोरे, संस्थानचे सल्लागार प्रतीक गांगुर्डे, संस्थानचे प्र. कार्यकारी अभियंता गणेश कोराटे, कनिष्ठ अभियंता जाधव, ठेकेदार श्री. येवले (संगमनेर) तसेच निमगाव येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कुंभमेळ्याच्या दृष्टीने शिर्डी परिसरात पायाभूत सुविधा उभारण्याचे काम संस्थानने वेळेत सुरू केल्याबद्दल ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

'गुलाबी थंडी'ची सुखद चाहूल

तर राज्यात पुढील ५ दिवस पावसाचा अंदाज नसला, तरी चक्रीवादळाच्या दिशेनुसार हवामानात बदल होऊ शकतो, असा अंदाज आहे. राज्यातपुणे येथे राज्यातील सर्वात कमी १२.१ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. तर तिकडे, नाशिककर देखील थंडीने गारठले असून नाशकात तापमान १२.६ अंशावर पोहचले आहे. यंदा रविवारी हंगामातील आतापर्यंतच्या निचांकी १२.६ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद करण्यात आली आहे. तर उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यांच्या प्रवाहामुळे देखील वातावरणात गारवा जाणवत आहे. दरम्यान, केवळ थंडी वाढली नसून, पहाटेचा कडाका आणि दुपारचे ऊन यातील तफावतीमुळे आरोग्याचा प्रश्न निर्माण देखील निर्माण झाला आहे. गेल्या आठ दिवसांत शहराच्या किमान तापमानात १.६ अंश सेल्सिअसची घसरण झाल्याची माहिती प्रादेशिक हवामान विभागाने दिली आहे.

कमी उंचीमुळे राहुरी रेल्वे स्टेशन भुयारी मार्गावरील लोखंडी कमान ऊस वाहतुकीस अडथळा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

राहुरी : राहुरी रेल्वे स्टेशनवरील भुयारी मार्गावर रेल्वे प्रशासनाने उभारलेली लोखंडी कमान ऊस वाहतुकीसाठी मोठाअडथळा ठरत आहे. या कमानीची उंची भुयारी मार्गाच्या तुलनेत कमी असल्याने ऊस वाहतूक करणारे ट्रक व ट्रॅक्टर त्या कमानीखाली अडकत आहेत. तात्पर्याने वाहनांमधील ऊस खाली पडून शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. राहुरी रेल्वे स्टेशन येथील भुयारी मार्गातून ऊस वाहतूक करणारी वाहने सहजपणे बाहेर पडतात. मात्र, राहुरी शहराच्या बाजूला असलेल्या लोखंडी कमानीजवळ आल्यानंतर ऊसाने भरलेल्या वाहनांना अडथळा निर्माण होत आहे. कमानीची उंची कमी असल्याने वाहनांवरील ऊस कमानीला अडकतो. परिणामी ऊस खाली पडतो, तर काही वेळा वाहनचालकांना कसरत करावी लागते. यामुळे ऊस वाहतुकीस विलंब होण्याबरोबरच शेतकऱ्यांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. विशेष म्हणजे, ऊस गळीत हंगाम सुरू झाला की दरवर्षी हीच समस्या निर्माण होते. ऊस तोडणी करून वेळेत कारखान्यापर्यंत पोहोचविण्याची धावपळ सुरू असताना रेल्वे प्रशासनाच्या या कमी उंचीच्या कमानीमुळे शेतकरी आणि वाहतूकदारांना त्रास सहन करावा लागत आहे. रेल्वे प्रशासनाने या समस्येची दखल घेऊन राहुरी बाजूकडील लोखंडी कमानीची उंची भुयारी मार्गाच्या उंचीइतकी वाढवावी, अशी मागणी शेतकरी व ऊस वाहतूकदारांकडून होत आहे. दरवर्षी उद्भवणाऱ्या या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करून शेतकऱ्यांचे होणारे आर्थिक नुकसान थांबवावे, अशी अपेक्षा शेतकरी वर्गाकडून व्यक्त केली जात आहे



संगमनेरच्या सहकाराची ताकद जिल्ह्याने पुन्हा अनुभवली : रणजितसिंह देशमुख

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

संगमनेर : संपूर्ण जिल्ह्याने पुन्हा एकदा मान्य केले आहे की, संगमनेरचे नेतृत्व, संगमनेर तालुका आणि येथील सहकाराच्या ताकदीशिवाय जिल्ह्यालाही पर्याय नाही. जिल्हा बँकेच्या निवडणुकीच्या माध्यमातून ही बाब पुन्हा एकदा सिद्ध झाली आहे. राज्यात आपले सरकार नाही, सत्ता आपल्या हातात नाही. मात्र, जिल्हा बँकेच्या निवडणुकीत संपूर्ण जिल्ह्यातील नेते आणि आमदार एकत्र येऊन काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्याकडे आले. बँकेचे नेतृत्व आपण करावे, बँकेची जबाबदारी स्वीकारावी, अशी विनंती त्यांनी थोरात यांना केली. त्यानुसार थोरात यांनी ही जबाबदारी स्वीकारून पुढील वाटचाल करण्याचे काम केले. हीच आपल्या सहकाराची खरी ताकद आहे, असे प्रतिपादन जिल्हा बँकेचे नवनिर्वाचित उपाध्यक्ष रणजितसिंह देशमुख यांनी केले.

देशमुख म्हणाले की, संगमनेर तालुक्यात तब्बल ७१५ सहकारी संस्था आहेत. या संस्था केवळ कागदावर अस्तित्वात नसून प्रत्यक्षात चांगल्या पद्धतीने कार्यरत आहेत. एका बाजूला संपूर्ण जिल्हा असताना काही तालुक्यांमध्ये १२५,



तर काही तालुक्यांमध्ये २५० सहकारी संस्था आहेत. कोपरगाव तालुक्यात सुमारे ५३०, तर नगर तालुक्यात ४०० संस्था आहेत. मात्र, संगमनेर हा जिल्ह्यातील एकमेव तालुका आहे, जिथे ७१५ सहकारी संस्था कार्यरत आहेत. हीच संगमनेरच्या सहकाराची खरी ताकद आहे. जिल्ह्यानेही या ताकदीची दखल घेत संगमनेरच्या नेतृत्वाशिवाय पर्याय नसल्याचे दाखवून दिले आहे.

ही ताकद केवळ आकडेवारीपुरती मर्यादित नाही, तर जिल्हा बँकेच्या निवडणुकीतूनही ती स्पष्ट झाली आहे. आपल्या पॅनलला तालुक्यातून मोठ्या प्रमाणावर मतदान झाले. संगमनेर तालुक्यातील सुमारे ८८ टक्के मतदान आपल्या बाजूने झाले, तर केवळ १० ते १२ टक्के मतदान विरोधात गेले. या मतदानातून सहकार क्षेत्रातील एकजूट आणि नेतृत्वावरील विश्वास दिसून आला. या निवडणुकीच्या माध्यमातून संगमनेरच्या सहकाराची ताकद संपूर्ण जिल्ह्याच्या लक्षात आली आहे.

स्वर्गीय सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात आणि त्यांच्या जुन्या सहकाऱ्यांनी संगमनेरमध्ये खऱ्या अर्थाने सहकाराची भक्कम उभारणी केली. केवळ सहकारी संस्था स्थापन केल्या नाहीत, तर त्या कशा पद्धतीने चालवाव्यात, याची शिस्तही त्यांनी घालून दिली. संस्थांचे कामकाज कसे असावे, नियोजन कसे करावे, पारदर्शकता कशी राखावी, याबाबत त्यांनी आदर्श नियमावली तयार केली. आजही याच शिस्तीने आणि पारदर्शकतेने तालुक्यातील सहकारी संस्था काम करीत आहेत.

माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली गेल्या २५ ते ३० वर्षांपासून या सहकारी संस्थांची यशस्वी वाटचाल सुरू आहे. भाऊसाहेब थोरात यांनी घालून दिलेला सहकाराचा आदर्श आणि शिस्त पुढे नेण्याचे काम बाळासाहेब थोरात यांनी केले आहे. त्यांचे सहकारी संस्थांच्या कामकाजाकडे नेहमीच बारकाईने लक्ष असते. सहकार हीच संगमनेरची खरी ताकद असून, जिल्हा बँकेच्या निवडणुकीच्या माध्यमातून या ताकदीचा अनुभव संपूर्ण जिल्ह्याला आला आहे.

तालुक्यातील सहकारी संस्था आणि बाळासाहेब थोरात यांचा प्रतिनिधी म्हणून मला जिल्हा बँकेच्या उपाध्यक्षपदावर काम करण्याची संधी मिळाली, ही माझ्यासाठी अभिमानाची आणि भाग्याची बाब आहे. स्वर्गीय सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांनी जिल्हा बँकेत ज्या पदांवर काम केले, त्याच पदावर काम करण्याची संधी मला मिळाली आहे. आपण आमच्यावर जो विश्वास दाखविला आहे, त्या विश्वासाला आम्ही पूर्णपणे पात्र ठरू. संगमनेरच्या सहकाराच्या परंपरेला आणि लौकिकाला साजेसे काम जिल्हा बँकेत करून दाखवू.

- रणजितसिंह देशमुख, उपाध्यक्ष, जिल्हा बँक

शिवमहापुराण कथेत शिव-पार्वती विवाह सोहळ्याची रंगत!

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : दिल्ली गेट येथील सिद्धेश्वर महादेव मंदिर व श्री साई डरका सेवा ट्रस्ट तसेच उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या संकल्पनेतून आयोजित शिवमहापुराण कथा सप्ताहाचा चौथा दिवस शिव-पार्वती विवाह सोहळ्याने भक्तिमय वातावरणात रंगला. ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांनी आपल्या ओघवत्या वाणीतून विवाह सोहळ्याचे निरूपण केले. यानिमित्त व्यासपीठावर प्रत्यक्ष पारंपरिक पद्धतीने विवाह सोहळा साकारण्यात आला. पुष्पवृष्टी आणि भाविकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. माता पार्वती यांनी भगवान शिव यांना पती म्हणून प्राप्त करण्यासाठी कठोर तपश्चर्या केली. त्यांच्या भक्तीने प्रसन्न होऊन भगवान शिव यांनी विवाहास संमती दिली. शिव-पार्वती विवाह हा प्रेम, श्रद्धा, त्याग, समर्पण आणि शक्तीचा संगम असल्याचे महाराजांनी कथेतून स्पष्ट केले. यावेळी बोलताना समाधान महाराज शर्मा म्हणाले, जगाच्या कल्याणासाठी महादेवांनी विवाह केला. धार्मिकतेतून संस्कारित पिढी निर्माण होते. बेईमानीचे जीवन जगण्यापेक्षा थोडे जगा, पण चांगले जगा. आपल्या कुटुंबातील माणसांची किंमत ते सोबत असतानाच ओळखली पाहिजे. समाजात वावरताना समाजाच्या कल्याणासाठी काम केले पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.

उसाचा मनमाभिनी भाव ठरवताना शेतकरी शांत का ? शेतकरी संघटनेच्या जिल्हाध्यक्षांचा सवाल

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : अहिल्यानगर जिल्ह्यातील साखर कारखानदार एकत्र येऊन मनमानी ऊसाचा भाव ठरवत असताना ऊस उत्पादक शेतकरी शांत का असा सवाल शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष विठ्ठलराव शेळके यांनी एका पत्रकाद्वारे केला आहे. पत्रकात शेळके यांनी म्हटले आहे की मागील गळीत हंगामात साखर टेंडर चार हजार होते त्या गळीतास काही साखर कारखान्याने तीन हजार ते तीन हजार दोनशे दर दिला या वर्षी साखर टेंडर पाच हजार पाचशे रुपये काही कारखान्याचे पाच हजार सातशे रुपये निघत असताना जिल्हा बँकेच्या निवडणुकीत एकमेकांना कट्टर विरोधक समजले जाणारे नेते एकत्र येऊन बँक ताब्यात घेतली. तीच बँक अनेक साखर कारखान्याला कर्जपुरवठा करते. शेतकरी संघटनेने दोन महिन्यापासून शेतकरी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष अँड अजीत काळे याच्यामाफत ऊसाला पहीली उचल प्रती टन चार हजार रूपये ध्यावी असी मागणी केली. अन्यथा आम्ही साखर विकू देणार नाही तसेच राहुरी नेवासा येथे रास्तारोको केले. पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी बैठक घेऊन वेळकाढू पणा करुन ऊस उत्पादकाचा विश्वासघात केला असल्याचे मत विठ्ठलराव शेळके यांनी मांडले जे साखर कारखानदार एक टन ऊसापासून बारा तेरा हजार रुपये मिळवीतात. त्यांनी तीन हजार दोनशे व काही कारखान्याने तीन हजार शंभर असे पेमेंट वर्ग करत आहे हे त्यांना शोभते का गेली तीन पिढयापासून हे कारखान्याची सत्ता एक विचाराने आपणाकडे ठेवतात हे असताना ऊस उत्पादक सहन करतात हे मोठे दुर्दैव्य आहे. अरे शेतकरी भावानो आपल्या एक टनापासून साखर कारखान्याच्या चेअरमन यांच्या खिशात किती पैसे राहतात याचा हिशोब सर्वांना माहीत असताना ऊस उत्पादक शांत का असा सवाल शेळके यांनी केला आहे जिल्ह्यमध्ये एक हजार टन उत्पादन घेणारे शेतकरी यांनी आपल्या कष्टांनी पिकविलेल्या ऊस भावा करीता तरी शेतकरी संघटनेच्या अंदोलनात सहभागी व्हावे जर संख्या वाढली तर साखर कारखानदार नमतील व ऊसाला किमान चार हजार रूपये मिळू शकतात पुढील अंदोलन हे विखे थोरात काळे कोल्हे या चार कारखान्यावर करणार असल्याचे विठ्ठलराव शेळके यांनी म्हटले आहे


निधनवार्ता

वच्छलाबाई माळवदे



दहिगाव- ने - ढोरसडे (ता. शेवगाव) येथील गं.भा. वच्छलाबाई किसनराव माळवदे पाटील यांचे नुकतेच वयाच्या ९१ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात ३ मुले, ४ मुली, सुना, नातू, पणतू असा मोठा परिवार आहे. सेवानिवृत्त पाटबंधारे अधिकारी एकनाथ किसनराव माळवदे, माजी सरपंच रघुनाथ किसनराव माळवदे व पोलीस पाटील पांडुरंग किसनराव माळवदे यांच्या मातोश्री तर माजी सरपंच गुरुनाथ माळवदे व ढोरसडे विद्यमान चेअरमन भाऊराव माळवदे यांच्या त्या आजी होत्या.

वत्सलाताई शिंदे



प्रवरानगर : राहाता तालुक्यातील लोणी बुद्रुक(मुळगाव पढेगाव ता.कोपरगाव) येथील जुन्या पिढीतील गं.भा. वत्सलाताई गंगाधर शिंदे यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले.त्या १०० वर्षांच्या होत्या.त्यांच्या मागे दोन मुले,दोन मुली,सुना, नातवंडे असा परिवार आहे.राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.मुकुंद गंगाधर शिंदे यांच्या त्या मातोश्री होत

कै.गं.भा.अनुसया मोरगे



श्रीरामपूर - शहरातील जुन्या पिढीतील कै.गं.भा. अनुसया विश्वनाथ मोरगे (वय ९५ वर्षे) यांचे शनिवारी (ता.१४) निधन झाले. त्यांचे पश्चात तीन मुले, तीन मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. संगमनेर रोड, मोरगे मळ्यातील प्रगतशील शेतकरी बबनराव मोरगे, राजेंद्र मोरगे व मोरगे वॉटर सप्लायर्सचे सतिष मोरगे आणि कलावती सप्रे, सौ.शिला आरगडे व शोभा गाढे यांच्या त्या मातोश्री होत.

दुष्काळी गावांच्या जलसाठ्यांना निळवंडेच्या आवर्तनाचा आधार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

कोळपेवाडी : यंदाच्या भीषण दुष्काळी परिस्थितीची तीव्रता लक्षात घेऊन जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या समयसूचकतेतून निळवंडे धरणाच्या डाव्या व उजव्या कालव्यांना आवर्तन सोडण्यात आले आहे. या आवर्तनाचा लाभ कोपरगाव विधानसभा मतदारसंघातील जिरायती गावांसह संपूर्ण लाभक्षेत्रातील नागरिकांना देवून तळेगाव शाखा कालव्यातून सर्व साठवण तलाव, गाव तलाव, बंधारे व ओढे पूर्ण क्षमतेने भरून देण्याचे निर्देश आमदार आशुतोष काळे यांनी पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना दिले आहेत.

कोपरगाव मतदारसंघातील जिरायती गावांसाठी निळवंडे कालवे जलदूत ठरले आहेत. मात्र, यंदा पावसाने ओढ दिल्यामुळे निर्माण झालेल्या भीषण दुष्काळी परिस्थितीने शेतकरी, ग्रामस्थ आणि पशुधनाच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला होता. अशा परिस्थितीत निळवंडेच्या डाव्या व उजव्या कालव्यांना आवर्तन सोडण्याचा निर्णय घेतल्यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. या निर्णयाबद्दल आ.आशुतोष काळे यांनी जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांचे आभार मानले आहेत.

सध्या सोडण्यात आलेल्या आवर्तनातील पाण्याचा जास्तीत जास्त लाभ दुष्काळग्रस्त गावांना मिळावा, या उद्देशाने आ.आशुतोष काळे यांनी पाटबंधारे



विभागाला विशेष सूचना केल्या आहेत. मतदारसंघातील जिरायती गावांसह संपूर्ण लाभक्षेत्रातील साठवण तलाव, गाव तलाव, बंधारे आणि ओढे पूर्ण क्षमतेने भरून देण्यात यावेत. त्यामुळे पुढील आवर्तन येईपर्यंत ग्रामस्थ आणि जनावरांच्या पिण्याच्या पाण्याची उपलब्धता कायम राहण्यास मदत होईल. तसेच निळवंडे वितरिका पाईपलाईनचे उर्वरित कामे तातडीने पूर्ण करावीत, जेणेकरून आवर्तनातून व्हॉल्व्हडरे पाणी देता येऊन लाभक्षेत्रातील गावांपर्यंत पाणी जलदगतीने पोहोचविणे शक्य होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, पाटबंधारे विभागाचे उपअभियंता महेश गायकवाड यांनी सांगितले आहे की, निळवंडे कालव्यांचे आवर्तन सोडण्यात आले असून तळेगाव ब्रांचला २१ किंवा २२ तारखेला पाणी सोडण्यात येणार असून सुरू असलेल्या आवर्तनातून लाभक्षेत्रातील सर्व साठवण तलाव, गाव तलाव व बंधारे पूर्ण क्षमतेने भरून देण्याची ग्वाही दिली आहे. तसेच उपअभियंता आसिफ शेख यांनी निळवंडे वितरिका पाईपलाईनचे उर्वरित कामे लवकरच सुरू करण्यात येणार असल्याचे सांगितले.

ऋषी फाउंडेशन कार्यालय भोकर येथे लाडकी बहीण योजना ई-केवायसी सुरू

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

टाकळीभान: महाराष्ट्र सरकारची लोकप्रिय, महत्त्वकांक्षी व महिलांना आधार ठरलेली ' माझी लाडकी बहीण योजना 'महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शिवसेना पक्षाचे मुख्य नेते व महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली सरकारने सुरू केली आहे. परंतु यामध्ये काही महिलांना तांत्रिक अडचणीमुळे ज्यांची लाडकी बहीण योजनेचे रक्कम जमा होण्याचे बंद झाले आहे. त्यांना ई केवायसी करून घेणे बंधनकारक व अनिवार्य असल्याने सदर योजनेच्या ई केवायसी संदर्भात लोकनेते माजी आ. भानुदासजी मुरकुटे साहेब यांच्या नेतृत्वाखाली तसेच शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे व माजी आ. भाऊसाहेब कांबळे साहेब व शिवसेनेचे युवा नेते नीरज भैया मुरकुटे यांच्या सहकार्याने भोकर येथे माझी लाडकी बहीण योजनेची ई-केवायसी प्रक्रिया आज दि. १७/११/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता ऋषी छल्लारे फाउंडेशन कार्यालय, भोकर येथे ई-केवायसी प्रक्रिया सुरू करण्यात येत आहे.

ज्या पात्र महिलांना तांत्रिक अडचणीमुळे या योजनेचा लाभ मिळत नाही किंवा त्यांचे पैसे जमा होत नाहीत, अशा महिलांनी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करून घेण्यासाठी सरकारने ई केवायसी पोर्टल सुरू केले आहे. सदर पोर्टल ठराविक दिवसच सुरू राहणार असून त्यामुळे ज्या महिलांना लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळवण्यासाठी ई-केवायसी करावयाची असेल त्यांनी भोकर येथील ऋषी फाउंडेशन कार्यालय येथे आज मंगळवार दि. १७ तारखेपासून संपर्क साधावा.

व ई केवायसी अपूर्ण असलेल्या महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन ऋषी छल्लारे फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष गणेश उर्फ किशोर छल्लारे यांनी केले आहे. यामुळे या योजनेपासून वंचित राहणाऱ्या अनेक महिलांना ई केवायसी प्रक्रिया सुरू झाल्याने या योजनेचा परत लाभ घेता येणार आहे व त्यांना या योजनेचा मोठा आधार मिळणार आहे.

शुभ लाभ

Date	Mon	Tue	Wed	Thu	Fri
27/07/2026 to 31/07/2026	25 9 60 5 5 0	59 0 42 28 8	35 8 62 39 0	40 0 47 89 0	16 0 70 48 8
03/08/2026 to 07/08/2026	23 4 90 56 9	17 0 85 15 9	33 8 42 12 9	46 0 09 47 8	37 0 05 34 8
10/08/2026 to 14/08/2026	57 7 99 23 4	23 0 53 14 8	25 0 70 23 5	35 5 39 13 5	13 3 76 35 8
17/08/2026 to 21/08/2026	24 0 60 46 0	27 8 73 34 6	11 6 82 48 0	15 5 6 23 77 9	44 9 77 17 9
24/08/2026 to 28/08/2026	36 0 96 79 0	25 5 23 22 9	78 9 42 23 7	45 0 98 44 0	26 6 41 29 0
31/08/2026 to 04/09/2026	14 9 43 67 0	17 0 81 56 0	15 9 52 33 6	69 0 50 23 5	57 7 99 13 5
07/09/2026 to 11/09/2026	68 0 47 55 7	28 27 12 4	57 0 26 35 8	11 2 43 77 9	44 5 33 68 9
14/09/2026 to 18/09/2026	78 9 47 12 4	33 6 20 13 6	79 9 56 17 8	68 0 42 34 5	39 9 16 79 0
21/09/2026 to 25/09/2026	39 0 25 34 8	45 7 62 12 9	48 0 23 59 9	16 6 30 47 9	15 0 60 28 0
28/09/2026 to 02/10/2026	69 9 19 13 5	13 7 18 27 9	26 0 84 25 7	66 0 29 12 6	36 9 84 70 0
05/10/2026 to 09/10/2026	14 0 57 25 0	45 9 85 16 8	13 0 48 56 7	46 9 99 12 6	55 8 84 59 0
12/10/2026 to 16/10/2026	16 0 79 56 8	29 0 11 69 9	12 2 58 18 9	13 0 46 12 3	25 7 42 48 0

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

नशिबाची परिक्षा

मंगळवार दि. १७ नोव्हेंबर २०२६

मिलनम डे

उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत

१ | १४६ १२८ १०० | ० | १९० १२७ ५५० | १ | १२८ २९० १५५

१२-७०-८४-०९-३५

कल्याण

उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत

२ | १२९ ४८० ६६० | ७ | १२४ १७९ ११५ | २ | १२९ ३४६ २५५

२६-९७-४१-०३-७५

मुंबैम (मेन)

उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत

० | १४५ २८० ४८० | ६ | १२३ ४४८ ८८० | ५ | १४० २३० २२१

०२-४६-५३-१८-६९

माधुरी बाजार डे / नाईट

१२४ २७८ ८९० | ७-३ | २४७ ४७० ५६७ | ७३-६८-८२-२६-५०

२ - ६ - ८

dpbosssss.live

माधुरी बाजार डे	माधुरी बाजार नाईट
४४०	१६८
८६	५१
६००	२४५

Mydpboss.com

हॉटेलमध्ये विसरलेली दहा लाखांची सोन्याच्या दागिन्यांची बॅग प्रवाशाला परत

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

नेवासा : सध्याच्या धावपळीच्या आणि स्वार्थी युगात माणुसकी व प्रामाणिकपणा अजूनही जिवंत असल्याचा प्रत्यय एका कौतुकास्पद घटनेतून आला आहे. हॉटेलमध्ये विसरलेली जवळपास दहा लाख रुपये किमतीच्या सोन्याच्या दागिन्यांची बॅग संबंधित प्रवाशाला परत करून हॉटेल साई ईश्वरीचे मालक नाथभक्त दिलीप पाटील वाघ यांनी प्रामाणिकपणाचा अनमोल आदर्श समाजासमोर ठेवला आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील चिखली तालुक्यातील एक प्रवासी पुण्याच्या दिशेने प्रवास करत असताना नेवासा तालुक्यातील खडका येथे सामाजिक बांधिलकी जपणारे हॉटेल साई ईश्वरी येथे



थांबले होते. दिवाळीचा सण आणि प्रवाशांची मोठी गर्दी असल्याने घाईगडबडीत निघताना त्यांच्याकडून सोन्याच्या दागिन्यांची बॅग हॉटेलमध्येच विसरली गेली. काही वेळानंतर ही बाब हॉटेलचे मालक दिलीप पाटील वाघ यांच्या लक्षात आली.

बॅगेतील मौल्यवान दागिन्यांचे महत्त्व ओळखून त्यांनी कोणताही विलंब न करता संबंधित प्रवाशाशी संपर्क साधला आणि त्यांना पुन्हा हॉटेलवर बोलावून घेतले. त्यानंतर जवळपास दहा लाख रुपये किमतीचे सोन्याचे दागिने असलेली बॅग त्यांनी प्रामाणिकपणे प्रवाशाच्या स्वाधीन केली.

आजच्या काळात इतक्या मोठ्या किमतीची मौल्यवान वस्तू स्वतःकडे न ठेवता ती मूळ मालकाला परत करण्याची दिलीप पाटील वाघ यांची कृती निश्चितच प्रेरणादायी आहे.माणुसकी,संवेदनशीलता,प्रामाणिकपणा आणि सामाजिक बांधिलकी या केवळ बोलण्याच्या गोष्टी नसून त्या कृतीतून सिद्ध कराव्या लागतात, हे त्यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले आहे.नाथभक्त असलेले दिलीपभाऊ वाघ यांच्या या प्रामाणिकपणाचे समाजातून कौतुक होत असून, त्यांच्या या कृतीमुळे आजही समाजात माणुसकी जिवंत असल्याचा सकारात्मक संदेश सर्वदूर पोहोचला आहे.

सेवा संस्थांच्या स्वमालकीच्या इमारतींसाठी पुढाकार घेणार : खा. लंके

जिल्हा बँकेच्या प्रत्येक शाखेत एटीएम व सोनेतारण सुविधा उपलब्ध करण्यासाठी प्रयत्न

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पारनेर : अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालकपदी निवड झाल्याबद्दल खासदार नीलेश लंके यांचा पारनेर येथे जिल्हा बँकेचे तालुक्यातील अधिकारी व कर्मचारी तसेच तालुका सचिव संघटनेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी तालुक्यातील अनेक गावांमधील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांना स्वमालकीच्या इमारती नसल्याचा प्रश्न उपस्थित झाला. या संस्थांच्या स्वमालकीच्या इमारती उभारण्यासाठी आपण पुढाकार घेऊ, अशी ग्वाही खासदार लंके यांनी दिली.

शेतकऱ्यांना जास्तीत जास्त कर्जवाटपाचे उद्दिष्ट

पारनेर येथील जिल्हा बँकेच्या सभागृहात रविवारी झालेल्या या कार्यक्रमात लंके यांनी उपस्थित अधिकारी, कर्मचारी व गटसचिवांशी संवाद साधला. जिल्हा सहकारी बँक ही शेतकऱ्यांची कामधेनू असून ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना आर्थिक आधार देण्याचे महत्त्वपूर्ण काम बँकेच्या माध्यमातून केले जाते. त्यामुळे खरीप हंगामातील पीककर्ज, संकरित गायींच्या खरेदीसाठी कर्ज, ट्रॅक्टर खरेदीसाठी कर्ज आदींसाठी जास्तीत जास्त कर्जवाटप करण्यावर यापुढील काळात भर दिला जाईल. कोणताही गरजू शेतकरी कर्जापासून वंचित राहणार नाही, याची काळजी घेतली जाईल, असे त्यांनी सांगितले.

जिल्हा बँकेच्या प्रत्येक शाखेत एटीएम सुविधा तसेच सोनेतारण कर्ज सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करणार आहे. ग्रामीण भागातील ग्राहकांना बँकिंग सेवा अधिक सुलभतेने मिळाव्यात, हा त्यामागील उद्देश आहे. तसेच तालुक्यातील प्रत्येक गावातील सेवा संस्था सक्षम करण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातील. पारनेर तालुका कर्जवसुलीमध्ये जिल्ह्यात पहिल्या क्रमांकावर असून यापुढेही हा लौकिक कायम राखण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

बँकेचे कर्मचारी आणि गटसचिव हे सहकार व्यवस्थेतील महत्त्वाचे घटक आहेत. त्यांच्या अडचणी सोडविण्यासोबतच बँक आणि सेवा संस्थांच्या कामकाजात सुसूत्रता आणण्यावर आपला भर राहील. सेवा संस्था आणि जिल्हा बँक या एकाच



नाण्याच्या दोन बाजू असून दोन्ही यंत्रणांमध्ये समन्वय राहिल्यास शेतकऱ्यांना कर्जवाटपात कोणतीही अडचण येणार नाही, असे लंके यांनी स्पष्ट केले.

यावेळी तालुका विकास अधिकारी गायकवाड, वसुली अधिकारी पठारे, तालुका सचिव चंदन, सचिव संघटनेचे अध्यक्ष दत्ता पतके, खरमाळे, मंचरे आदींच्या उपस्थितीत खासदार लंके यांचा हृद्य सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास जिल्हा बँकेचे कर्मचारी, गटसचिव आणि सचिव संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

द•ख•ल



क्रांतिगुरू वीर लहुजी वस्ताद साळवे यांची २३२ वी जयंती उत्साहात साजरी!

अहिल्यानगर : आद्य क्रांतिगुरू वीर लहुजी वस्ताद साळवे यांच्या २३२ व्या जयंतीनिमित्त मानवी हक्क अभियानाच्या वतीने शहरातील रामवाडी परिसरात अभिवादन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी वीर लहुजी वस्ताद साळवे यांच्या महान कार्याचा जागर करण्यात आला. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात त्यांनी दिलेले योगदान, क्रांतिकारकांना दिलेले प्रशिक्षण तसेच सामाजिक परिवर्तनासाठी केलेल्या कार्याचे स्मरण करून त्यांच्या विचारांना अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाला स्नेहालयातील मुलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मानवी हक्क अभियानाचे जिल्हा कार्याध्यक्ष चंद्रकांत डोलारे होते. प्रमुख पाहुणे म्हणून कर्जत नगरपंचायतीचे नगरसेवक डॉ. राजेंद्र पवार उपस्थित होते. यावेळी लहान मुलांनी वीर लहुजी वस्ताद साळवे यांच्या जीवनकार्यावर आधारित भाषणे सादर केली. त्यांच्या पराक्रमाचा, देशप्रेमाचा आणि समाजासाठी केलेल्या कार्याचा परिचय मुलांनी आपल्या भाषणातून करून दिला. स्नेहालयाच्या शिक्षिका जयश्री रासणे यांनी स्नेहालयातील प्रकल्पांची माहिती दिली. त्याचबरोबर वीर लहुजी वस्ताद साळवे यांच्या कार्याला अभिवादन केले. मानवी हक्क अभियानाचे जिल्हा संघटक अशोक भोसले यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत करून प्रास्ताविक केले. आजच्या युवकांनी क्रांतिगुरू वीर लहुजी वस्ताद साळवे यांचे विचार आत्मसात करणे आवश्यक असून, त्यांचे जीवनकार्य नव्या पिढीला देशप्रेम, सामाजिक बांधिलकी आणि संघर्षाची प्रेरणा देणारे असल्याचे त्यांनी सांगितले.

दक्षिणमुखी हनुमान मंदिरात दिव्य अन्नकोट व छप्पन भोग महोत्सव उत्साहात

अहिल्यानगर : झेंडीगेट येथील श्री दक्षिणमुखी हनुमान मंदिराच्या वतीने दिव्य अन्नकोट व छप्पन भोग महोत्सव मोठ्या धार्मिक उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने भगवान हनुमान यांना ५६ प्रकारच्या विविध खाद्यपदार्थांचा नैवेद्य अर्पण करण्यात आला. यावेळी हनुमान चालीसाचे पठण, महाआरती तसेच महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याला भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. दीपावली सणानंतर भगवान श्रीकृष्णाने गोवर्धन पर्वत उचलला, त्यावेळी त्यांना ५६ प्रकारचे नैवेद्य अर्पण करण्यात आले होते, अशी धार्मिक मान्यता आहे. याच परंपरेनुसार दिव्य अन्नकोट व छप्पन भोग महोत्सव संपूर्ण भारतात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. हा महोत्सव केवळ धार्मिक सोहळा नसून भक्ती, श्रद्धा, अन्नदान, सेवा आणि सामाजिक एकतेचा सुंदर संगम आहे. देवाला अर्पण केलेला प्रसाद भाविकांना वाटप करून आनंद आणि भक्तिभावाचा प्रसार केला जातो. झेंडीगेट येथील श्री दक्षिणमुखी हनुमान मंदिरातही हा उत्सव पारंपरिक आणि धार्मिक पद्धतीने साजरा करण्यात आला. मंदिराच्या वतीने ५६ प्रकारच्या खाद्यपदार्थांचा नैवेद्य अर्पण करण्यात आला. त्यानंतर हनुमान चालीसाचे पठण, महाआरती आणि भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी मोहन मानधना, नगरसेवक सागर मुर्तडकर, बजरंग दरक, साईनाथ कावट, रामदास कावट, राजेंद्र खंडेलवाल, अनिल झवर, बद्रीनाथ राठी, नंदू झवर, राहुल कावट, शरद झंवर, योगेश पाटील, विजय थोरात, कुणाल कावट, आशिष कावट आदींसह मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.

फुले दाम्पत्यांच्या स्मारकासाठी माळीवाडा वेस येथे आमरण उपोषण

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



अहिल्यानगर : माळीवाडा वेस येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि महात्मा ज्योतिराव फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्यांची उभारणी करण्यासाठी भूमिपूजन होऊन तब्बल एक वर्ष तीन महिन्यांचा कालावधी उलटला, तरी प्रत्यक्ष कामाला अद्याप सुरुवात झालेली नाही.

महापालिका प्रशासनाच्या या दिरंगाईविरोधात अखेर फुलेप्रेमी आणि माळी समाजातील विविध संघटनांनी आक्रमक भूमिका घेतली आहे.

या उपोषणात प्रा. माणिक विधाते, किशोर डागवाले, भगवान फुलसौंदर, अनिल बोरुडे, नगरसेवक निखिल वारे, संतोष म्हस्के, अशोक कानडे, पंडितराव खरपुडे, ज्ञानेश्वर रासकर, बजरंग भुतारे, संजय खामकर, राम पानमळकर, नगरसेवक अविनाश घूले, निखिल वारे, प्रकाश भागानगरे, संतोष गेनाप्पा, बाली बांगरे, महेश तवले, नगरसेविका सुनिता फुलसौंदर, अमोल गाडे, बाळासाहेब पवार, नगरसेवक दत्ता गाडळकर, गणेश कवडे, माजी नगरसेवक अर्जुनराव बोरुडे, गोरख पडोळे, जालिंदर कोतकर, नगरसेविका आशाताई, सुजाता पडोळे, मंगल बोरुडे, मनोज ताठे, संजय गारुडकर, अमोल भांबरकर, अनिल इवळे, राजेंद्र ताठे, विष्णुपंत म्हस्के, मुकुंद देवगावकर, अशोक बाबर, चंद्रकांत फुलारी, अंबादास गारुडकर, माऊली गायकवाड, प्रकाश इवळे, देवा होले, ब्रिजेश ताठे, सुरेश आंबेकर, संतोष हजारे, शिवम भंडारी, सांगळे, प्रकाश शिंदे, आनंद पुंड, चंद्रकांत पुंड, मच्छिंद्र फुलसौंदर, मच्छिंद्र बनकर, भुषण भुजबळ, मनोज भुजबळ, मनोज फुलसौंदर, नंदकुमार नेमाने, संजय ताजणे, रमेश चिपाडे, राजाराम चिपाडे, सुरेश जाधव, विनायक कोके, आकाश डागवाले, सुरेश खरपुडे, प्रा. भगवान काटे, दीपक खेडकर, संभाजी चौधरी, दिनेश कापरे, दामोदर कळमकर, डॉ. भगवान हजारे, शामराव व्यवहारे, आरती आढाव, रुपाली गणगले, शिल्पा गणगले, रेणुका पुंड, रोहिणी बनकर आदी सहभागी झाले होते.

कृत्रिम बुद्धिमत्तेला ही हरवणारे बुद्धिबळपटू ठरले विजेते



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : बुद्धिबळ खेळाच्या प्रचार आणि प्रसारासाठी अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शांतीकुमारजी फिरोदिया अखिल भारतीय खुल्या आंतरराष्ट्रीय मानांकन बुद्धिबळ स्पर्धेचा उत्साहपूर्ण वातावरणात समारोप झाला. देशभरातून २५० हून अधिक खेळाडूंनी सहभाग घेतलेल्या या स्पर्धेत शौनक बडोले नागपूर याने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रथम क्रमांक पटकावला, तर श्रीराज भोसले कोल्हापूर याने द्वितीय क्रमांक मिळविला. महाराष्ट्रालाच विजयते व उपविजेतेपद मिळाल्यामुळे खेळाडूंमध्ये उत्साह होता.जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते विजेत्या खेळाडूंना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

अहिल्यानगर येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय, एस.टी. स्टँड रोड येथे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया म्हणाले की, अहिल्यानगर मधून बुद्धिबळ खेळाचा प्रचार आणि प्रसार सातत्याने होत असून, दरवर्षी आयोजित होणाऱ्या स्पर्धांना खेळाडूंचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. खेळाडूंना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने शंभरहून अधिक आंतरराष्ट्रीय दर्जाचे वूडन बुद्धिबळ बोर्ड उपलब्ध करून देण्यात आले आहेत. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, उपाध्यक्ष नरेंद्र कुलकर्णी, सचिव यशवंत बापट, सुबोध ठोंबरे, शाम कांबळे, पारुनाथ ढोकळे, संजय खडके, प्रकाश गुजराथी, स्वप्निल भगुरकर, विशाल गुजराथी, दत्ता घाडगे, संजय जोशी, मनीष जसवानी, चेतन कड, विजय चोरडिया, राजीव बोधक,पंच प्रवीण ठाकरे, पवन राठी, शार्दुल तापसे, शिशिर इंदुरकर, विजय चोरडिया, प्रशांत धंगेकर, देवेंद्र ढोकळे, अनुराधा बापट, शुभदा ठोंबरे आणि रोहिणी आडकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

बालकांसाठी सुरक्षित विश्व साकारण्याचा बालदिनी संकल्प



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : जगातील प्रत्येक बालकाला सुरक्षित बालपण, कुटुंब, दर्जेदार शिक्षण, संरक्षण, सन्मान आणि स्वतःची स्वप्ने पूर्ण करण्याची मुक्त संधी मिळायला हवी. यासंदर्भात अहिल्यानगर जिल्हा भारतासाठी आदर्श – प्रेरक प्रतिमान बनवण्याचा संकल्प आज बाल दिनाच्या निमित्ताने येथे करण्यात आला. बालकांवरील शारीरिक – मानसिक आणि लैंगिक अत्याचारांच्या संदर्भात शासकीय आणि सामाजिक स्तरावर झिरो टॉलरन्स विकसित करण्याची सामूहिक प्रतिज्ञा बालसेवी संस्था आणि कार्यकर्त्यांनी घेतली. स्नेहालयच्या उडान या बालविवाह प्रतिबंधक प्रकल्पाचा तिसरा वर्धापनदिन आणि बाल अधिकार पंधरवड्याचा शुभारंभ आज बाल दिनाच्या निमित्ताने आयोजविण्यात आला.

या वेळी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, स्नेहालय संस्था, पोलीस उपअधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे, उमेश परदेशी, वैभव कलुबर्मे, ॲड. अनुराधा येवले, प्रशांत गायकवाड, महेश सूर्यवंशी, शबाना शेख, पोलीस उपनिरीक्षक अर्चना तोडमल, स्नेहालय संस्थेचे राजीव गुजर, ड. बागेश्री जरंडीकर, हनिफ शेख, डॉ. प्रीती भोंबे, प्रविण कदम, संतोष धर्माधिकारी यांनी या बाल दिनाच्या कार्यक्रमात सहभाग घेतला.

अचूक नियोजन, शून्य ब्रेक डाऊन व ७१.१६ लाखांचा महाविक्रम

दिवाळी हंगामात शेवगाव एसटी आगाराची ऐतिहासिक भरारी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



ढोरजळगांव : अपुऱ्या मनुष्यबळात आणि केवळ एका पर्यवेक्षकाच्या बळावर प्रभारी आगार व्यवस्थापकांनी रचला नवा इतिहास

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अहिल्यानगर विभागांतर्गत शेवगाव आगाराने यंदाच्या दिवाळी हंगामात शिस्तबद्ध आणि सूक्ष्म वाहतूक नियोजन करत महसुलाचा नवा उच्चांक प्रस्थापित केला आहे.

अहिल्यानगर विभागाचे विभाग नियंत्रक राजेंद्र जगताप, विभागीय वाहतूक अधिकारी . कमलेश भारती आणि यंत्र अभियंता . सचिन चाचरे यांच्या मोलाच्या मार्गदर्शनाखाली शेवगाव आगाराने उत्पन्नात ऐतिहासिक वाढ नोंदवली आहे.

मागील वर्षाच्या तुलनेत यंदा १० टक्के भाडेवाढ नसताना देखील शेवगाव आगाराने दिवाळीनंतरच्या अवघ्या सात दिवसांत ७१,१६,३०४ इतके विक्रमी उत्पन्न मिळवत महामंडळाच्या तिजोरीत मोठी भर घातली आहे.

या कालावधीत आगाराने एकूण १,२९,९०० किलोमीटर वाहतूक केली असून, ५४.७८ इतके भक्कम प्रतिकिलोमीटर उत्पन्न प्राप्त केले आहे. कोणत्याही तिकीट दरवाढीशिवाय आगाराने मागील वर्षाच्या तुलनेत ११,२३६ किलोमीटर जादा वाहतूक करून तब्बल ३,९४,७०६ इतके अतिरिक्त उत्पन्न मिळवले आहे.

या ऐतिहासिक यशामागे विभागीय अधिकाऱ्यांचे नियोजन आणि स्थानिक पातळीवरील अपुऱ्या मनुष्यबळावर केलेले अचूक व्यवस्थापन अत्यंत महत्त्वाचे ठरले आहे.

आगारात कार्यशाळा किंवा वाहतुकीशी संबंधित इतर कोणताही पर्यवेक्षक उपलब्ध नसताना, अत्यंत मर्यादित संसाधनांत हे यश संपादन करण्यात आले आहे. असे असतानाही आगारातील वाहनांचे ब्रेक डाऊनचे प्रमाण अतिशय नगण्य राहिले, तसेच मार्ग बंदचे प्रमाणही शून्य राहिले.

यांत्रिक विभागाच्या उत्कृष्ट देखभालीमुळे बसेस विनाअडथळा धावल्या, ज्याचा थेट फायदा उत्पन्नवाढीसाठी झाला. विशेष म्हणजे, विभागीय वाहतूक अधीक्षक चंदू चौधरी यांच्याकडे शेवगाव आगार व्यवस्थापकाचा अतिरिक्त कार्यभार असतानाही, त्यांनी पूर्णपणे झोकून देत स्वतः बसस्थानकावर उभे राहून प्रवाशांच्या गर्दीचे अचूक नियोजन केले. चौधरी यांनी हा विक्रमी पल्ला गाठला आहे. वाहतूक निरीक्षक स्वप्निल गव्हाळ बसस्थानकावर उपस्थित राहून वाहतुकीचे संपूर्ण वेळापत्रक चोख सांभाळले आणि प्रवाशांच्या मागणीनुसार जादा बसेस सोडून गर्दीचे उत्तम संयोजन केले.

भाडेवाढ नसतानाही शेवगाव आगाराने दिवाळीत ७१.१६ लाखांच्या उत्पन्नाचा विक्रम रचला, ही अभिमानास्पद बाब आहे. विभाग नियंत्रक राजेंद्र जगताप, विभागीय वाहतूक अधिकारी कमलेश भारती, यंत्र अभियंता सचिन चाचरे यांच्या मार्गदर्शनाखाली विभागीय वाहतूक अधीक्षक व प्रभारी आगार व्यवस्थापक चंदू चौधरी यांनी कार्यशाळा व वाहतुकीचे इतर पर्यवेक्षक नसताना केवळ एका वाहतूक निरीक्षकाच्या अचूक नियोजन व शून्य ब्रेक डाऊनमुळे हे शक्य झाले. तसेच आमचे विभागीय सचिव गणेश खोसे यांनी सर्व कर्मचाऱ्यांच्या एकजुटीमुळेच हा उच्चांक गाठता आला.

वरिष्ठ अधिकाऱ्यांचे योग्य मार्गदर्शन आणि आगारातील वाहतूक नियंत्रक, चालक, वाहक यांचे सहकार्य शेवगाव एसटी आगाराच्या या देदीप्यमान यशाचे आणि अधिकाऱ्यांच्या कार्यतत्परतेचे प्रवासी व सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

माहेश्वरी समाजातर्फे अन्नकुट उत्सव पारंपरिक पद्धतीने व उत्साहात साजरा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



पाथर्डी : भगवान श्रीकृष्णांनी जलप्रलयापासून गोमातेच्या रक्षणार्थ व आपल्या सवंगड्यांचे रक्षण करण्यासाठी गोवर्धन पर्वत करंगळीवर उचलून रक्षण केले. यावेळी सर्व गोपालक व कृष्णाच्या सवंगड्यांनी प्राणाचे रक्षण केल्याबद्दल देवाचेआभार मानले. भुकेने व्याकुळ झालेल्या सर्वांनी आपापल्या घरून आणलेली शिदोरी एकत्र केली. त्यालाही छोट्याशा डोंगरासारखे रूप आले. सर्व गोमातांचे पोटभर भोजन झाल्यानंतर उर्वरित सर्वप्रसाद सर्वांनी मिळून ग्रहण केला. साक्षात परमपीता परमात्मा तिथे असल्याने या प्रसादाची गोडी व महत्त्व अविट बनले. त्याचा एक अंश तरी आपल्याला मिळावा म्हणून विविध रूपांमध्ये ३३ कोटी देवी देवता तेथे उपस्थित झाल्या. भगवान कृष्णांनी सर्वांना ओळखले. देवी देवतांनी भगवान कृष्णांना नमन करत प्रसादाची विनंती केली. भगवान कृष्णांनी फक्त आशीर्वादाचा हात देत सर्वांना प्रसाद देण्याची सूचना सवंगड्यांना केली. त्यानुसार ३३ कोटी देवी देवतांचे यथेच्य भोजन होऊन सुद्धा तेथील अन्न तसुभर सुद्धा हलले नाही. या शक्तीपुढे नतमस्तक होत सर्व देवी देवतांनी भगवान कृष्णांना नमन करत आजपासून जेथे अन्नकूट होऊन गोमातेचे पूजन होईल तो प्रसाद ग्रहण करण्याने सर्व देवी देवतांची त्याचे वर सदैव कृपा राहील. अशा शब्दात आशीर्वाद दिले. साक्षात अन्नपूर्णा माता गोमातेच्या रूपात तेथे सेवा कार्यात होती. अशी माहिती विविध धर्मग्रंथ च्या संदर्भातून सांगितली जाते.

बलिप्रतिपदेच्या म्हणजे पाडव्याच्या दिवशी असा उत्सव साजरा करण्याची परंपरा असली तरी स्थानिक माहेश्वरी समाजातर्फे बलिप्रतिपदे नंतर येणाऱ्या पहिल्या रविवारी असा कार्यक्रम संपन्न होतो. श्रीराम मंदिरामध्ये समाजातील सर्व बंधू-भगिनींनी देवासाठी स्वतंत्रपणे मीष्ठांन्न प्रसाद आणला होता. याला ५६ भोग असे म्हटले जाते. महाआरतीनंतर हा सर्व प्रसाद एकत्रित करून भाविकांना दिला जातो. उत्सव साजरा करण्यामध्ये राजस्थानी परंपरांचा पगडा यामध्ये निर्माण होऊन थंडीपासून गोमातेचे व भाविकांचे रक्षण व्हावे, यासाठी बाजरीचा भरडा , त्यामध्ये शुद्ध तूप व गूळ मिसळून केलेल्या पदार्थाला खिचडा म्हणतात. तो पदार्थ आवर्जून ग्रहण केला जातो. उत्तर भारतातून ही प्रथा सुरू झाली.

शहरातील मंत्री परिवाराच्या वतीने यावर्षीच्या महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. सर्व समाज श्रद्धायुक्त अंतकरणाने महाआरतीसाठी व महाप्रसादासाठी एकत्रित जमत असल्याने सामाजिक ऐक्य व परस्पर प्रेमभाव अधिक दृढ होऊन समाजाच्या सर्वांगीण कल्याणासाठी व धार्मिक उत्सवासाठी एकत्रितपणे काम करण्याचा संकल्प या निमित्ताने केला जातो. यावेळी श्रीकांत जाजू, जगदीश लोहिया, महेश बाहेती, सागर बाहेती, योगेश कलंत्री, राधेश्याम मंत्री, रितेश मंत्री, आलोक बंग, प्रणव जाजू, गोविंद लाहोटी, सचिन डागा, पुष्कर मंत्री, सतीश राठी आदी कार्यकर्त्यांसह माहेश्वरी महिला मंडळ, माहेश्वरी पंच ट्रस्ट, माहेश्वरी राम मंदिर ट्रस्ट, पाथर्डी तालुका माहेश्वरी सभा अशा संस्थांच्या पदाधिकाऱ्यांसह सर्व समाज बांधवांनी विशेष परिश्रम घेतले.

नगरमध्ये मध्यवर्ती भागात बिबट्याचा वावर

ड्रोन कॅमेऱ्यातील दृश्यांमुळे नागरिकांमध्ये मोठी दहशत

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



अहिल्यानगर : शहराच्या मध्यवर्ती परिसरामध्ये एक बिबट्या फिरत असल्याचा दावा केला गेल्यामुळे संपूर्ण दाट लोकवस्तीच्या भागात प्रचंड खळबळ उडाली आहे. मनपा आणि जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आसपासच्या परिसरामध्ये ड्रोन कॅमेऱ्याद्वारे बिबट्याची हालचाल टिपली गेल्याचा एक व्हिडिओ रविवारी समाजमाध्यमांवर वेगाने व्हायरल झाला आहे. या घटनेनंतर नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून प्रशासनाने तातडीने बिबट्याचा बंदोबस्त करावा अशी मागणी जोर धरू लागली आहे. व्हिडिओ समोर आल्यानंतर वनविभागाचे पथक आणि पोलीस दल तातडीने रात्रीच संबंधित घटनास्थळी दाखल झाले होते. वनविभागाचे अधिकारी अविनाश तेलोरे यांनी दिलेल्या माहितीनुसार सीक्यूएव्ही परिसरात बिबट्याचा वावर असल्याची माहिती मिळताच त्या ठिकाणी तातडीने पिंजरे लावण्यात आले आहेत. रात्रीच्या वेळी वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी ड्रोनच्या माध्यमातून संपूर्ण परिसराची कसून पाहणी केली परंतु प्राथमिक तपासणीत कोणतीही संशयास्पद हालचाल आढळून आली नाही. सकाळी उजाडल्यानंतर वनविभागाकडून शोधमोहीम पुन्हा तीव्र करण्यात आली असून अनेक संवेदनशील ठिकाणी पिंजरे बसवण्याचे काम सुरू ठेवण्यात आले आहे. माजी नगरसेवक अजिंक्य बोरकर यांनी या गंभीर प्रकाराबाबत तीव्र चिंता व्यक्त करत प्रशासनाला थेट इशारा दिला आहे. हा अत्यंत दाट लोकवस्तीचा परिसर असून या भागात शासकीय कार्यालये आणि गंगा उद्यान असल्यामुळे नागरिकांच्या जीवाला मोठा धोका निर्माण झाला आहे. शनिवारपासून बिबट्या डिटेक्ट झाला असून भविष्यात कोणतीही अनुचित घटना घडल्यास त्या संपूर्ण परिस्थितीची सर्वस्वी जबाबदारी वनविभाग आणि जिल्हा प्रशासनाची राहील असे स्पष्ट शब्दांत सांगण्यात आले आहे.

दखल

डिंभेच्या उजव्या कालव्याला पाणी सुटल्याने शेतकरी सुखावला



लोणी धामणी, आंबेगाव : जलसंपदा विभागाच्या कुकडी प्रकल्पांतर्गत येणाऱ्या आंबेगाव तालुक्यातील डिंभे धरणातून (हुतात्मा बाबू गेणू जलाशय) उजवा कालव्याला पाणी सोडल्याने शेतकर्यांनी समाधान व्यक्त केले आहे.शेतकऱ्यांनी पाणी जपून वापरावे असे आव्हान जलसंपदा विभागाने केले आहे.या पाण्याचा उपयोग आंबेगाव-शिरूर तालुक्यांतील सुमारे ६० गावांतील शेती पिकांना फायदा होणार असून,याबद्दल शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले. आंबेगाव, शिरूर तालुक्यांतील अनेक गावांत पिण्याच्या पाण्याचा व शेतीच्या पाण्याचा प्रश्न भेडसावू लागला होता. उजव्या कालव्याला पाणी सोडण्या संदर्भात शेतकऱ्यांनी माजी सहकार मंत्री आमदार दिलीप वळसे पाटील यांना कालव्याला पाणी सोडण्याबाबत निवेदन दिले होते.सध्या उन्हाचा तडाखा वाढला असून अनेक शेतकऱ्यांनी उसाच्या शेतात उन्हाळी नगदी पिके घेतली आहेत. रब्बी हंगामातील पिकांना पाण्याची गरज भासत आहे.उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत चालल्याने काही ठिकाणी शेती पिकांनी माना टाकायला सुरुवात केली होती. उजव्या कालव्याला नियमित पाणी सोडण्यात येत असल्याने शेतकऱ्यांच्या आर्थिक प्रगतीत डिंबा धरणाचा मोलाचा वाटा राहिला आहे.पूर्व आंबेगावात उन्हाची तीव्रता वाढल्याने शेतीच्या पाण्याबरोबर पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनत चालला होता. अनेक गावातील शेतकऱ्यांनी आमदार वळसे पाटील यांच्याकडे पाणी सोडण्याची मागणी केली होती. उजव्या कालव्याला पाणी सोडल्यामुळे पाणीटंचाईच्या काळात शेती पिकांना दिलासा मिळणार आहे.त्यामुळे शेतकर्यांनी समाधान व्यक्त केले.

आळंदीत जलाराम बाप्पा यांची २२७ वी जयंती उत्साहात साजरी



आळंदी : गुजरातचे संत श्री जलाराम बाप्पा यांची २२७ वी जयंती सोमवारी (ता. १६) आळंदीत धार्मिक आणि भक्तिमय वातावरणात उत्साहात साजरी करण्यात आली. बँडच्या तालावर निघालेली नगरप्रदक्षिणा, भाविकांचा उत्स्फूर्त सहभाग, रक्तदान शिबिर आणि भक्तिमय कार्यक्रमांमुळे जयंती सोहळ्याला विशेष रंगत आली. जयंतीनिमित्त श्री जलाराम बाप्पा यांच्या प्रतिमेसह जलाराम सत्संग मंडळाचे माजी अध्यक्ष स्व.मगनभाई राजा यांच्या प्रतिमेची शहरातून नगरप्रदक्षिणा काढण्यात आली. शहरातील विविध ठिकाणी या मिरवणुकीचे स्वागत करण्यात आले. भाविकांनी जलाराम बाप्पांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दर्शन घेतले. दरम्यान माजी नगराध्यक्ष सुरेश वडगावकर, माजी नगरसेवक अशोक उमरगेकर, श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव अजित वडगावकर, मनोहर दिवाणे आणि युवराज वडगावकर यांनी जलाराम बाप्पा च्या प्रतिमेचे पूजन करून स्वागत केले.

या सोहळ्यास जलाराम सत्संग मंडळाचे अध्यक्ष धीरूभाई राजा, विश्वस्त राजूभाई मदलानी, दिनेश वरु, भरत पटेल, नारायण सोळंकी, नरेंद्र चोटाई, चिराग राजा यांच्यासह महाराष्ट्राच्या विविध भागांतून आलेले जलाराम बाप्पांचे भक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. जयंतीचे औचित्य साधून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

अभय योजनेतून २ लाख ८२ हजार ग्राहकांना थकबाकीमुक्तीची संधी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

- **४९८ कोटींची थकबाकी; ७८ कोटी रुपयांचे व्याज व विलंब आकार होणार माफ**
- **मुख्य अभियंता पंकज तगलपल्लेवार यांचे लाभ घेण्याचे आवाहन**

प्रतिनिधी, राष्ट्र सह्याद्री

पुणे : कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे थकबाकीच्या ओझ्याखाली असलेल्या पुणे परिमंडलातील तब्बल २ लाख ८२ हजार ९७७ वीजग्राहकांना महावितरणच्या 'अभय योजना २०२६-२७'मधून थकबाकीमुक्त होण्याची आणि पुन्हा वीजजोडणी घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे. या ग्राहकांकडे सुमारे ४९८ कोटी रुपयांची थकबाकी असून, योजनेत सहभागी झाल्यास त्यावरील सुमारे ७८ कोटी रुपयांचे व्याज व विलंब आकार पूर्णपणे माफ होणार आहेत. याशिवाय, मूळ थकबाकीच्या एकरकमी भरण्यावर २० टक्क्यांपर्यंत सवलत मिळणार असल्याने ग्राहकांना मोठा आर्थिक दिलासा मिळणार आहे.

महावितरणने ही योजना ६ नोव्हेंबर २०२६ ते १५ जानेवारी २०२७ या कालावधीत लागू केली आहे. पुणे परिमंडलातील गणेशखिंड, रास्तापेठ आणि पुणे ग्रामीण या तीन मंडलांमधील पात्र ग्राहकांना योजनेचा लाभ घेता येणार आहे. यामध्ये २१२ उच्चदाब ग्राहकांकडे सुमारे ७२.०६ कोटी रुपये, तर २ लाख ८२ हजार ७६५ लघुदाब व लघुदाब औद्योगिक ग्राहकांकडे सुमारे ४२५.९५ कोटी रुपये थकीत आहेत.

या योजनेअंतर्गत पात्र ग्राहकांच्या थकबाकीवरील १०० टक्के विलंब आकार आणि व्याज पूर्णपणे माफ करण्यात येणार आहे. तसेच, तात्पुरता वीजपुरवठा खंडित झाल्यापासून कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित होईपर्यंतच्या कालावधीतील मागणी आकार (शारपव उहरॲसशी) आणि स्थिर आकार (ऋछुशव उहरॲसशी) माफ करण्यात येणार आहेत. मूळ थकबाकीच्या कालावधीनुसार ग्राहकांना १० ते २० टक्क्यांपर्यंत सवलत मिळणार आहे. या विशेष सवलतीचा लाभ घेण्यासाठी संपूर्ण देय मूळ थकबाकीचा एकरकमी भरणा १५ डिसेंबर २०२६ पर्यंत करणे आवश्यक आहे. यालाच 'अर्ली बर्ड इन्सेंटिव्ह' असे संबोधण्यात आले आहे. मात्र, हप्त्यांमध्ये भरणा करणाऱ्या ग्राहकांना मूळ थकबाकीवरील ही सवलत मिळणार नाही.

एकरकमी भरणा करणे शक्य नसलेल्या ग्राहकांसाठी व्याजमुक्त हप्त्यांची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. लघुदाब ग्राहकांना मूळ थकबाकीच्या किमान ५० टक्के रकमेचा भरणा करावा लागेल. उर्वरित रक्कम सहा समान व सलग मासिक हप्त्यांमध्ये भरता येईल. उच्चदाब ग्राहकांना थकबाकी ५० लाख रुपयांपर्यंत असल्यास उर्वरित रक्कम कमाल तीन मासिक हप्त्यांत, तर ५० लाख रुपयांपेक्षा अधिक असल्यास कमाल सहा मासिक हप्त्यांत भरता येईल. हप्त्यांच्या मंजूर कालावधीत विलंब आकार आकारला जाणार नाही. मात्र, हमे निर्धारित मुदतीत भरणे आवश्यक आहे.

विशेष म्हणजे, २० किलोवॅटपर्यंत जोडभार असलेल्या पात्र ग्राहकांनी पुनर्जोडणीच्या वेळी प्रीपेड स्मार्ट मीटर स्वीकारल्यास देय मूळ थकबाकीवर आणखी पाच टक्के अतिरिक्त सवलत मिळणार आहे. ही सवलत पुनर्जोडणीनंतर ग्राहकाच्या प्रीपेड मीटर खात्यात जमा करण्यात येईल. योजनेअंतर्गत उच्चदाब व लघुदाब ग्राहकांचे पुनर्जोडणी शुल्क, तसेच लघुदाब ग्राहकांचे सेवा जोडणी शुल्क पूर्णपणे माफ करण्यात येणार आहे.

योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र ग्राहकांना महावितरणच्या ऑनलाइन पोर्टल किंवा मोबाईल ॲपद्वारे आवश्यक हमीपत्र व कागदपत्रांसह अर्ज करता येणार आहे. कोणताही वाद, न्यायालयीन प्रकरण किंवा बिलिंग तक्रार प्रलंबित असलेल्या ग्राहकांना संबंधित प्रकरण बिनशर्त मागे घेतल्यानंतर योजनेचा लाभ घेता येईल.

पुणे परिमंडलातील पात्र ग्राहकांनी या योजनेचा लाभ घेऊन आपली थकबाकी निकाली काढावी आणि पुन्हा वीजजोडणी घेऊन वीजपुरवठा सुरू करून घ्यावा. विशेषतः २० टक्क्यांपर्यंतच्या सवलतीचा लाभ घेण्यासाठी १५ डिसेंबरपूर्वी एकरकमी भरणा करावा. योजनेची अंतिम मुदत १५ जानेवारी २०२७ असल्याने ग्राहकांनी शेवटच्या तारखेची वाट न पाहता लवकरात लवकर सहभागी व्हावे, असे आवाहन पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता पंकज तगलपल्लेवार यांनी केले आहे.

१५ डिसेंबरपर्यंत भरणा करा, मिळवा २० टक्क्यांपर्यंत सवलत

महावितरणच्या अभय योजनेत पात्र ग्राहकांना मूळ थकबाकीच्या कालावधीनुसार १० ते २० टक्क्यांपर्यंत सवलत मिळणार आहे. या विशेष 'अर्ली बर्ड इन्सेंटिव्ह'चा लाभ घेण्यासाठी संपूर्ण देय मूळ थकबाकीचा एकरकमी भरणा १५ डिसेंबर २०२६ पर्यंत करणे आवश्यक आहे.

थकबाकीमुक्त होऊन पुन्हा वीजजोडणी घ्या : मुख्य अभियंता पंकज तगलपल्लेवार

अभय योजना ही थकबाकीच्या ओझ्यातून मुक्त होण्याची आणि पुन्हा वीजजोडणी घेण्याची महत्त्वपूर्ण संधी आहे. थकबाकीवरील १०० टक्के व्याज व विलंब आकार माफ होणार असून, मूळ थकबाकीवरही २० टक्क्यांपर्यंत सवलत उपलब्ध आहे. एकरकमी भरणा शक्य नसलेल्या ग्राहकांसाठी व्याजमुक्त हप्त्यांची सुविधाही देण्यात आली आहे. त्यामुळे पुणे परिमंडलातील सर्व पात्र ग्राहकांनी या योजनेत सहभागी होऊन आपली थकबाकी निकाली काढावी.

सहकार क्षेत्रातील कार्याबद्दल साहेबराव खामकर यांना 'हडपसर रत्न' पुरस्कार

आदित्य ठाकरे यांच्या हस्ते पुण्यात सन्मान; सहकार क्षेत्रातील योगदानाची दखल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पुणे : सहकार क्षेत्रासह सार्वजनिक जीवनात उल्लेखनीय कार्य करणारे श्रीगोंदा येथील साहेबराव खामकर यांना 'हडपसर रत्न' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्राचे माजी पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांच्या हस्ते पुणे येथे हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय सामाजिक योगदान देणाऱ्या अकरा मान्यवरांचा या वेळी सन्मान करण्यात आला.

पुरस्कार वितरणप्रसंगी आदित्य ठाकरे म्हणाले, की समाजासाठी निःस्वार्थपणे कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्याची संधी मिळणे, ही आपली स्वतःची उंची वाढविणारी बाब आहे. समाजकार्य करणाऱ्या व्यक्ती समाजासाठी अत्यंत महत्त्वाच्या असून, त्यांच्या पाठीशी आपण खंबीरपणे उभे राहू, अशी ग्वाही त्यांनी दिली. विविध क्षेत्रांतील



उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन हा उपक्रम राबविल्याबद्दल त्यांनी आयोजकांचेही कौतुक केले. पुणे महापालिकेचे नगरसेवक तथा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे गटनेते नितीन गावडे म्हणाले, की सार्वजनिक क्षेत्रात प्रामाणिकपणे काम करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करून त्यांना प्रोत्साहन देणे हे आपले कर्तव्य आहे. या व्यक्तींचे समाजासाठी मोठे योगदान असून, त्यांच्या कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. साहेबराव खामकर हे साखर उद्योगाचे अभ्यासक असून, सहकार भारती या देशपातळीवरील सहकार क्षेत्रात कार्यरत संस्थेच्या महाराष्ट्र प्रदेश साखर कारखाना प्रकोष्ठ प्रमुखपदाची जबाबदारी सांभाळत आहेत. साखर उद्योगाच्या विविध पैलूंवर आधारित 'गोष्ट साखरेची' हे त्यांचे पुस्तक नुकतेच प्रकाशित झाले आहे. नितीन गावडे मित्र परिवाराच्या वतीने या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. वैद्यकीय, शिक्षण, सामाजिक आणि अन्य क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा या वेळी गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या नियोजनासाठी संकेत झेंडे, फरीद शेख, प्रताप खामकर यांच्यासह युवकांनी पुढाकार घेतला.

शिक्षक प्रशिक्षण वर्गाला गटशिक्षणाधिकारी सुजाता देशमाने यांची भेट

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

भोर : तालुक्यातील प्राथमिक, माध्यमिक तसेच उच्चमाध्यमिक वर्गाना शिकविणाऱ्या शिक्षकांचे वरिष्ठ आणि निवड वेतन श्रेणी सेवाअंतर्गत प्रशिक्षण श्री छत्रपती शिवाजी विदयालय अँड जुनिअर कॉलेज (भोर) येथे (दि.१३) सुरु असून प्रशिक्षण वर्गाला पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी सुजाता देशमाने यांनी भेट दिल्याचे वर्ग मुख्य समन्वयक लता वाघोले यांनी सांगितले.याशिवाय कार्यक्रम अधिकारी सेवापुर्व शिक्षण विभाग राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद रामदास वालझडे,डायट अधिव्याख्याता डॉ.नीता जाधव यांनी भेट देत प्रशिक्षणार्थी शिक्षकांशी संवाद साधत शिक्षकांच्या अडचणी जाणून घेतल्या.यावेळी गटशिक्षणाधिकारी सुजाता देशमाने यांनी प्रशिक्षण वर्गाचे महत्व विषद केले.

यावेळी बोलताना त्या म्हणाल्या, शिक्षण ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे.नवीन शैक्षणिक धोरणाला आपण सामोरे जाणार आहोत.शिक्षण क्षेत्रात सातत्याने बदल होत आहेत.या बदलाना सामोरे जाण्यासाठी शिक्षकांनी तयार राहावे. यासाठी प्रशिक्षण आवश्यक असल्याचे मत त्यानी व्यक्त केले. यावेळी गटविस्तारअधिकारी हुमेरापरवीन शेख, केंद्र प्रमुख प्रभावती कोठावळे, अंजना वाडकर,विजय कारभळ, समन्वयक लता वाघोले,विषय तज्ञ तथा सुलभक तानाजी तारू,मिलिंद मगर,राजू गायकवाड, सुनील गोरड, दीपक खिलारे,कल्याणी तावरे, अंजली अहिरे राजू चव्हाण, सुरेखा राजीवडे आदी उपस्थित होते.वर्ग मुख्य समन्वयक लता वाघोले यांनी उपस्थित अधिकाऱ्याचे स्वागत केले.तर अशोक मुजुमले यांनी आभार मानले.

सक्तीच्या कर्ज वसुलीविरोधात रयत क्रांती संघटनेचा आंदोलनाचा इशारा; दौंड तहसीलदारांना निवेदन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

यवत : दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने सक्तीच्या कर्ज वसुलीला स्थगिती देण्याचे आदेश दिले आहेत. असे असतानाही काही फायनान्स कंपन्या, पतसंस्था आणि खाजगी बँकांकडून शेतकरी, शेतमजूर तसेच व्यावसायिकांकडे सक्तीची वसुली सुरूच आहे. या प्रकाराविरोधात रयत क्रांती संघटना आक्रमक झाली असून, तात्काळ वसुली न थांबवल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा संघटनेचे राज्य प्रवक्ते भानुदास शिंदे, दौंड तालुका अध्यक्ष सर्फराज शेख यांनी दिला आहे.

या संदर्भात (दि. १६ नोव्हेंबर) रोजी दौंडचे तहसीलदार अरुण शेलार यांना निवेदन देण्यात आले. सध्या अनेक भागांत कर्ज वसुलीसाठी नागरिकांचे राहते घर, दुकान, वाहने तसेच स्थावर व जंगम मालमत्ता जप्त करण्याचे प्रकार घडत आहेत. शासनाने याची दखल घेऊन ही सक्तीची वसुली व जप्तीची कारवाई तात्काळ थांबवावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

नेपाळमधील आंतरराष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धेत पुण्याच्या खेळाडूंची चमकदार कामगिरी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पुणे : नेपाळमधील चितवन जिल्ह्यातील सौराहा येथे आयोजित पहिल्या सौराहा ओपन आंतरराष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धेत पुण्यातील भोसलेज तायक्वांदो आणि योधी तायक्वांदोच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केली. भारतीय खेळाडूंनी आपल्या कौशल्याच्या जोरावर दोन सुवर्ण, तीन रौप्य आणि एक कांस्य अशी एकूण सहा पदके पटकावत आंतरराष्ट्रीय स्तरावर पुण्याचा नावलौकिक उंचावला.

या स्पर्धेसाठी भारतीय संघाचे नेतृत्व ग्रँडमास्टर चंद्रकांत भोसले यांनी केले. त्यांना मास्टर राजेश पुजारी, मास्टर भार्गव भोसले आणि मास्टर स्वाती खुर्जेकर यांचे मार्गदर्शन लाभले. खेळाडूंनी आत्मविश्वास, शिस्त



आणि जिद्दीच्या जोरावर प्रतिस्पर्ध्यांना आव्हान देत उत्कृष्ट क्रीडा कौशल्याचे प्रदर्शन केले.पदक विजेत्यांमध्ये वेदिका राजेश पुजारी आणि झेना सहनी यांनी सुवर्णपदक पटकावले. देवकी किरण परदेशी, यश गुल्लापल्ली आणि अमेय शिंदे यांनी रौप्यपदक, तर निखिल सागर दामले याने कांस्यपदक मिळवले. या यशामुळे पुण्यातील खेळाडूंच्या आंतरराष्ट्रीय क्रीडा क्षेत्रातील क्षम तेवर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे.या स्पर्धेमुळे पुण्यातील खेळाडूंना आंतरराष्ट्रीय स्तरावर कौशल्य सिद्ध करण्याची तसेच विविध देशांतील खेळाडूंसोबत स्पर्धात्मक अनुभव घेण्याची संधी मिळाली. तायक्वांदो खेळाचा प्रसार आणि दर्जेदार खेळाडू घडविण्याच्या दृष्टीने हे यश महत्त्वपूर्ण असल्याची भावना ग्रँडमास्टर चंद्रकांत भोसले आणि मास्टर राजेश पुजारी यांनी व्यक्त केली.

जाहीर आवाहन

सर्व लोकांना कळवण्यात येते की चेतन अभय डिके राहणार स्वानंद, प्लॉट नंबर १८, सर्व्हे नंबर २४९/३, रेल्वे पॉवर हाऊस जवळ, सुदर्शन नगर, चिंचवड. पुणे ४११०३३. यांचे दिनांक ०९.०४.२०२६ रोजी निधन झाले असून, त्यांच्या नावावर असणारे चारचाकी वाहन नंबर MH-14-EU-8204 असा असून, त्याचा चासीस नंबर MA3ELMG1S00302379, इंजिन नंबर K14BN7072846 असा आहे. तसेच दोनचाकी वाहन नंबर MH-14-BZ-5276 असा असून, त्याचा चासीस नंबर ME4JC446AA8082785, इंजिन नंबर JC44E0453416 असा आहे. ही दोन्ही वाहने त्यांचे कायदेशीर वारसदार पत्नी श्रीमती अमृता चेतन डिके यांच्या नावावर करण्यात येणार असून, याबाबत कोणाची काही तक्रार असल्यास, पंधरा दिवसाच्या आत पिंपरी-चिंचवड आरटीओ कार्यालयात कळवावे. अन्यथा कोणाची काही तक्रार नाही असे समजून, पुढील पूर्तता करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक १७/११/२०२६

श्रीमती अमृता चेतन डिके
स्वानंद, प्लॉट नंबर १८, सर्व्हे नंबर २४९/३,
रेल्वे पॉवर हाऊस जवळ, सुदर्शन नगर,
चिंचवड. पुणे ४११०३३.
मो. ९९२३६९५१८४

महाराष्ट्राच्या सहकार चळवळीचा वारसा देशभर पोहोचविण्यासाठी केंद्र सरकार प्रयत्नशील : केंद्रीय गृहमंत्री अमित शाह

पुण्यात सहकार मंत्रालयाचे पश्चिम विभागीय कार्यालय सुरू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पुणे : महाराष्ट्राच्या सहकार चळवळीचा समृद्ध वारसा देशभर पोहोचविण्यासाठी केंद्र सरकार प्रयत्नशील असून, देशाच्या पश्चिम विभागातील सहकारी संस्थांना मार्गदर्शन व सहकार्य करण्यासाठी पुण्यात सहकार मंत्रालयाचे पश्चिम विभागीय कार्यालय सुरू करण्यात येत आहे. तळेगाव येथील बंद पडलेली नॅशनल हेवी इंजिनिअरिंग को-ऑपरेटिव्ह लिमिटेड ही बहुराज्य सहकारी संस्था दीड हजार कोटी रुपयांच्या वित्तीय सहाय्याने पुन्हा कार्यान्वित करण्यात येणार आहे. त्याचबरोबर सहकारी तत्त्वावर आधारित आणि कमिशनविरहित 'भारत टॅक्सी' सेवेमुळे टॅक्सीचालकांना केवळ चालक न राहता स्वतःच्या सेवेचे मालक होण्याची संधी मिळणार आहे, असे प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री तथा सहकार मंत्री अमित शाह यांनी केले.

तळेगाव येथे नॅशनल हेवी इंजिनिअरिंग को-ऑपरेटिव्ह लिमिटेड या बहुराज्य सहकारी संस्थेच्या पुनरुज्जीवन प्रकल्पाचे भूमिपूजन, पुण्यात सहकारी संस्थांचे केंद्रीय निबंधक (सीआरसीएस) यांच्या पश्चिम विभागीय कार्यालयाचे दूरदृश्य प्रणालीद्वारे उद्घाटन आणि पुण्यासाठी 'भारत टॅक्सी' सेवेच्या प्रारंभप्रसंगी ते बोलत होते.यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, केंद्रीय सहकार राज्यमंत्री कृष्णपाल गुर्जर, केंद्रीय नागरी विमान वाहतूक व सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, खासदार शीरंग बारणे, आमदार सुनील शेळके, माजी आमदार संजय (बाळा) भेगडे तसेच केंद्रीय सहकार सचिव आशिषकुमार भुटानी उपस्थित होते.

नॅशनल हेवी इंजिनिअरिंग संस्थेच्या पुनरुज्जीवनातून सहकाराला औद्योगिक बळ

केंद्रीय गृहमंत्री श्री. शाह म्हणाले, तळेगाव येथील बंद पडलेली नॅशनल हेवी इंजिनिअरिंग को-ऑपरेटिव्ह लिमिटेड ही महत्त्वाची बहुराज्य सहकारी संस्था पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या संस्थेच्या पुनरुज्जीवनासाठी दीड हजार कोटी रुपयांचे वित्तीय सहाय्य आयडीएमसी आणि इतर वित्तीय संस्थाकडून उपलब्ध करून देण्यात येणार असून, या प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यानंतर डिसेंबर २०२७ मध्ये उत्पादन सुरू होईल. सहकाराच्या माध्यमातून औद्योगिक व आर्थिक उपक्रमांना चालना देण्याच्यादृष्टीने हा प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

या संस्थेमध्ये सहकारी साखर कारखाने, इथेनॉल प्रकल्प आणि दूध डेअरी यांना आवश्यक असणारी यंत्रसामग्री तयार केली जाणार आहे. त्यामुळे सहकारी संस्थांना लागणारी यंत्रसामग्री देशातच उपलब्ध होण्यास मदत होईल. सहकार क्षेत्राची औद्योगिक क्षमता वाढण्याबरोबरच रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील. सहकारी संस्थांनी केवळ पारंपरिक व्यवसायांपुरते मर्यादित न राहता औद्योगिक उत्पादन क्षेत्रातही पुढाकार घ्यावा, या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले.

पश्चिम विभागीय कार्यालयामुळे सहकारी संस्थांना प्रशासकीय सेवा सुलभ

पुण्यात सुरू करण्यात आलेल्या सहकारी संस्थांच्या केंद्रीय निबंधकांच्या पश्चिम विभागीय कार्यालयाबाबत बोलताना श्री. शाह म्हणाले, बहुराज्य सहकारी संस्थांना त्यांच्या कार्यक्षेत्रातच प्रशासकीय व नियामक सेवा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हे कार्यालय महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या कार्यालयामुळे सहकारी संस्थांच्या नोंदणीसह विविध प्रशासकीय कामकाजात सुलभता येईल. संस्थांच्या कामकाजातील पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि कार्यक्षमता वाढण्यास मदत होईल. सहकारी संस्थांना त्यांच्या अडचणींसाठी दूरवर जावे लागणार नाही, तर पश्चिम विभागातील संस्थांना स्थानिक पातळीवरच आवश्यक मार्गदर्शन आणि सेवा मिळू शकतील.महाराष्ट्राच्या भूमीत विठ्ठलराव विखे पाटील, वैकुंठभाई मेहता यांच्यासारख्या सहकारमहर्षींनी सहकाराची मुहूर्तमेढ रोवून ही चळवळ रुजविली. महाराष्ट्राला सहकार क्षेत्राची मोठी परंपरा लाभली आहे. या परंपरेचा उपयोग देशातील सहकारी चळवळ अधिक सक्षम करण्यासाठी होणे आवश्यक आहे. पुण्यातील हे कार्यालय त्या दिशेने महत्त्वाचे पाऊल ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

'भारत टॅक्सी'मुळे सारथीच होणार सेवेचा मालक

'भारत टॅक्सी' सेवेच्या प्रारंभाबाबत श्री. शाह म्हणाले, सहकाराच्या तत्त्वावर आधारित परिवहन सेवा विकसित करण्याच्यादृष्टीने हा उपक्रम महत्त्वाचा आहे. या सेवेत टॅक्सीचालक म्हणजेच सारथी यांचा सहभाग, मालकी हक्क आणि आर्थिक भागीदारी यांना प्राधान्य देण्यात आले आहे. पारंपरिक टॅक्सी सेवांमध्ये चालकांना मिळणाऱ्या उत्पन्नातून विविध प्रकारचे कमिशन द्यावे लागते.

जिल्हा परिषद, पुणे

पंचायत समिती, राजगड (वेल्हे)

ता. राजगड जि. पुणे

बी १ जाहिर निविदा नोटीस नंबर ०१ सन २०२६-२७

पंचायत समिती, राजगड (वेल्हे) तालुका वेल्हे जिल्हा पुणे हे खालील कामासाठी सीलबंद निविदा जिल्हा परिषदेकडील योग्य त्या नोंदणीकृत ठेकेदारकडून निविदा मागवित आहे मोहरबंद अर्ज दिनांक: १७/११/२०२६ ते २३/११/२०२६ सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत पंचायत समिती, राजगड येथे स्वीकारली जातील. सदरच्या निविदा दिनांक: २५/११/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा पंचायत समिती, राजगड ता. वेल्हे या ठिकाणी उघडण्यात येतील.

अ. क्र.	कामाचे नाव	लेखशीर्ष	कामाची निविदा रक्कम	निविदा शुल्क	अनामत रक्कम	काम पूर्ण करण्याचा कालावधी
१	मौजे निगडे मोसे येथील कातकरीवस्ती येथे नळ पाणीपुरवठा योजना करणे.	ठक्करबाप्पा आदीवासीवस्ती सुधार योजना सन २०२५-२६ (OTSP)	७८४६७१/-	५९०/-	७८४७/-	६ महीने
२	मौजे रांजणे अंतर्गत नळ पाणी पुरवठा योजना दुरुस्ती करणे.	एकात्मिक पाणी व्यवस्थापन कार्यक्रम २०२६-२७	७६२७७३/-	५९०/-	७६२८/-	६ महीने
३	मौजे सोंडेमाथना येथे कातकरीवस्ती येथे टाकी व दाबनलिका करणे.	एकात्मिक पाणी व्यवस्थापन कार्यक्रम २०२६-२७	७६२७७३/-	५९०/-	७६२८/-	६ महीने
४	फणशी येथे बैठी टाकी करणे.	एकात्मिक पाणी व्यवस्थापन कार्यक्रम २०२६-२७	८०५०८६/-	५९०/-	८०५१/-	६ महीने
५	मोसे बु नळपाणी पुरवठा योजना दुरुस्त करणे.	एकात्मिक पाणी व्यवस्थापन कार्यक्रम २०२६-२७	६७७९६६/-	५९०/-	६७८०/-	६ महीने
६	गेवंडे गेळगाणी वस्ती नळपाणी पुरवठा योजना दुरुस्त करणे.	एकात्मिक पाणी व्यवस्थापन कार्यक्रम २०२६-२७	६७७९६६/-	५९०/-	६७८०/-	६ महीने
७	रायदंडवाडी विहीर बांधकाम करणे.	एकात्मिक पाणी व्यवस्थापन कार्यक्रम २०२६-२७	४२३८८२/-	५९०/-	४२३९/-	६ महीने
८	निवी नळपाणी पुरवठा योजना दुरुस्त करणे.	एकात्मिक पाणी व्यवस्थापन कार्यक्रम २०२६-२७	२५४२३७/-	२३६/-	२५४२/-	६ महीने

अटी व शर्ती :

१) कोणतेही निविदा अर्ज स्वीकारण्याचा अथवा सर्व निविदा फेटाळणेचा अधिकार राखून ठेवला आहे
२) कोऱ्या निविदा कार्यालयात उपलब्ध होतील.
३) ठेकेदाराने कोरी निविदा मागणी अर्जासोबत प्रमाणित नोंदणी प्रमाणपत्र, ऋड.ढ प्रमाणपत्र, झ-छ कार्ड अनुभव प्रमाणपत्र व पूर्ण भरलेली निविदा जोडणे आवश्यक आहे.
४) इसारा रक्कम कोणत्याही बँकेवरील धनादेश डी. डी पंचायत समिती, राजगड या नावाने काढून तो लिफाफा क्र १ मध्ये जोडणे आवश्यक आहे. त्याशिवाय लिफाफा क्रमांक ०२ उघडण्यात येणार नाही.
५) सदरचे कामे हे मा. उपअभियंता, शाखा अभियंता जि.प बांधकाम उपविभाग वेल्हे व सरपंच / ग्रामपंचायत अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली करणे आवश्यक आहे.
६) काम पूर्ण झाल्यानंतरच कामाचे देयक अदा करण्यात येईल.

सही
गटविकास अधिकारी (श्रेणी १)
पंचायत समिती, राजगड ता. राजगड जि. पुणे

सही
उपअभियंता
ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, राजगड

द•ख•ल



श्रीगोंद्यात शिवसेनेचा सामाजिक बांधिलकीचा उपक्रम; गरजू कुटुंबांना दिवाळी शिधा वाटप

श्रीगोंदा : दिवाळीचा आनंद समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचावा आणि कोणतेही गरीब कुटुंब सणाच्या आनंदापासून वंचित राहू नये, या उद्देशाने श्रीगोंदा शहरात शिवसेनेच्या वतीने सर्वसामान्य व गरजू कुटुंबांना दिवाळी शिध्याचे वाटप करण्यात आले. उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या पुढाकारातून श्रीगोंदा तालुक्यातील शेतकरी व गरीब कुटुंबांसाठी हा शिधा पाठविण्यात आला आहे. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या विचारांचा वारसा जपत सर्वसामान्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्याचा हा उपक्रम असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले. या कार्यक्रमास शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अनिल (मामा) शिंदे, उपजिल्हाप्रमुख मनोहरदादा पोटे आणि संतोष शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना जिल्हाप्रमुख अनिल शिंदे म्हणाले की, तालुक्यातील प्रत्येक गरजू व सर्वसामान्य कुटुंबापर्यंत दिवाळीचा शिधा सन्मानाने पोहोचविण्याची जबाबदारी शिवसैनिकांची असून, हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व पदाधिकारी व शिवसैनिक प्रयत्नशील राहतील. याप्रसंगी नंदकुमार ताडे, इंजि. निलेश गोरे, मीरा खेंडके, नितीन गायकवाड, हेमंत लोखंडे, प्रतीक बोरकर, शुभम गायकवाड, समीर काझी, नगरसेवक अनिल औटी, सुशील शिंदे, पांडुरंग पोटे, कुणाल शिरवाळे, अल्ताफ शेख, किरण बणसुडे, सागर रसाळ यांच्यासह पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.

न्यायालयात दिलेली केस मागे घेण्याच्या कारणावरून चालकाला मारहाण

अहिल्यानगर : शहरातील भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याच्या हद्दीत न्यायालयीन प्रकरण मागे घेण्यास नकार दिल्यावरून एका चारचाकी चालकाला स्टिलची टॉमी व धारदार वस्तूने बेदम मारहाण केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, घटनेचा पुढील तपास महिला पोलीस उपनिरीक्षक करीत आहेत. फिर्यादी आकाश बालू भवाळ (वय ३६, रा. हरिमळा, नगर-सोलापूर रोड, अहिल्यानगर) हे आपल्या कामात असताना ही घटना घडली. फिर्यादी हे नगर-सोलापूर रोडवरील एस.एम. विल्यम बूथ शाळेजवळ, शांतिनगर येथे असताना ही गंभीर घटना घडली आहे. आरोपी महेश दादा भवाळ आणि स्वप्नील दादा भवाळ (दोघे रा. धालवडी कुळधरण, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर) हे घटनास्थळी आले. आरोपींनी फिर्यादी यांच्याजवळ येऊन तुम्ही आमच्याविरुद्ध न्यायालयात दिलेली केस मागे घ्या, अशी धमकी दिली. फिर्यादीने न्यायालयात सुरू असलेली केस मागे घेण्यास स्पष्ट शब्दात नकार दिला. नकार दिल्याच्या रागातून आरोपींनी फिर्यादीला शिवीगाळ करत दमदाटी केली व लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. या हल्ल्यादरम्यान आरोपी महेश भवाळ याने त्याच्याकडील स्टिलच्या टॉमीने फिर्यादीच्या डाव्या हातावर व पायावर वार केले. तसेच दुसऱ्या आरोपीने त्याच्या हातातील धारदार वस्तूच्या उलट्या बाजूने फिर्यादीच्या डोक्यात मारून गंभीर जखमी केले. या मारहाणीच्या झटापटीत फिर्यादीचा मोबाईल फोन सुद्धा तुटून नुकसान झाले आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन कायदेशीर कागदपत्र व पंचनाम्याची प्रक्रिया पूर्ण केली आहे. फिर्यादीच्या फिर्यादीवरून भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमांनुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक तेजश्री धोरात मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी करीत आहेत.

स्नेहालयात २१ नोव्हेंबरला रंगणार लायन्सच्या दिवाळी मेळावा

अहिल्यानगर : लायन्स क्लब ऑफ अहिल्यानगरच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही वंचित व गरजू मुलांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्यासाठी १९ व्या दिवाळी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा आनंद सोहळा शनिवार, दिनांक २१ नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजता स्नेहालय येथे आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमाला गुरु अर्जुन सामाजिक प्रतिष्ठानचे विशेष सहकार्य लाभणार आहे. सर्व नागरिकांना या आनंदसोहळ्यात सहभागी होण्याचे आवाहन अध्यक्ष हरजितसिंग वधवा, सचिव हरीश हरवानी, खजिनदार विजय कुलकर्णी आणि लिओ अध्यक्ष हर्ष किथानी यांनी केले आहे. लिओ क्लबच्या सदस्यांकडून विशेष खेळांचे आयोजन करण्यात येणार आहे. कार्यक्रमानंतर सर्वांसाठी अल्पोपहार व स्नेहभोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. या उपक्रमाचे दिलीप कुलकर्णी, प्रिया मुनोत, डॉ. अमित बडवे आणि गुरनूरसिंग वधवा जबाबदारी सांभाळत आहेत. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. एस. एस. दीपक, मोहनशेठ मानधना, सिमरतलाल बोरा आणि शरदभाऊ मुनोत उपस्थित राहणार आहेत. या मेळाव्याच्या यशस्वी आयोजनासाठी सुनील छाजेड, किरण भंडारी, कमलेश भंडारी, प्रशांत मुनोत, धनंजय भंडारे, अरविंद पारगावकर, डॉ. संजय असनानी, संतोष माणकेश्वर, योगेश भंडारी, संदेश कटारिया, सीए शंकर अंदानी, सुमित लोढा, तसेच लिओ ओम भंडारी आणि जपज्योत बग्गा प्रयत्नशील आहेत.

नाट्य परिषदेच्या अहिल्यानगर जिल्हा उपाध्यक्षपदी अविनाश कराळे

अहिल्यानगर : अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, अहिल्यानगर जिल्हा शाखेच्या उपाध्यक्षपदी पत्रकार, निवेदक, नाट्यसमीक्षक तथा रंगकर्मी अविनाश कराळे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. जिल्हा शाखेची बैठक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. यावेळी नूतन पदाधिकाऱ्यांच्या निवडीची घोषणा करण्यात आली. यावेळी सहकार्यवाहपदी नाना मोरे यांची निवड करण्यात आली. तसेच कार्यकारिणी सदस्य म्हणून ज्येष्ठ साहित्यिक सदानंद भणगे, उद्योजक तथा रंगकर्मी अमित गटणे, निवेदक उद्धव काळापहाड, सी.ए. राजेंद्र ऊर्फ ज्ञानेश्वर काळे, उद्योजक अशोक अकोलकर, रंगकर्मी तेजा पाठक, आर्टिस्ट किरण गवते, चित्रकार प्रशांत सूर्यवंशी आणि अभिजित दरेकर यांच्यासह सदस्यांची निवड करण्यात आली. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, अहिल्यानगर जिल्हा शाखेचे अध्यक्ष अमोल खोले यांनी नूतन पदाधिकाऱ्यांच्या निवडीची घोषणा केली. यावेळी नाट्य परिषदेच्या नियामक मंडळाचे मुंबई येथील कोषाध्यक्ष सतीश लोटके, प्रमुख कार्यवाह सागर मेहेत्रे, कोषाध्यक्ष अनंत जोशी तसेच कार्यकारिणी सदस्य गणेश लिमकर उपस्थित होते. बैठकीत संघटनात्मक बळकटी, नाट्यविषयक उपक्रम, नवोदित कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि जिल्ह्यातील नाट्यचळवळीचा विस्तार याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. शाखेच्या आगामी कार्याचा आराखडा आणि विविध उपक्रमांच्या नियोजनाबाबत सदस्यांनी आपली मते मांडली. अहिल्यानगर जिल्हा शाखेचे रौप्यमहोत्सवी वर्ष विविध उपक्रमांनी उत्साहात साजरे करण्यात येणार असल्याची घोषणा यावेळी करण्यात आली. या निमित्ताने जिल्हाभरात सांस्कृतिक, साहित्यिक आणि नाट्यविषयक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

तब्बल २८ वर्षांनंतर पुन्हा जुळले गुरु-शिष्यांचे ऋणानुबंध!

वृद्धेश्वर विद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात संपन्न

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



पाथर्डी शहर : काळ पुढे सरकला, आयुष्याच्या वाटा बदलल्या, प्रत्येकजण आपापल्या संसारात आणि जबाबदाऱ्यांमध्ये रमला; मात्र शाळेच्या वर्गखोल्यांत घालवलेले बालपण, मित्रांसोबतच्या आठवणी आणि गुरुजनांनी दिलेले संस्कार मनात कायम घर करून राहिले. याच स्नेहबंधांना उजाळा देत श्री वृद्धेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात मार्च १९९८ मधील इयत्ता दहावी आणि फेब्रुवारी २००० मधील इयत्ता बारावीच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा मोठ्या उत्साहात आणि भावपूर्ण वातावरणात संपन्न झाला. तब्बल २६ ते २८ वर्षांनंतर एकत्र आलेल्या १०० विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि त्यांना घडविणाऱ्या २५ गुरुजनांच्या उपस्थितीने विद्यालयाचा परिसर जुन्या आठवणींनी गजबजून गेला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यालयाच्या उभारणीत मोलाचे योगदान देणारे कै. ग. रा. तथा रावसाहेब म्हस्के यांच्या पुतळ्याचे दर्शन घेऊन उपस्थितांनी पुष्पहार अर्पण केला. त्यानंतर प्रतिमापूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. विद्यार्थ्यांनी उपस्थित सर्व गुरुजनांचे यथोचित स्वागत करून त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली. या स्नेहमेळाव्यास प्रा. आसलकर सर, प्रा. मोरे सर, माजी प्राचार्य प्रा. शिवाजी आठरे सर, माजी प्राचार्य एस. बी. वाघ सर, माजी प्राचार्य दोडके सर, सुरसे सर, डी. आर. लवांडे सर, डी. के. शिंदोरे सर, डी. यू. शिंदे सर, चितळे सर, वांढेकर पी. पी. सर, एकशिंगे सर, कोलते सर, पुरनाळे सर, महानोर सर, शिंदे सर, फटांगरे सर तसेच इयत्ता पहिली ते चौथीपर्यंत शिकविणाऱ्या श्रीमती डहाळे मॅडम उपस्थित होत्या.

या वेळी मान्यवरांनी मनोगत व्यक्त करताना शाळेच्या आठवणी आणि गुरु-शिष्यांच्या नात्याचे महत्त्व अधोरेखित केले. माजी प्राचार्य प्रा. शिवाजी आठरे सर यांनी, विद्यार्थी हा गुरूंचा गुरू असतो, असे मार्मिक प्रतिपादन केले. सुरसे सर यांनी, विद्यार्थी देश-विदेशात आपल्या विद्यालयाचा नावलौकिक वाढवतात, असे गौरवोद्गार काढले. माजी प्राचार्य एस. बी. वाघ सर यांनी, आपण आज यशस्वी झालो आहोत, त्या यशामध्ये विद्यालयाचा मोठा वाटा आहे. त्यामुळे या शाळेच्या प्रगतीसाठी सर्वांनी मदतीचा हात द्यावा, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. आसलकर सर यांनी आपल्या खुमासदार शैलीत शब्दांच्या कोट्या करत विद्यार्थ्यांची मने जिंकली.

यावेळी डॉ. शैलेंद्र मरकड, रोहिदास कारखिले, प्रतिभा लवांडे, गिरीजा गारुडकर आणि गोसावी सर यांचा विशेष सत्कार करण्यात आला. त्यानंतर स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रकाश वांढेकर, किरण कराळे, मेहताब पठाण, वैभव पालवे, क्षमा आसलकर आणि विनया देशमुख यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी विद्यार्थी अविनाश नरवडे सर यांनी केले. सूत्रसंचालन विजय कारखिले सर यांनी केले, तर ज्योतिबा आठरे सर यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या शेवटी दिवंगत शिक्षक आणि विद्यार्थ्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

सोशल मीडियावर बदनामीचा आरोप

तरुणाची पोलीस, महसूल व पंचायत समितीकडे धाव

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

श्रीगोंदा : पेडगाव येथील गौरख मोहन खेडकर यांनी गावातील इसम महादेव गावडे व त्यांच्या कुटुंबीयांविरोधात गंभीर तक्रार दाखल केली आहे. आपल्याला मारहाण केल्यानंतर सोशल मीडियाच्या माध्यमातून बदनामी केली जात असून, खोटे आरोप करून गावात जातीय तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप त्यांनी तक्रारीत केला आहे. याप्रकरणी श्रीगोंदा पोलीस निरीक्षक, तहसीलदार, गटविकास अधिकारी आणि पेडगाव ग्रामपंचायतीकडे निवेदन देण्यात आले आहे.



तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, संबंधित कुटुंबीय २ नोव्हेंबर २०२६ रोजी अहिल्यानगरहून मुंबईला गेले होते. दरम्यान, पत्नीला शिवीगाळ केल्याच्या कारणावरून झालेल्या वादात लोखंडी वस्तूने डोक्यात मारहाण करण्यात आल्याचा आरोप गौरव खेडकर यांनी केला आहे. याप्रकरणी त्यांनी संबंधित इसमाविरुद्ध गुन्हा दाखल केल्याचेही निवेदनात नमूद केले आहे. मात्र, त्यानंतर संबंधित व्यक्ती गावातून फरार झाल्याचा आणि २ नोव्हेंबरपासून व्हॉट्सप, फेसबुकसह विविध समाजमाध्यमांवरून आपली बदनामी केली जात असल्याचा दावा तक्रारदाराने केला आहे. पत्नीबाबत आक्षेपार्ह आरोप करणे, गावात राहण्यास विरोध करणे, तसेच चुकीचे व्हिडिओ प्रसारित करून सामाजिक वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न होत असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.विशेष म्हणजे, पेडगावमध्ये धनगर समाजाची सुमारे १५० ते २०० लोकसंख्या असून गावात आपले एकमेव घर असल्याचे तक्रारदाराने नमूद केले आहे. शेजारील घरातील व्यक्तींच्या माध्यमातून आपल्यावर अन्याय होत असून या प्रकारामुळे गावात जातीय तेढ निर्माण होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.

सोशल मीडियावरून होणारी कथित बदनामी, प्रसारित केले जाणारे व्हिडिओ आणि जातीय तेढ निर्माण करणाऱ्या वक्तव्यांची सखोल चौकशी करावी.

वस्तुस्थिती तपासून संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी गौरव खेडकर यांनी केली आहे. आता पोलीस प्रशासनासह महसूल व पंचायत समिती प्रशासन या तक्रारीची काय दखल घेते, याकडे पेडगाव ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

एमआयडीसीत घरफोडी; रोख रकमेसह सोन्या-चांदीच्या दागिन्यांची चोरी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत येत असलेल्या इमामपुरा परिसरात एक मोठी घरफोडीची घटना समोर आली आहे. या प्रकरणी मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी रवींद्र दामोदर टिमकरे यांच्या राहत्या घरातील बंद खोलीचे कुलूप अज्ञात चोरट्याने तोडले. अज्ञात चोरट्याने घरात बेकायदेशीर प्रवेश करून घरातील साहित्याची खाडाखोड करत रोख रक्कम आणि दागिन्यांवर हात साफ केला. चोरीच्या या घटनाक्रमात सोन्याचे कानातील वेढे, सोन्याची अंगठी, नथ, सोन्याची गोरी आणि चांदीचे दागिने चोरले गेले आहेत. तसेच घरामध्ये ठेवलेली मोठी रोख रक्कम आणि शेजारी राहणाऱ्या सीताराम लक्ष्मण टिमकरे यांची रोख रक्कम देखील चोरीस गेली आहे. या चोरीमध्ये एकूण एक लाख सोळा हजार दोनशे रुपयांचा मुद्देमाल अज्ञात चोरट्यांनी लांबवल्याची नोंद करण्यात आली आहे. ही घटना दिनांक चौदा नोव्हेंबर रोजी रात्री दहा वाजता ते दिनांक पंधरा नोव्हेंबर रोजी पहाटे दोन वाजून सात मिनिटांच्या दरम्यान घडली. सदर घटनेची माहिती मिळताच एमआयडीसी पोलीस ठाण्याचे अधिकारी व गुन्हे शोध पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळाची पाहणी करण्यासाठी फॉरेन्सिक पथक, श्वान पथक आणि बोटांच्या ठोशांचे पथक देखील पाचारण करण्यात आले होते. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनास्थळाचा पंचनामा करून पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली असून चोरट्यांचा शोध घेतला जात आहे. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून रात्रीच्या गस्ती वाढवण्याची मागणी होत आहे. अज्ञात चोरट्यांचा शोध घेण्यासाठी पोलिसांची पथके वेगवेगळ्या दिशेने कसून तपास करत आहेत.

पारनेर-पुणे एस टी बससेवा १ डिसेंबर रोजी सुरू

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



निघोज : दि.१ डिसेंबर रोजी सुरू करणार असून प्रवाशांनी या एस टी बसचे जोरदार स्वागत करावे असे आवाहन व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष बबनराव तनपुरे यांनी केले आहे. व्यापारी असोसिएशन पदाधिकारी व ग्रामस्थ यांची एकत्रित रविवार दि.१५ नोव्हेंबर रोजी व्यापारी असोसिएशन कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली होती यावेळी ते बोलत होते. यावेळी राजेंद्र लाळगे, शुभम गाडीलकर, लहूशेठ गागरे, मोहन कवाद, सुनिल पवार, प्रशांत लोळगे, रुपेश ढवण, दत्तात्रय चौधरी, सुनील वराळ, विलासराव हारदे, बबनराव ससाणे, विक्रांत रणसिंग, संतोष शेटे, स्वप्नील जाधव, पत्रकार दत्ता उनवणे, सुरेश खोसे आदी तसेच व्यापारी असोसिएशन विश्वस्त मंडळ व पदाधिकारी, निघोज स्पोर्ट्स क्लब पदाधिकारी व सदस्य तसेच ग्रामस्थ यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष बबनराव तनपुरे यावेळी म्हणाले पारनेर ते पुणे तसेच पुणे ते पारनेर ही एस टी बस सेवा दि.१ डिसेंबर रोजी सुरू होणार आहे.

पारनेर येथून सकाळी ७ वाजता ही एस टी बस पारनेर, चिंचोली वडझिरे, देवीभोयरे फाटा, देवीभोयरे, वडगाव गुंड, निघोज, जगप्रसिद्ध रांजणखळगे (कुंड पर्यटन स्थळ), टाकळी हाजी, आमदाबाद, आमदाबाद फाटा, मलठण, सोनसांगवी, रांजणगाव, शिक्रापूर मार्गे शिवाजीनगर येथे जाणार असून पुन्हा परतीचा प्रवास शिवाजीनगर येथून सायंकाळी ५ वाजता याच मार्गाने करणार असून या बससेवेचा लाभ घेण्याचे आवाहन व्यापारी असोसिएशन व ग्रामस्थ यांनी केले आहे.

ही एस टी बस सेवा सुरु करण्यासाठी व्यापारी असोसिएशन यांनी खासदार निलेश लंके, आमदार काशिनाथ दाते तसेच एस टी मंडळाचे अधिकारी यांच्या माध्यमातून प्रयत्न केले होते.

सगळ्यांनीच पाठपुरावा केल्याने ही एस टी बस सेवा सुरु होणार आहे. जगप्रसिद्ध रांजणखळगे मार्गे जाणारी ही पहिलीच एस टी बस सेवा असल्याने या बससेवेला पर्यटक, मळगंगा देवीचे भक्तगण यांचा मोठा प्रतिसाद मिळणार आहे. तसेच या मार्गावरील गाव व पंचक्रोशीतील ग्रामस्थ, व्यापारी, उद्योजक यांना सातत्याने पुणे येथे उद्योग व्यवसाय निमित्ताने जाणे येणे असते त्यांनाही या एस टी बसचा उपयोग मोठ्या प्रमाणात होणार असल्याने ही एस टी बस सेवा सातत्याने सुरू राहणार असल्याने प्रवाशांनी या एस टी बससेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन व्यापारी असोसिएशन पदाधिकारी व सदस्य तसेच ग्रामस्थ यांनी केले आहे.

क्रीडा संकुल अन् अभ्यासिकेचा प्रश्न मार्गी लावा

अन्यथा पुन्हा आंदोलन.....

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



श्रीगोंदा : तालुका क्रीडा संकुल गेल्या दहा वर्षांपासून धूळखात पडले असून, ४०० मीटर धावण्याचा ट्रॅक आणि नगरपरिषद हद्दीतील अपूर्ण अभ्यासिका सुरू करण्याच्या मागणीने आता जोर धरला आहे. पोलीस भरती, सैन्य भरती आणि स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या युवकांच्या भवितव्याचा प्रश्न उपस्थित करत विद्यार्थी संघर्ष समितीचे अध्यक्ष तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रशांत ओगले यांनी प्रशासनाला निवेदन दिले आहे. मागण्या मान्य न झाल्यास पुन्हा आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

श्रीगोंदा तालुका क्रीडा संकुलात ४०० मीटरचा धावण्याचा ट्रॅक विकसित करावा, आवश्यक दिवाबत्तीची व्यवस्था करावी आणि संकुल युवकांसाठी खुले करावे, अशी प्रमुख मागणी आहे. सध्या सरावासाठी मैदान उपलब्ध नसल्याने भरतीची तयारी करणाऱ्या तरुणांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. दुसरीकडे, नगरपरिषद हद्दीतील अभ्यासिकेचे बांधकाम अपूर्ण असल्याने ग्रामीण भागातून शहरात येणाऱ्या विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी योग्य जागा मिळत नाही.

या दोन्ही प्रश्नांवर प्रशासनाने तातडीने निर्णय घेऊन निधी उपलब्ध करावा आणि प्रत्यक्ष कामाला सुरुवात करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, केवळ आश्वासनांवर समाधान मानणार नसून प्रत्यक्ष काम सुरू होईपर्यंत पाठपुरावा सुरू ठेवण्याची भूमिका प्रशांत ओगले यांनी घेतली आहे.

युवकांच्या प्रश्नांवर यापूर्वीही आवाज उठवण्यात आला आहे. आता निवेदन देऊन प्रशासनाला प्रश्न मार्गी लावण्याची संधी देण्यात आली आहे. मात्र, मागण्यांची दखल घेतली नाही आणि क्रीडा संकुल व अभ्यासिकेचा प्रश्न प्रत्यक्षात सुटला नाही, तर पुन्हा आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे आंदोलनाची वेळ येण्यापूर्वीच प्रशासनाने हा प्रश्न मार्गी लावणे अपेक्षित आहे. युवकांना आश्वासनांपेक्षा मैदानावर धावण्याची आणि अभ्यासिकेत बसून भविष्य घडवण्याची संधी कधी मिळणार, हा खरा प्रश्न आहे.

चखालेवाडीच्या पाणीप्रश्नासाठी अखेर उपोषणाचे हत्यार

अतुल सुरबुरेंसह १२ ग्रामस्थ बेमुदत उपोषणाला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

राशीन : कर्जत तालुक्यातील चखालेवाडी येथील प्रलंबित पाणीटंचाईचा प्रश्न अखेर आंदोलनाच्या रूपाने पेटला आहे. मेरगळ वस्ती आणि वाघनळी वस्ती येथील सुमारे १०० नागरिकांना सुरळीत पाणीपुरवठा व्हावा, नवीन पाइपलाइन टाकण्यात यावी तसेच गावातील मूलभूत सुविधांची कामे मार्गी लागावीत, या मागण्यांसाठी शिवसेनेचे अहिल्यानगर दक्षिण जिल्हा उपप्रमुख अतुल बबन सुरबुरे यांच्यासह १२ ग्रामस्थ आज, सोमवार दि. १६ नोव्हेंबर २०२६ रोजी श्रीराम मंदिर, चखालेवाडी येथे उपोषणाला बसले आहेत.

चखालेवाडी परिसरातील मेरगळ वस्ती आणि वाघनळी वस्ती येथे सुमारे १०० नागरिकांची वस्ती असून, या भागातील पाणीपुरवठ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. नागरिकांना पाण्यासाठी अडचणींचा सामना करावा लागत असल्याने संबंधित वस्त्यांसाठी नवीन पाणीपुरवठा पाइपलाइन टाकण्याचे नियोजन करावे, तसेच अस्तित्वातील पाइपलाइनची दुरुस्ती करून नियमित पाणीपुरवठा सुरू करावा, अशी आंदोलकांची प्रमुख मागणी आहे.

या आंदोलनात अतुल बबन सुरबुरे, उत्तम बाजीराव शिंगाडे, लहू माणिक खटके, राहुल त्रिंबक चखाले, अक्षय बापू मेरगळ, बापू तात्या गाढवे, प्रमोद आटोळे, वैभव बुरंगे, बाळासाहेब गाढवे, राहुल गाढवे, प्रकाश खटके आणि अमोल खटके हे १२ जण सहभागी झाले आहेत.

पाणीपुरवठ्याच्या मागणीबरोबरच गावातील श्रीराम मंदिर आणि हनुमान मंदिर परिसरात ग्रामपंचायतीच्या माध्यमातून १४ वा किंवा १५ वा वित्त आयोगाच्या निधीतून पेव्हर ब्लॉक बसविण्यात यावेत, अशी मागणीही आंदोलकांनी केली आहे. धार्मिक स्थळांच्या परिसरात आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

या मागण्यांसंदर्भात ग्रामपंचायतीकडे वारंवार अर्ज आणि निवेदने देऊनही अपेक्षित कार्यवाही झाली नसल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे. प्रशासनाकडून केवळ आश्वासने नकोत, तर प्रत्यक्ष कामाला सुरुवात व्हावी, अशी भूमिका घेत ग्रामस्थांनी उपोषणाचा मार्ग स्वीकारला आहे.

यासंदर्भात कर्जत पंचायत समितीचे गटविकास अधिकारी तसेच मिरजगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांनाही निवेदन देण्यात आले आहे.

पिण्याचे पाणी ही नागरिकांची मूलभूत गरज असताना त्यासाठी ग्रामस्थांना उपोषणाला बसण्याची वेळ येणे ही निश्चितच चिंतेची बाब आहे. चखालेवाडीतील



१२ ग्रामस्थांनी सुरू केलेल्या या आंदोलनाची पंचायत समिती प्रशासन आणि ग्रामपंचायत प्रशासन कितपत दखल घेते, तसेच पाणीपुरवठ्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रत्यक्ष कोणती पावले उचलली जातात, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

आंदोलन चिघळण्यापूर्वी प्रशासनाने तातडीने दखल घेऊन संबंधित मागण्यांवर ठोस निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.

दैनिक
राष्ट्र सह्याद्री

मंगळवार, दि.१७ नोव्हेंबर २०२६ । पान ८

गोदावरीच्या नागमठान पुलावरील उपोषणाचे सहाव्या दिवशीही ठोस निर्णय नाही

शेतकऱ्यांचा तीव्र संताप

बंधारे भरण्यासाठी जलसंपदा विभाग पुन्हा १२० एमसी एफ्टी पाणी सोडण्याचे विचारात ?

गोदावरी नदीवरील बंधारे भरण्यासाठी सप्टेंबर महिन्यात नांदुर मध्यमेश्वर मधुन सोडलेले १२० एमसी एफ्टी पाणी कोपरगांव, राहता तालुक्यातील केटीवेअर बंधाऱ्यातून खाली वैजापूर श्रीरामपूर तालुक्यातील बंधाऱ्यात पोहचले नसल्याने खालील बंधारे कोरडे राहिल्याने . सलग एक महिन्यापासून आंदोलन उपोषण सुरू आहे. या कालावधीत पूर्ण क्षमतेने भरलेले वरील बंधाऱ्याची पातळी ५० टक्क्यांवर आली असल्याने आता पुन्हा १२० एमसी एफ्टी पाणी आश्वासित म्हणून सोडण्याच्या हालचाली सुरू असल्याचे समजते. मात्र पुन्हा तीच परिस्थिती ऊदभवणार असल्याने जलसंपदा विभागाचे अधिकाऱ्यांची मोठी डोकेदुखी वाढली आहे.



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

माळवाडगांव : गोदावरी नदीवरील वैजापूर श्रीरामपूर तालुक्याचे लाभक्षेत्रातील गावाचा समावेश असलेल्या वांजरगांव खानापूर कमालपूर या तीन केटीवेअर बंधारे पिण्यासाठी किमान ५० टक्के भरून द्यावेत या प्रमुख मागणीसाठी नागमठान पुलावर बसलेल्या १० ऊपोषणार्थींचा सहाव्या दिवशी तब्येत अस्वस्थ होत असल्याने शासकीय रुग्णालयातील उपोषणस्थळी येऊन तपासणी केली. उपोषणार्थींच्या साथीला शेकडो शेतकरी तळ ठोकुनही शासनाकडून ठोस निर्णय होत नसल्याने गंगथडी भागातील शेतकऱ्यांत तीव्र संताप व्यक्त होत आहे.

प्रारंभी गोदावरी नदीवरील नागमठान पुलावर सप्टेंबर मध्ये आत्मदहन आंदोलन, त्यानंतर महिनाभराने ११ नोव्हेंबर २०२६ पासून शेतकरी संघटनेचे वैजापूर तालुकाध्यक्ष गणेश तांबे यांच्यासह सर्वपक्षीय शेतकरी आमरण उपोषण व पाठिंबा देण्यासाठी बसवलेले आहेत. रब्बी हंगाम पीकणारच नसल्याने हातातोंडाशी आलेले खरिपातील पीके वाचवून कापूस वेचणी,ऊस तोड प्रतिक्षा, जनावरांच्या पुढील सहा महिन्यांसाठी मका कुट्टी अशा एक ना अनेक शेतीकामात शेतकरी गुंतलेले आहेत. दिवसभर आंदोलनस्थळी थांबायला फुरसत नसल्याने. शेतकरी आलटुन पालटुन कुणी सकाळी तर कुणी सायंकाळी वेळ काढून हजेरी लावत आहे. दररोज सायंकाळी किर्तन भजन पार पडत आहे.

कमालपूर, नाऊर येथे आंदोलन पार पाडल्यानंतर नागमठान येथील मुख्य ठिकाणी आमरण उपोषण सुरुच आहे. उपोषणाला दररोज राजकीय नेत्यांसह प्रशासकीय अधिकारी भेट देऊन आढावा घेत आहेत.आज शिंदे सेनेचे माजी आमदार भाऊसाहेब कांबळे, सचिन बडधे यांनी उपोषणस्थळी भेट दिली. श्रीरामपूरचे अप्पर पोलीस अधिक्षक सोमनाथ वाकचौरे, उपविभागीय अधिकारी जयदत्त भवर,प्रशिक्षणार्थी डि वाय एस पी कल्पना पवार यांनी उपोषणस्थळी भेट देऊन उपोषण मागे घेण्याची विनंती केली.

रामायणाच्या संस्कृतीचा जागर!

टपाल तिकिटांतून प्रभू श्रीरामांच्या जीवनचरित्राला उजाळा



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

आधी : भारतीय संस्कृतीचा गौरवशाली वारसा आणि प्रभू श्रीरामांच्या जीवनातील आदर्श विचार जगभर पोहोचविण्याच्या उद्देशाने भारतीय डाक विभागाच्या वतीने सन २०१७ मध्ये रामायणावर आधारित विशेष टपाल तिकिटांचा संच जारी करण्यात आला होता. दीपावलीचा मंगलमय सण आणि रामायण चित्रपटाच्या प्रदर्शनाच्या पार्श्वभूमीवर या टपाल तिकिटांना पुन्हा एकदा विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

याच औचित्याने आश्वी खुर्द डाक कार्यालयाच्या वतीने पत्रकार संजय गायकवाड यांना रामायणावर आधारित विशेष टपाल तिकिटांचा संच सप्रेम भेट देण्यात आला. आश्वी खुर्द डाक कार्यालयाचे सब पोस्टमास्तर अमोल गवांदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोस्टमन चेतन डेंगळे यांच्या हस्ते ही भेट प्रदान करण्यात आली.

रामायणातील विविध महत्त्वपूर्ण प्रसंग, प्रभू श्रीरामांचे आदर्श जीवनचरित्र आणि भारतीय संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या या टपाल तिकिटांमधून भारतीय परंपरेचा अनमोल ठेवा जतन करण्यात आला आहे. टपाल तिकीट हे केवळ पत्रव्यवहाराचे माध्यम नसून देशाचा इतिहास, संस्कृती, परंपरा आणि महत्त्वपूर्ण घटनांचे दर्शन घडविणारे प्रभावी माध्यम आहे. अशा विशेष तिकिटांच्या माध्यमातून रामायणाचा सांस्कृतिक वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचण्यास निश्चितच मदत होत आहे.

रामायणाचा वारसा टपाल तिकिटांतून जगभर!

रामायण टपाल तिकिटांच्या माध्यमातून प्रभू श्रीरामांचे विचार, रामायणातील विविध प्रसंग आणि भारतीय संस्कृतीचा गौरव देशभरासह जगभर पोहोचण्यास मदत होईल. नागरिकांनी अशा विशेष टपाल तिकिटांचे महत्त्व जाणून त्यांचे जतन करावे, असे आवाहन आश्वी खुर्दचे सब पोस्टमास्तर अमोल गवांदे यांनी केले.

श्रीगोंद्यात गुटख्याची 'घरपोच' सेवा!

स्कुटीवरून खुलेआम वितरण; बांधकाम मजूर ते हॉटेलपर्यंत जाळे विस्तारले?

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

श्रीगोंदा : राज्यात गुटखा विक्री आणि वाहतुकीवर कायद्याने बंदी असतानाही श्रीगोंदा शहरात मात्र गुटख्याची जणू घरपोच सेवा सुरू असल्याचे चित्र समोर येत आहे. बांधकाम मजूर, परप्रांतीय कामगार तसेच शहरातील गुटख्याचे शौकीन ग्राहक यांना मागणीप्रमाणे गुटखा उपलब्ध करून दिला जात असल्याची चर्चा आहे. विशेष म्हणजे, गुटखा विक्रेते स्कुटीवरून शहरातील विविध भागांत फिरून हॉटेल, बांधकाम सुरू असलेली ठिकाणे आणि ग्राहकांच्या मागणीनुसार गुटखा पोहोचवत असल्याचे सांगितले जात आहे.

पूर्वी गुटखा खरेदी करण्यासाठी ठरावीक दुकानांवर जावे लागत होते. मात्र आता ग्राहकाने मागणी केली की गुटखा थेट हॉटेलवर, घराजवळ किंवा कामाच्या ठिकाणी पोहोचवला जात असल्याची माहिती पुढे येत आहे. त्यामुळे बंदी असलेल्या गुटख्याचा पुरवठा नेमका कुठून होतो, त्याची साठवणूक कुठे केली जाते आणि या व्यवसायामागे कोणाचे पाठबळ आहे, असे प्रश्न उपस्थित होत आहेत.

शहरात दुचाकीवरून होणाऱ्या या वितरणावर संबंधित यंत्रणांचे लक्ष आहे की नाही, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. गुटख्याच्या विक्रीवर बंदी असताना त्याची मागणी पूर्ण करणारे विक्रेते इतक्या निर्भयपणे व्यवसाय कसा करतात, हा तपासाचा विषय आहे.

आता अन्न व औषध प्रशासन आणि पोलिसांनी केवळ किरकोळ विक्रेत्यांवर कारवाई न करता या पुरवठा साखळीच्या मुळापर्यंत पोहोचण्याची गरज आहे. स्कुटीवरून होणारे वितरण, गुटख्याचे साठे आणि मुख्य पुरवठादार यांचा शोध घेऊन कठोर कारवाई होणार का, याकडे श्रीगोंदाकरांचे लक्ष लागले आहे.

चांद्यात गोवंश कत्तलीसाठी जाणाऱ्या आठ जनावरांची सुटका!



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

शिंगणापूर : नेवासा तालुक्यातील चांदा येथे गोवंशीय जनावरांना कत्तलीच्या उद्देशाने डांबून ठेवल्याचा संशयास्पद प्रकार स्थानिक गुन्हे शाखेच्या कारवाईत उघडकीस आला आहे. खंडोबा मंदिर परिसरातील काटवन, पत्र्याच्या शेडच्या आडोशाला आणि चांदा-कुकाणा रस्त्यालगत अशा तीन ठिकाणी पोलिसांनी छापे टाकून आठ गोवंशीय जनावरांची सुटका केली. या कारवाईत सुमारे १ लाख १५ हजार रुपये किमतीची जनावरे ताब्यात घेण्यात आली असून, याप्रकरणी चांदा येथील तिघांविरुद्ध सोनई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. छाप्याच्या वेळी तिन्ही संशयित पसार असल्याने पोलिसांकडून त्यांचा शोध सुरू आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील अवैध व्यवसायांवर कारवाई करण्याचे आदेश पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी स्थानिक गुन्हे शाखेला दिले होते. त्यानुसार पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक हरिष भोये व पथक अवैध धंद्यांवर लक्ष ठेवून होते. रविवारी (दि. १५) सोनई पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत असताना चांदा येथे गोवंशीय जनावरे कत्तलीच्या उद्देशाने डांबून ठेवल्याची गोपनीय माहिती पथकाला मिळाली.

या माहितीच्या आधारे पोलिसांनी पंचांसमक्ष तीन वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकले. यावेळी आठ गोवंशीय जनावरे दाटीवाटीने डांबून ठेवल्याचे आढळले. पोलिसांनी तातडीने जनावरांची सुटका करून त्यांना ताब्यात घेतले. या जनावरांची बाजारभावानुसार किंमत सुमारे १ लाख १५ हजार रुपये आहे. या जनावरांची मालकी अयनाज मोबीन शेख, आशकान अमिन शेख आणि नबाब गुलाब शेख (तिघे रा. चांदा, ता. नेवासा) यांच्याकडे असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. मात्र, कारवाईदरम्यान तिघेही घटनास्थळी मिळून आले नाहीत. याप्रकरणी सोनई पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ४८९/२०२६ अन्वये महाराष्ट्र पशुसंरक्षण अधिनियम १९९५ (सुधारित २०१५) मधील कलम ५ (अ), ५ (ब) व ९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सोनई पोलीस करीत आहेत.

अवैध गोवंश व्यवहारांच्या साखळीचा तपास होणार का?

चांदा परिसरात तीन वेगवेगळ्या ठिकाणी गोवंशीय जनावरे डांबून ठेवल्याचा प्रकार उघडकीस आल्याने अवैध गोवंश व्यवहारांचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे. या जनावरांचा पुरवठा कोठून झाला, त्यांची वाहतूक कोणी केली आणि या व्यवहारात आणखी कोणाचा सहभाग आहे, याचा तपास होणे आवश्यक आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या कारवाईमुळे आठ जनावरांची सुटका झाली असली, तरी संशयितांचा शोध घेऊन या व्यवहारामागील संपूर्ण साखळी उघड करण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे.

प्रदूषण कमी करणाऱ्या कारखान्यांना मिळणार आर्थिक लाभ

महाराष्ट्रात नवी व्यवस्था : गुजरातच्या यशस्वी प्रयोगाचा महाराष्ट्रात विस्तार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

मुंबई : औद्योगिक विकासाला चालना देतानाच वाढत्या वायुप्रदूषणावर नियंत्रण मिळविण्यासाठी महाराष्ट्रात कारखान्यांच्या प्रदूषणावर नियंत्रण ठेवणारी नवी आर्थिक व्यवस्था लागू करण्यात येणार आहे. गुजरातमध्ये यशस्वी ठरलेल्या प्रदूषण नियंत्रणाच्या प्रयोगाचा महाराष्ट्रात विस्तार केला जाणार असून, त्यानंतर राजस्थानमध्येही ही पद्धत राबविण्यात येणार आहे. 'द अर्थशॉट प्राईझ'च्या वतीने मुंबईत आयोजित 'इम्पॅक्ट असेंब्ली'मध्ये सोमवारी या उपक्रमाची घोषणा करण्यात आली. या निर्णयामुळे महाराष्ट्र आणि राजस्थानमधील सुमारे २१ कोटी नागरिकांना स्वच्छ हवा मिळण्यास मदत होण्याची अपेक्षा आहे.

कारखान्यांमधून बाहेर पडणाऱ्या सूक्ष्म धूलिकणांमुळे (पार्टिक्युलेट मॅटर) हवेचे प्रदूषण वाढते. त्यावर नियंत्रण मिळविण्यासाठी गुजरातमध्ये प्रथमच कारखान्यांच्या प्रदूषणाची मर्यादा निश्चित करून आर्थिक देवाणघेवाणीची व्यवस्था सुरू करण्यात आली. या पद्धतीनुसार, निर्धारित मर्यादेपेक्षा कमी प्रदूषण करणाऱ्या कारखान्यांना त्यांच्या शिल्लक प्रदूषण परवानगीची विक्री अन्य कारखान्यांना करता येते. त्यामुळे प्रदूषण कमी करणाऱ्या उद्योगांना आर्थिक लाभ मिळतो, तर अधिक प्रदूषण करणाऱ्या उद्योगांना अतिरिक्त खर्च सहन करावा लागतो.

'एमिशन्स मार्केट क्सिलरेटर' ही संस्था महाराष्ट्रातील या उपक्रमाच्या विस्तारासाठी मदत करणार आहे. पहिल्या टप्प्यात महाराष्ट्रात अंमलबजावणी होईल. त्यानंतर राजस्थानमध्येही ही व्यवस्था लागू केली जाईल.

दरम्यान, याच परिषदेत हरित वाहतुकीला प्रोत्साहन देण्यासाठी महिंद्रा लास्ट माईल मोबिलिटी आणि उबर यांच्यातही भागीदारी जाहीर झाली. इलेक्ट्रिक तीनचाकी वाहने उबरच्या व्यासपीठावर आणून चालकांना प्रदूषणकारी जुन्या वाहनांऐवजी इलेक्ट्रिक वाहनांचा वापर करण्यास प्रोत्साहित केले जाणार आहे.

जखमी झालेल्या दुर्मिळ बहिर ससाणा पक्षाला जीवदान

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

सोनई : निसर्ग व वन्यजीव संवर्धनाची एक प्रेरणादायी घटना नुकतीच सोनई - वांबोरी रोडवरील सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक शरद लिपाने यांच्या रानात शेतात घडली. याबत माहिती की,आठ दिवसापूर्वी दीपावलीच्या सुट्टी निमित्ताने गावी आलेल्या नातवंडांना लिपाने यांच्या नारळाच्या बागेत एक जखमी शिकारी पक्षी आढळून आला. जवळ जाऊन पाहिले तर तो अत्यंत दुर्मिळ प्रजातीचा बहिरी ससाणा असल्याचे लक्षात आले त्याच्या पायाला गंभीर दुखापत झाल्यामुळे त्याला चालता किंवा उडता येत नव्हते त्याच्या जिवाची ही अवस्था पाहून अगदी त्याला तात्काळ घरी आणण्यात आले.

त्याची प्रकृती सुधारावी म्हणून त्याला लिपाने यांनी अंडी,मांस, असा योग्य आहार व प्राथमिक औषधे दिली.या सेवेमुळे त्याच्या प्रकृतीमध्ये तरतरी आली.परंतु पायाच्या दुखापतीमुळे तो आकाशात झेप घेऊ शकत नव्हता,त्याला तज्ञ वैद्यकीय उपचाराची नित्यात गरज होती, तेव्हा शरद लिपाने यांनी अहिल्या नगर येथील वन विभागाचे अधीक्षक श्री.अविनाश तेलोरे यांच्याशी संपर्क साधून या घटनेची माहिती दिली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता श्री तेलोरे यांनी कोणताही विलंब न करता अत्यंत तातडीने प्रशासकीय यंत्रणा कार्यान्वित केली. त्यांनी तात्काळ नेवासा वनविभागाचे अधिकारी श्री. सिसोदे यांना कळविण्यात आले,त्यांच्या निर्देशानानुसार वनरक्षक श्री मोरे हे तातडीने सोनई येथे घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी जखमी बहिरा ससाणाला पाहणी करून त्याला अत्यंत सुरक्षितपणे पुढील उपचारासाठी अहिल्यानगर येथील वन केंद्रात रवाना केले. सध्या वनविभागाच्या तज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली जखमी पक्षाला औषध उपचार सुरू आहेत.



सेवानिवृत्त पोलीस अधिकारी लिपाने हे जखमी पक्षाला अन्न खाऊ घालताना (छाया - विजय खंडागळे)

वन विभागाने दाखवलेली तत्परता, संवेदनशीलता कौतुकास्पद आहे हा देखणा आणि चपळ पक्षाला या दुखापती पासून पूर्णपणे बरा होऊन पुन्हा त्याच्या परिवाराच्या सानिध्यात आपल्या कुटुंबाकडे सुखरूप जाईल असा आशीर्वाद वनविभागाने व्यक्त केला. या घटनेमुळे लिपाने परिवाराचे भरभरून कौतुक होत आहे.

दोन अपवयीन मुलींना रात्री रस्त्यावर उतरविल्याप्रकरणी एसटीचे दोन कर्मचारी निलंबित

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

मुंबई : एसटी बसमधून प्रवास करणाऱ्या दोन अल्पवयीन मुलींना रात्रीच्या वेळी अंधारात रस्त्यावर उतरविल्याच्या घटनेची परिवहन मंत्री तथा महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी गंभीर दखल घेतली आहे. या प्रकरणी तातडीने चौकशी करून संबंधित चालक आणि वाहक यांना १६ नोव्हेंबर २०२६ पासून निलंबित करण्यात आले आहे.

भंडारा आगाराच्या एसटी बसमधून प्रवास करणाऱ्या दोन अल्पवयीन मुलींना १४ नोव्हेंबर २०२६ रोजी रोहा येथे रात्रीच्या वेळी अंधारात बसमधून उतरविण्यात आल्याची बातमी स्थानिक वृत्तपत्रे, वृत्तवाहिन्या आणि समाजमाध्यमांवर प्रसिद्ध झाली होती. या घटनेमुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेबाबत प्रश्न उपस्थित झाले होते. या वृत्ताची तातडीने दखल घेत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी एसटी प्रशासनाला सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार भंडारा विभाग नियंत्रक आणि आगार व्यवस्थापक यांच्यामार्फत प्राथमिक चौकशी करण्यात आली. या चौकशीत संबंधित चालक अनिल सावरे आणि वाहक उदेभान मेश्राम यांची जबाबदारी निश्चित करण्यात आली असून, दोघांनाही निलंबित करण्यात आले आहे. तसेच महामंडळाच्या शिस्त व आवेदन कार्यपद्धतीनुसार त्यांच्याविरुद्ध पुढील कारवाई सुरू करण्यात आली आहे.

भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी एसटी कर्मचाऱ्यांनी विशेषतः शालेय विद्यार्थी आणि अल्पवयीन प्रवाशांच्या सुरक्षिततेची अधिक काळजी घ्यावी. विद्यार्थ्यांना त्यांच्या घरापर्यंत सुरक्षित पोहोचविण्याची जबाबदारी एसटी प्रशासनाची असून, कर्मचाऱ्यांनी त्यांच्याशी स्वतःच्या मुलांप्रमाणे संवेदनशीलतेने वागावे, अशा सूचना मंत्री सरनाईक यांनी दिल्या आहेत. यासंदर्भात एसटी प्रशासनाने आवश्यक त्या परिपत्रकीय सूचना तातडीने निर्गमित कराव्यात, असे निर्देश सरनाईक यांनी दिले आहेत.

प्रवाशांचा सुरक्षित प्रवास ही एसटी महामंडळाची सर्वोच्च प्राथमिकता आहे. विशेषतः महिला, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिक यांच्या सुरक्षिततेबाबत कोणतीही हयगय खपवून घेतली जाणार नाही. कर्तव्यात कसूर करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल. सध्या संबंधित कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले असून, यापुढे अशा प्रकारची घटना घडल्यास जबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांना सेवेतून बडतर्फ करण्याची कारवाई करण्यात येईल, असा इशाराही मंत्री सरनाईक यांनी दिला आहे.

फुले कृषि विद्यापीठाच्या लिंबू काढणी उपकरणास पेटंट

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

राहुरी : महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे नवी दिल्ली येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषदेअंतर्गत अखिल भारतीय समन्वित कृषि अवजारे व यंत्रे संशोधन प्रकल्प कार्यरत आहे. या प्रकल्पामध्ये संशोधित केलेले मनुष्यचलित लिंबू काढणी उपकरणास भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाने पेटंट प्रदान केले आहे. या उपकरणाच्या संशोधनात महत्त्वाचे योगदान देणारे अखिल भारतीय समन्वित कृषि अवजारे व यंत्रे संशोधन प्रकल्पाचे शास्त्रज्ञ डॉ. रविकिरण राठोड, डॉ. अण्णासाहेब शिंदे शासकीय कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सचिन नलावडे, संशोधन प्रकल्पाचे प्रमुख डॉ. तुळशीदास बास्टेवाड तसेच अजिंक्य गुंजाळ, ओंकार सोनवणे व तानाजी झोरे यांचा सक्रिय सहभाग आहे सदरचे पेटंट मिळविण्यासाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे व संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके यांचे मार्गदर्शन मिळाले आहे.



राहुरी कृषि विद्यापीठाने विकसित केलेल्या या यंत्रास ५४ व्या संयुक्त कृषि संशोधन व विकास समिती बैठकीमध्ये मान्यता मिळुन प्रसारित करण्यात आलेले आहे. हे उपकरण झाडावरून लिंबू सहजपणे काढण्यासाठी उपयुक्त आहे. लिंबू काढताना हाताला कोणतीही इजा होत नाही. लिंबू झेला सोबत कापडी पिशवी जोडलेली असल्याने काढलेले लिंबू कापडी पिशवीमध्ये सहजपणे गोळा करता येते.

पारंपारिक पद्धतीपेक्षा लिंबू काढणी अधिक सुलभ व कार्यक्षमपणे होते. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे, संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके, शिक्षण संचालक डॉ. साताप्पा खरबडे, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे तसेच डॉ. अण्णासाहेब शिंदे शासकीय कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सचिन नलावडे यांनी या उपकरणाच्या पेटंटमध्ये सहभागी झालेल्या शास्त्रज्ञांचे अभिनंदन केले आहे.